मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

मुंबई कार्यालय
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

पालघर कार्यालय
कार्यालय क्रमांक ४०९, पद्मीबाई, विरार रेल्वे सबवे समोर, विरार पूर्व., ता. वसई, जि. पालघर. ४०१ ३०५. मो. ९८९२९६८७२५.

नाशिक कार्यालय
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

वितरण
मो. नं. ८४२४९३६४३६

नाशिक | PRGI Reg. No.MHMAR/25/A0219 | बुधवार, ६ ऑगस्ट २०२५ | वर्ष: १ | अंक:६८ | पाने-८ | किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३

## टॅरिफमध्ये मोठी वाढ करण्याचा ट्रंपचा इशारा

**वॉशिंग्टन, दि. ५ प्रतिनिधी**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या टॅरिफ धोरणांची जगात चर्चा सुरू आहे. काही दिवसांपूर्वी ट्रम्प यांनी भारतावर देखील २५ टक्के टॅरिफ लादण्याची घोषणा केली. एवढंच नाही तर भारताकडून दंड वसूल करण्याचाही इशारा ट्रम्प यांनी दिला. भारत रशियाकडून मोठ्या प्रमाणात तेल खरेदी करत असल्याच्या मुद्यांवरून डोनाल्ड ट्रम्प हे आक्रमक होत आहेत. यावरून ट्रम्प सातत्याने भारतावर आयात शुल्क (टॅरिफ) लादण्याची धमकी देत आहेत. दरम्यान, आता ट्रम्प यांनी भारताला पुन्हा एकदा धमकी देत टॅरिफमध्ये आणखी मोठी वाढ करण्याचा इशारा दिला आहे. भारत रशियाकडून तेल खरेदी करण्याच्या मुद्यांवरून ट्रम्प हे भारतावर टीका करत आहेत. आज पुन्हा याच मुद्यांवरून ट्रम्प यांनी भारतावर घणाघाती टीका केली आहे. तसेच पुढील २४ तासांत भारतावर पुन्हा अतिरिक्त कर लादण्याचा इशारा एका मुलाखतीत बोलताना दिला आहे.

अग्रलेख

## खरीखरी

### सत्यवादी सत्यपाल

आज सत्यपाल मलिक नावाच्या एका सत्यवादीचा अंत झाला. व्यवस्थेविरुद्ध लढणे किती जिकिरीचे आणि कठीण असते हे तुम्हा-आम्हा सर्वांना माहीतच आहे. विशेष म्हणजे सत्यपाल मलिक अनेक दिवस प्रवाहात होते. मोदीजींनी त्यांना जम्मू काश्मीरचे राज्यपालपद बहाल केलेले होते. अत्यंत कठीण काळात जम्मू-काश्मीरचे राज्यपाल म्हणून त्यांनी मोलाची कामगिरी बजावली याबाबत कोणाच्याही मनात दुमत असणार नाही. हा माणूस प्रवाहपतीत होत नाही हे दिसून आल्यावर नाना कारणांमुळे त्यांच्यावर आरोप होत होते, पण अनेक संकटे येऊनही सत्यपाल मलिक यांनी सत्य सांगण्याचा प्रयत्न कधीच बंद केला नाही. त्यांच्यावर कोट्यवधी रुपयांच्या लाचखोरीचे आरोप करण्यात आले होते. विशेष म्हणजे शंभरपैकी एखाद्या प्रकरणातच काहीतरी यश मिळवणारी इडी त्यांच्या पाठीमागे लावण्यात आली होती, पण या माणसाने शेवटपर्यंत हार मानली नाही. रोखठोक बोलणे हा त्यांचा स्वभाव होता, विशेष म्हणजे तो कोणत्याही व्यवस्थेला हे आवडत नाही आणि पचतही नाही. नुकताच उपराष्ट्रपतीपदाचा राजीनामा दिलेले जगदीश धनखड आता सत्यपाल मलिक यांच्यासारखेच वागतील काय, असे म्हटले जात होते. यावरूनच सत्यपाल मलिक हा सत्यतेचा ब्रँड झाला आहे असे सहज दिसून येते. जो झुकता है वो जाट नहीं, असे जाट समाजाबद्दल म्हटले जाते. उपराष्ट्रपती पदावरून पायउतार झाल्यानंतर धनखड यांनी कोणतेही भाष्य अद्याप तरी केले नाही. तरीही ते पुढे मागे आपल्या डोळ्यासमोर सत्यपाल मलिक यांचा आदर्श ठेवतील असे बोलले जात आहे. सत्यपाल मलिक यांच्या प्रकृतीत गेल्या अनेक दिवसांपासून खूपच चढउतार होत होते. चौधरी चरण सिंग यांचे विचार जाणून त्यांचे अनुकरण करणारे चरण सिंग यांचे ते पक्के चेले असलेल्या मलिक यांनी त्यानंतर इतरही काही पक्षात चंचूप्रवेश केला होता. त्यामुळेच त्यांचा प्रभाव पाहता त्यांना थेट राज्यपाल पदावर बसवले गेले. समाजवादी विचार असलेला माणूस सदैव व्यवस्थेच्या विरुद्ध असतो हे आपण अनेकदा बघितलेले आहे. एवढ्या उच्च पदावर आरूढ होऊनही त्यांना निवृत्तीनंतर ज्या प्रकारच्या सोयी सवलती मिळायला हव्या होत्या त्या कधीच मिळाल्या नाहीत. अगदी साध्या दोन खोलीच्या घरात ते राहत होते, त्यांच्यावर कितीही आरोप झाले तरी हा माणूस भ्रष्टाचारी नाही हे या सगळ्या गोष्टीवरून आपोआपच दिसून येत होते. याचा परिणाम असा की त्यांच्यावर कितीही हेत्वारोप गेले तरी सत्यपाल मलिक जे बोलतील ते खरेच असते असाच त्यांचा लौकिक होता. या लौकिकाला जागूनच प्रकृती बरी नसतानाही ते जनतेची लढाइ लढत होते. त्यासोबतच त्यांच्या खुलेआम बोलण्याचे कारण म्हणजे, ज्याला कर नाही त्याला डर कशाला हे होते. आजकाल कणाहीन माणसांचा जमाना आहे, त्यात मलिक यांच्यासारखे कण असलेले योद्धे सुद्धा आहेत. ते लोकशाही जपण्याचे काम अत्यंत वेगळ्या पद्धतीने करीत आहेत, हे दिसून आल्यावर आपोआपच त्यांच्याबद्दल आपुलकी निर्माण होत होती. आताच्या जमान्यामध्ये हाताच्या बोटावर मोजण्या इतकी प्रामाणिक माणसे दिसतात. बाकी सारे काही कणाहीन आहे हेच तर खरे या कालखंडातील वैषम्य आहे. आज सत्यपाल मलिक यांचा नश्वर आत्मा इहलोकांतून परलोकात गेला. त्यांनी आपल्या जीवनात जे जे पटले त्याचा स्वीकार केला, जे जे पटले नाही त्याचा तिरस्कार केला आणि शक्य तितक्या ठिकाणी न पटणाऱ्या गोष्टींचा मनापासून धिक्कार केला. अशी वाटचाल करीत त्यांनी आपले जीवन खऱ्या अर्थाने जनसामान्यांसाठी जगून यशस्वी केले. आज त्यांना श्रद्धांजली अर्पण करताना त्यांच्यातील सत्यतावादी आणि सर्व समावेशक विचार असलेल्या त्यांच्या गुणांची सहज आठवण येते. सर्वसामान्य माणसांचा नेता म्हणून अतिशय चांगली कामगिरी बजावलेल्या सत्यपाल मलिक यांना आमची भावपूर्ण आदरांजली!

nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023

## हत्तीण महादेवी परत येणार ?

### राज्य सरकार आणि मठ सुप्रीम कोर्टात याचिका दाखल करणार

**मुंबई, दि. ५ प्रतिनिधी**

नांदणी मठातील हत्तीण 'महादेवी' हिला पुन्हा मठात आणण्यासाठी राज्य सरकारने पुढाकार घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत मोठा निर्णय घेण्यात आला असून, राज्य सरकार स्वतः सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करणार असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं आहे. विशेष म्हणजे नांदणी मठालाही स्वतंत्र याचिका दाखल करण्यास सांगण्यात आलं आहे.

या बैठकीस उपमुख्यमंत्री अजित पवार, मंत्री चंद्रकांत पाटील, गणेश नाईक, हसन मुश्रीफ, गिरीश महाजन, प्रकाश आबिटकर, तसेच नांदणी मठाचे प्रतिनिधी आणि आमदार प्रकाश



आवाडे, राजू शेट्टी, सतेज पाटील, सदाभाऊ खोत, धैर्यशील माने आदी लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

मुख्यमंत्री म्हणाले,"३४ वर्षांपासून महादेवी हत्तीण नांदणी मठात आहे. ती पुन्हा मठात यावी, ही आपल्या सर्वांची इच्छा आहे. मठ प्रशासनाने एक याचिका दाखल करावी आणि त्याचवेळी राज्य सरकारही एक याचिका दाखल करेल. दोघींच्या याचिकांमधून सुप्रीम कोर्टात स्पष्टपणे मांडणी केली जाईल की राज्य सरकार या हत्तीणची निगा राखण्यासाठी तयार आहे."

राज्य सरकारकडून हत्तीण महादेवीची निगा राखण्यासाठी पशुवैद्यकीय तज्ज्ञांची एक विशेष टीम नेमली जाणार आहे. तिच्या आहार, आरोग्य व देखरेखीची जबाबदारी राज्य सरकार घेणार असल्याचंही जाहीर करण्यात आलं आहे.

सध्या हत्तीण महादेवी ही एका रेस्क्यू सेंटरमध्ये आहे. मात्र मठ प्रशासनासह स्थानिक भाविकांची मागणी आहे की तिला पुन्हा मठात परत आणण्यात यावे. या पार्श्वभूमीवर सरकारने आता सर्व कायदेशीर प्रक्रिया पार पाडून सुप्रीम कोर्टात भूमिका स्पष्ट करण्याचा निर्णय घेतला आहे.

मुख्यमंत्र्यांच्या या भूमिकेमुळे स्थानिक जनतेमध्ये, मठ प्रशासनात आणि महादेवीशी भावनिक नातं असलेल्या हजारो भाविकांमध्ये आशेचे किरण फुलले आहेत. आता या साऱ्या प्रक्रियेचं पुढचं पाऊल सर्वोच्च न्यायालयाच्या सुनावणीवर अवलंबून असेल.

## कबुतरखाना तात्काळ बंद करणे योग्य नाही

### मुख्यमंत्र्यांनी घेतली गंभीर दखल

**मुंबई, दि. ५ प्रतिनिधी**

कबुतरखान्याच्या अचानक बंदीच्या निर्णयावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी थेट बैठक घेत महत्त्वाचे निर्देश दिले. "कबुतरखाना तात्काळ बंद करणे योग्य नाही," असे सांगत त्यांनी स्पष्ट केलं की, फीडिंगसाठी वेळेचे नियम ठरवून ते नियंत्रित करता येतील. तसेच, "कबुतराच्या विष्ठेच्या साफसफाईसाठी विशेष तंत्रज्ञान वापरता येईल," असे सांगून स्वच्छतेवर भर दिला. मुख्यमंत्र्यांनी यासंदर्भात मनेका गांधी यांच्याशी देखील चर्चा केल्याचे सांगितले. त्यांनी हायकोर्टात राज्य सरकार व महापालिकेने ठाम भूमिका घ्यावी असे स्पष्ट केलं. गरज भासल्यास सुप्रीम कोर्टात जाण्याचा इशाराही दिला. बैठकीला उपमुख्यमंत्री अजित पवार, मंत्री गणेश नाईक, गिरीश महाजन, मंगलप्रभात लोढा उपस्थित होते. मंत्री लोढा यांनी स्पष्ट सांगितले की, "पर्यायी व्यवस्था न झाल्यास तोवर कबुतरखाना बंद केला जाणार नाही." तसेच, महापालिकेला रिस्ट्रिक्टेड फीडिंगची जबाबदारी देण्यात आली असून पाणीपुरवठाही पुन्हा सुरू केला जाईल.

**जैन समाज संतुष्ट**

ललित गांधी (अध्यक्ष, जैन अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ) यांनी भावना व्यक्त करताना सांगितले की, "जीवदया आमच्या परंपरेचा भाग आहे. सरकारने आमच्या भावना समजून घेतल्या, त्याबद्दल आम्ही कृतज्ञ आहोत." मंत्री लोढा यांनी हिंदू आणि जैन समाजाच्या भावना समजून घेतल्याने जनतेत समाधान व्यक्त होत आहे.

## एनडीए संसदीय पक्षाच्या बैठकीत मोदींचा सन्मान

**नवी दिल्ली, दि. ५ वृत्तसंस्था**

राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील सर्व घटकपक्षांची बैठक आज मंगळवारी संसद भवनमध्ये झाली. या बैठकीत ऑपरेशन सिंदूर आणि ऑपरेशन महादेव यशस्वीपणे राबविल्याबद्दल एनडीए खासदारांनी एकमताने ठराव मंजूर केला. यावेळी ऑपरेशन सिंदूरच्या यशाबद्दल एनडीए खासदारांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सन्मानित केले. तसेच पहलगाम दहशतवादी हल्ल्यात बळी पडलेल्या नागरिकांच्या कुटुंबियांप्रति संवेदनाही व्यक्त करण्यात आल्या. यावेळी नवीन खासदारांची पंतप्रधानांशी ओळखही करून देण्यात आली.

पीएम मोदी एनडीए बैठकीत पोहोचल्यानंतर खासदारांनी 'हर हर महादेव' आणि 'भारत माता की जय'च्या घोषणा दिल्या. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांना पुष्पहार घालून पीएम मोदी यांचे स्वागत केले.

सलग तिसऱ्यांदा सत्तेवर आल्यानंतरची एनडीएची ही दुसरी बैठक आहे. या बैठकीत पीएम मोदी यांच्यासह गृहमंत्री अमित शहा, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा सहभागी झाले आहेत. केंद्रीय मंत्री किरेन रिजीजू, प्रल्हाद जोशी आणि खासदार कंगना रनौत देखील उपस्थित आहेत.



यावेळी पंतप्रधान मोदींनी ऑपरेशन सिंदूरवरुन विरोधकांवर जोरदार निशाणा साधला. 'ऑपरेशन सिंदूरवर चर्चा करण्याची मागणी करुन विरोधकांनी स्वतःच्या पायावर धोंडा मारुन घेतला,' अशी बोचरी टीका पीएम मोदींनी केली. 'ऑपरेशन सिंदूरवर चर्चा करण्याची मागणी करुन विरोधकांनी चूक केली, स्वतःच्या पायावर धोंडा मारुन घेतला. यामुळे आता त्यांना लाजीरवाणे वाटतेय. विरोधकांनी दररोज अशा चर्चा कराव्यात. हे आमचे मैदान आहे. या मैदानात साक्षात देव माझ्यासोबत आहे,' असेही मोदी यावेळी म्हणाले.

एनडीएची ही बैठक महत्त्वाची मानली जात आहे. कारण उपराष्ट्रपती पदासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया ७ ऑगस्टपासून सुरू होत आहे. भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीएला २१ ऑगस्टपर्यंत त्यांच्या उमेदवाराची घोषणा करायची आहे. जी या पदासाठी अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख आहे. दरम्यान, संसदेचे पावसाळी अधिवेशनाचे कामकाज त्याच दिवशी संपणार आहे. जर विरोधी पक्षाकडून उमेदवार देण्यात आला तर निवडणूक ९ सप्टेंबर रोजी होण्याची शक्यता आहे.

विशेष म्हणजे एनडीएची बैठक संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या दरम्यान होत आहे. निवडणूक आयोगाच्या बिहारमधील मतदार यादीच्या विशेष सखोल आढाव्याच्या (SIR) पार्श्वभूमीवर विरोधकाकडून जोरदार विरोध सुरु आहे.




**उत्तरकाशी, दि. ५ वृत्तसंस्था**

उत्तराखंडमध्ये गेल्या काही दिवसांपासून पावसाचा प्रकोप पाहायला मिळत आहे. मुसळधार पावसामुळे आलेल्या पुरामुळे अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात नुकसान झालं. अशातच मंगळवारी उत्तरकाशीमध्ये ढगफुटी प्रलय आला आहे. उत्तर काशीच्या धराली गावात ढगफुटी झाली. या अपघातात अनेक जणांच्या मृत्यूची भीती वर्तवली जात आहे तर शेकडो लोक बेपत्ता झाल्याची माहिती आहे. धराली येथील खीर गंगेच्या पुरात अनेक घरे वाहून गेली असून बचाव कार्य सुरू आहे. ढगफुटीनंतर पाण्याचा मोठा प्रवाह धराली गावातील बाजारपेठेत आला ज्यामुळे मोठा हाहाकार उडाला. या घटनेचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

उत्तराखंडमधील धराली गावात ढगफुटीमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. पाण्याच्या प्रवाहात डझनभर घरे वाहून गेली आहेत. स्थानिक प्रशासन बचावकार्यासाठी रवाना झाले आहे. ही घटना बारकोटजवळ घडली. ढगफुटीमुळे डोंगराचा मोठा भाग पाण्यासह खाली आणि गावात घुसला. धराली खीर गड येथे पाण्याची पातळी वाढल्याने धराली बाजाराच मोठं नुकसान झालं. गंगोत्री धामचा मुख्य थांबा असलेल्या धराली येथील खीर गंगा नदीत ढगफुटी झाल्याने प्रचंड नुकसान झाले. विनाशकारी पुरामुळे सुमारे २० हॉटेल्स आणि होमस्टेचे नुकसान झाले आहे. त्यामुळे अनेक स्थानिक लोक आणि कामगार गाडले गेल्याची शक्यता आहे.

"उत्तरकाशीमध्ये, हरसिल परिसरातील खीर गडच्या पाण्याची पातळी वाढल्यामुळे आणि धरालीमध्ये झालेल्या नुकसानीमुळे पोलिस, एसडीआरएफ, सैन्य आणि इतर आपत्ती प्रतिसाद पथके घटनास्थळी मदत आणि बचाव कार्यात सहभागी झाली आहेत. त्यामुळे प्रत्येकाने नदीपासून योग्य अंतर राखले पाहिजे. स्वतःला, मुलांना आणि गुरांना नदीपासून योग्य अंतरावर घेऊन जा," अशी माहिती उत्तराखंड पोलिसांनी दिली.

पाण्याचा प्रवाह पाहून दूर असलेल लोक ओरडत होते. पाण्याचा मोठा प्रवाह गावाकडे येताच लोक ओरडू लागले. अनेक हॉटेलमध्ये पाणी आणि मातीचे ढिगारा शिरला. धाराली बाजारपेठ पूर्णपणे उद्ध्वस्त झाली आहे. अनेक हॉटेलची दुकाने उद्ध्वस्त झाली आहेत. गेल्या २ दिवसांपासून येथे मुसळधार पाऊस पडत आहे.

## स्टार्टअप उद्योजगता धोरण जाहीर, समृद्धी फ्रेट कॉरिडॉर मंजूर

**गजानन तुपे**
**मुंबई, दि. ५**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. एकीकडे समृद्धी महामार्गावरून सरकारवर टीका करण्यात येत असली, तरी वाढवण बंदर ते समृद्धी महामार्गाला जोडणाऱ्या एका फ्रेट कॉरिडॉरला या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आलेली आहे. तसेच महाराष्ट्र स्टार्टअप, उद्योजगता धोरण जाहीर करण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या अतिरिक्त जमिनींचा व्यापारी तत्वावर वापर तसेच सुधारित धोरणास मंजुरी या मंत्रिमंडळ बैठकीत देण्यात आली आहे. याशिवाय, राज्य शासनाच्या छोट्या, चिंचोळ्या आकाराच्या, बांधकामास अयोग्य, उपयुक्त आकार नसलेल्या, सुलभ पोहोच मार्ग नसलेल्या किंवा लॅण्ड लॉक्ड स्वरुपातील भूखंडांच्या वितरण धोरण मंजूर करण्यात आले आहे.

- महाराष्ट्र स्टार्टअप, उद्योजकता आणि नाविन्यता धोरण २०२५ जाहीर (कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग)
- वाढवण बंदर (तवा) ते हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृध्दी महामार्ग (भरवीर येथे) यांना जोडणाऱ्या फ्रेट कॉरिडॉरला मंजुरी. प्रकल्प आखणी व भूसंपादन प्रक्रिया राबवण्यास मान्यता. (सार्वजनिक बांधकाम विभाग)
- राज्य शासनाच्या छोट्या, चिंचोळ्या आकाराच्या, बांधकामास अयोग्य, उपयुक्त आकार नसलेल्या, सुलभ पोहोच मार्ग नसलेल्या किंवा लॅण्ड लॉक्ड स्वरुपातील भूखंडांच्या वितरण धोरणास मंजुरी. (महसूल विभाग)
- महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या अतिरिक्त जमिनींचा व्यापारी तत्वावर वापर. सुधारित धोरणास मंजुरी. (परिवहन विभाग)
- नागपूर विणकर सहकारी सूतगिरणीच्या १ हजार १२४ कामगारांना ५० कोटींचे सानुग्रह अनुदान मिळणार. सुतगिरणीच्या जमीन विक्रीतून निधीची तरतूद. (वस्त्रोद्योग विभाग)
- जळगांव जिल्ह्यातील मौजे पाचोरा येथील भुखंडावरील क्रींडागणाचे आरक्षण वगळून, त्याचा रहिवास क्षेत्रात समावेश करण्यास मान्यता. (नगरविकास विभाग)
- कुष्ठरुग्णांसाठी कार्यरत स्वयंसेवी सस्थांच्या अनुदानात वाढ, अनुदान २ हजारांवरून ६ हजार करण्यास मान्यता. (सार्वजनिक आरोग्य विभाग).

## माजी राज्यपाल सत्यपाल मलिक यांचे निधन

**नवी दिल्ली, दि. ५ वृत्तसंस्था**



जम्मू-काश्मीरचे माजील राज्यपाल सत्यपाल मलिक यांचे निधन झाले आहे. त्यांच्यावर दिल्लीतील राम मनोहर लोहिया रुग्णालयात उपचार सुरू होते. त्यांनी जम्मू-काश्मीर, गोवा आणि मेघालय सारख्या राज्यांमध्ये राज्यपाल म्हणून काम केले होते.

मागील काही दिवसांपासून त्यांच्यावर उपचार सुरू होते. कॉलेज शिक्षणापासूनच राजकारणातून आपल्या कारकिर्दीची सुरुवात करणारे सत्यपाल मलिक हे समाजवादी विचारसरणीचे नेते होते. खासदार ते राज्यपाल असा प्रवास करणारे सत्यपाल मलिक गेल्या काही वर्षांत भाजपशी संबंधित होते. त्यांनी अनेक वर्षे राज्यपाल म्हणून काम केले. गेल्या काही वर्षांपासून ते सरकारविरुद्ध आरोप करत होते. यामुळे ते चर्चेत आले होते. जम्मू-काश्मीरमध्ये त्यांच्या कार्यकाळात त्यांनी भ्रष्टाचाराचे आरोपही केले होते.

मलिक यांनी ऑगस्ट २०१८ ते ऑक्टोबर २०१९ पर्यंत जम्मू आणि काश्मीर राज्याचे शेवटचे राज्यपाल म्हणून काम पाहिले. त्यांच्याच कार्यकाळात ५ ऑगस्ट २०१९ रोजी कलम ३७० रद्द करण्यात आले आणि राज्याचा विशेष दर्जा रद्द करण्यात आला. आज या निर्णयाला सहा वर्ष झाली आहेत. नंतर त्यांना गोव्याचे राज्यपाल म्हणून नियुक्त करण्यात आले होते. त्यानंतर ऑक्टोबर २०२२ पर्यंत मेघालयाचे राज्यपाल म्हणून त्यांनी काम पाहिले.

माजी राज्यपाल सत्यपाल मलिक यांच्या मृत्यूची बातमी त्यांच्याच सोशल मिडिया प्लॅटफॉर्म एक्स खात्यावरुन दिली आहे. या एक्स-अकाउंटवरूनच शेवटचे ९ जुलै रोजी त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती दिली होती. त्यांनी भाजपा सरकारवर टीका केली होती. यांनी शेतकरी चळवळीच्या समर्थनार्थ अनेक राज्यांचा दौरा केला होता आणि सरकारला तीन वादग्रस्त विधेयके मागे घेण्याचे आवाहन केले होते. त्यांनी थेट पंतप्रधान नरेंद्र मोदींवर टीका केली होती.

## बदलापुरात दै. महासागरचे प्रतिनिधी कमाल शेख यांच्यावर जीवघेणा हल्ला

**बदलापूर, दि.५, प्रतिनिधी**

बदलापूरमधील दैनिक महासागरचे प्रतिनिधी कमाल शेख यांच्यावर जीवघेणा हल्ला करण्यात आला. या हल्ल्यामुळे बदलापूर परिसरात तीव्र संताप व्यक्त होत आहे. हा हल्ला केवळ एका पत्रकारावर नसून तो लोकशाही व्यवस्थेवरच झालेला आघात आहे, अशा तीव्र भावना समस्त पत्रकारांकडून व्यक्त होत आहेत. या घटनेमुळे पत्रकार कमाल शेख यांचे कुटुंब भयभीत झाले आहे.

बदलापूर पूर्व परिसरातील मच्छी मार्केट मध्ये ही धक्कादायक घटना घडली. बदलापूरमध्ये दैनिक महासागर चे प्रतिनिधी कमाल शेख हे बदलापूर पूर्व परिसरातील मच्छी मार्केट मध्ये स्थानिक मच्छीविक्रीते यांच्या व्यवसायावर बाधा येत असल्याने त्या संदर्भातील बातमी मिळवण्यासाठी गेले होते. त्याचवेळी गुंड प्रवृत्तीचा अजय हरी शेट्टी या इसमाने पत्रकार कमाल यांच्यावर जीवघेणा हल्ला केला. या हल्ल्यात त्यांच्या डोक्याला आणि कानाला अंतर्गत दुखापत झाली आहे. डोक्याला अंतर्गत दुखापत झाली असल्याने डोक्याचे, कानाचे वैद्यकीय सल्ल्याने पुढील उपचार सुरु आहेत.

सदर घटनेचा सर्व स्तरांमधून तसेच पत्रकार संघटनांकडून निषेध व्यक्त होत आहे. ॲड.अनिल भास्कर भोळे (सर्वोच्च न्यायालयाचे कायदेशीर सल्लागार), तसेच व्हॉईस ऑफ मीडिया पत्रकार संघटना, निर्भीड पत्रकार संघटना यांच्यासह अनेकांकडून निषेध व्यक्त होत आहे. पत्रकार सुरक्षा कायदा अंमलात यावा आणि हल्लेखोरावर कठोरात कठोर कारवाईची मागणी होत आहे.

### नेमके प्रकरण काय...

स्थानिक नगरसेवक तसेच गुंड प्रवृत्तीचे व्यक्ती या शहरातील वार्डात तसेच चौका-चौकातील फुटपाथवर शहराच्या बाहेरुन आलेल्या परप्रांतीय मच्छी विक्रेत्यांना व्यवसाय करण्यास अनधिकृत रित्या जागा देवुन त्यांच्याकडुन हफ्ते वसुल करीत आहेत. अनधिकृत त्याच्या व्यवसाय करण्यासाठी त्यांना संरक्षण देत असल्याने स्थानिक मच्छी विक्रेते यांच्या व्यवसायावर गदा येत आहे. या बातमीच्या वृत्तांकनासाठी दैनिक महासागरचे बदलापूर प्रतिनिधी बदलापूर पूर्व परिसरात स्टेशन लगत असलेल्या मच्छीमार्केटमध्ये गेले होते. त्याचवेळी तेथे अजय हरी शेट्टी या इसमाने त्यांच्यावर जीवघेणा हल्ला केला. धमकी वजा शब्दामध्ये अर्वाच्य भाषेत शिवीगाळी केली व त्यांना मारहाण केली. डोक्याला कानाला अंतर्गत दुखापत झाली आहे.

### हप्ते वसुली करणाऱ्या आणि दहशत पसरवणाऱ्या समाजकंटकांचे आश्रयदाते कोण?- दैनिक महासागर चा सवाल

दहशतीच्या बळावर मारहाण करून परप्रांतीयांना अनधिकृतरित्या व्यवसायासाठी सार्वजनिक जागा उपलब्ध करून देणारे समाजकंटक आज जागोजागी आपली कृष्णकृत्ये राजरोसपणे करीत आहेत. त्यांना तेथील कोणत्या स्थानिक नगरसेवक, राजकीय वजनदार व्यक्तींचा वरदहस्त आहे. हे तातडीने शोधून काढले पाहिजे असे आवाहन दैनिक महासागर करीत आहे. साधी बातमी करण्यासाठी गेलेल्या पत्रकारावर बिनदिक्कतपणे हात उचलून जीवघेणी मारहाण करेपर्यंत येथील स्थानिक गुंडांनी उच्छाद मांडला आहे काय? याचे उत्तर या ठिकाणच्या पोलीस प्रशासनाला द्यावेच लागेल. दहशत माजवण्याचे काम करणाऱ्या समाजविघातक लोकांवर तेथील पोलीस काय कारवाई करणार आहेत याकडे सर्वांचेच लक्ष आहे मात्र तरीही कोणतीही समस्या असल्यास आपण दैनिक महासागरच्या स्थानिक प्रतिनिधीशी अथवा वृत्तसंपादकांना तात्काळ संपर्क करावा. आपल्या समस्यांना वाचा फोडण्यासाठी आणि जनसामान्यांवर होणाऱ्या अन्याय अत्याचाराविरुद्ध तुमच्या लढाईमध्ये दैनिक महासागर नेहमीच अग्रेसर राहील आणि त्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. राज्याचे मुख्यमंत्री असलेले देवेंद्रजी फडणवीस हेच राज्याचे गृहमंत्री आहेत. त्यांनी या घटनेची तातडीने दखल घेऊन दोषींवर कारवाई करावी. यासाठी दैनिक महासागर या घटनेचा पाठपुरावा करणार आहे.

# भाजपा ज्येष्ठ नेत्या, भारताच्या यशस्वी परराष्ट्रमंत्री स्व. सुषमा स्वराज

आपलं वक्तृत्व इंग्रजी, हिंदी आणि संस्कृत भाषेवरील प्रभुत्व, प्रभावी नेतृत्व कौशल्य, भाजपचा आक्रमक पण संयत चेहरा अशी ओळख असलेल्या सुषमा स्वराज यांचा जन्म हरीयाणातील अंबाला येथे १४ फेब्रु. १९५२ साली झाला. त्यांचे वडील हरदेव शर्मा हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे राष्ट्रीय स्वयंसेवक होते. त्यामुळे सुरवातीपासूनच त्या संघांची संबंधित होत्या. अंबाला येथील सनातन धर्म महाविद्यालयातुन संस्कृत व राज्य शास्त्र ह्या विषयात त्यांनी बी. ए. केले व पुढे पंजाब विद्यापीठातून कायद्यांचे शिक्षण घेतले. १९७० नंतर पुढे अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेतील आंदोलनात्मक आणि राजकीय कारकीर्दीस सुरवात झाली. सुषमा स्वराज सर्वोच्च न्यायालयाच्या माजी वकील व भारतीय जनता पार्टीच्या वरिष्ठ नेत्या होत्या. २६ हे २०१४ पासुन ते २०१९ पर्यंत त्या भारताच्या परराष्ट्र मंत्री होत्या. माजी पंतप्रधान स्व. इंदिरा गांधींनंतर हे पद स्विकारणा-या त्या दुसऱ्या महिला होत्या. १९७७ मधे वयाच्या २५ व्या वर्षी हरीयाणा सरकारमध्ये कँबिनेट मंत्री झाल्या, तेव्हा त्या देशातील सर्वात कमी वयाच्या कँबिनेट मंत्री होत्या. १९८८ मधे त्यांनी दिल्लीच्या पहिल्या महिला मुख्यमंत्री म्हणुन पदभार सांभाळला. त्यांनी १३ ऑक्टोबर १९८८ पासुन ३ डिसेंबर १९९८ पर्यंत दिल्लीच्या पाचव्या मुख्यमंत्री म्हणुन काम केले. २००० - २००९ या काळात त्या राज्यसभा सदस्य होत्या. त्यांनी माजी पंतप्रधान स्व. अटलबिहारी वाजपेयी सरकारमध्ये माहिती आणि प्रसारण मंत्री, दूरसंचार मंत्री, आरोग्य मंत्री आणि संसदीय कामकाज मंत्री अशी मंत्रीपदे सांभाळली आहेत. त्या डिसेंबर २००९ ते २०१४ दरम्यान लोकसभेत विरोधी पक्ष नेत्या होत्या. त्या काळातील त्यांचे कार्य प्रशंसनीय व अविस्मरणीय असे होते. त्या दिल्ली राज्यातील दक्षिण दिल्ली लोकसभा मतदारसंघात २००९ मध्ये निवडणुकीत मध्यप्रदेशातील विदिशा लोकसभा मतदार संघातुन निवडुन लोकसभेवर आल्या होत्या. २०१४ च्या भारतीय सार्वत्रिक निवडणुकीत त्या दुसऱ्यांदा विदिशा मतदार संघातुन लोकसभेवर निवडुन आल्या होत्या. त्या चार लाखांपेक्षा अधिक मतांच्या फरकाने निवडुन आल्या होत्या. २६ हे २०१४ मध्ये त्या परराष्ट्र मंत्री होत्या. २०२० मध्ये त्यांना सार्वजनिक व्यवहार क्षेत्रातील मरणोत्तर पद्मविभूषण हा भारताचा दुसरा सर्वोच्च नागरी पुरस्कार प्रदान करण्यात आला. ८ नोव्हेंबर २०२१ रोजी भारताचे राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्याहस्ते त्यांच्या कुटुंबियांना प्रदान करण्यात आला. भारतीय जनता पार्टीच्या जडणघडणीत सुषमा स्वराज यांनी मोठे योगदान दिले आहे. पक्षाने दिलेली जबाबदारी त्यांनी प्रामाणिकपणे पार पाडली. स्वर्गीय अटलबिहारी वाजपेयी व लालकृष्ण



सहाव्या स्मृति दिनानिमित्त विनम्र अभिवादन...

अडवाणी यांच्यासारख्या ज्येष्ठ नेत्यांबरोबर त्यांनी काम केले. स्वकर्तृत्वाने त्यांचे नेतृत्व बहरले. धारधार वक्तृत्व हा त्यांचा सर्वात मोठा गुण होता. त्या जोरावरच त्यांनी राजकारणातले आपले स्थान भक्कम केले. सुषमाजींच्या नेतृत्व, कर्तृत्व, वक्तृत्व, कार्यशैलीचा ठसा कायम राहील.

काही व्यक्तींच्या स्मृति सदैव प्रेरणा देतात, त्यापैकीच एक म्हणजे सुषमा स्वराज. अमोघ वक्तृत्वाने जनमानसांना प्रभावित करणाऱ्या भारतीय राजकारणातील कणखर नेत्या, माजी परराष्ट्रमंत्री आणि भाजपाच्या जडणघडणीतील रणरागिणी म्हणुन सुषमा स्वराज ओळखल्या जातात. देश असो की विदेश असो की संयुक्त राष्ट्रांची महासभा ह्या सर्व ठिकाणी त्यांनी आपल्या ओजस्वी वक्तृत्वाने अविट ठसा उमटविला होता. वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली १३ दिवसांचे सरकार होते. त्यावेळी सुषमा स्वराज ज्या भावना वेगाने भारतीय पौराणिक कथांचे दाखले देत आपल्या भाषणातुन मुद्दे मांडत होत्या, ते ऐकताना पत्रकार इतके मंत्रमुग्ध झाले होते की, पाच मिनिटांनंतर त्यांनी लिहिणे बंद केले होते, ही आठवण त्यांच्याललओजस्वी वक्तृत्वाची साक्ष देण्यास पुरेशी ठरावी. २०१५ व २०१८ मधील संयुक्त राष्ट्र संघातील त्यांचे भाषण ही 'न भुतो न भविष्यती' असे ठरले. प्रशासकीय कौशल्य आणि प्रभावी निर्णय क्षमतेचे अनेक आदर्श त्यांनी घालुन दिले. १९७० मध्ये त्यांनी अखिल भारतीय विद्यार्थी परीषदेच्या माध्यमातून आपली राजकीय कारकीर्द सुरवात केली. स्व. लोकनेते जयप्रकाश नारायण यांच्या आणीबाणी आंदोलनात त्यांचा सहभाग होता. त्यानंतर त्यांनी भाजपचे सदस्य स्विकारले. त्यांनी पक्षादेशाचे सन्मानाने पालन केले. इतकेच नव्हे तर आपली घराणेशाही रुजविण्याचा विचारही कटाक्षाने टाळला. नि:पक्ष, स्वच्छ आणि समर्पित राजकारणाचा त्यांनी घालुन दिलेला आदर्श वस्तुपाठ भारतीय राजकारणातील नविन पिढी गिरवत राहील हे निश्चित!

सुशील, सुसंस्कृत, सुस्वभावी असलेल्या सुषमा स्वराज यांच्या व्यक्तीमत्वात दुर्गा आणि सरस्वती यांचे दर्शन घडायचे. त्यांची कारकीर्द सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. आमदार, खासदार, मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्री अशी विविध पदे त्यांनी आपल्या कर्तृत्वाने मिळविली. मोदी सरकारच्या पहिल्या मंत्री मंडळात परराष्ट्रमंत्री असलेल्या सुषमा स्वराज यांनी ट्विटर द्वारे परराष्ट्र मंत्रालयाला जनसामान्यांन पर्यंत पोहचविले. परराष्ट्रमंत्री असताना सर्वसामान्यांचे प्रश्न सोडविण्याचा त्यांचा उपक्रम स्तुत्य होता. महिलांसाठी त्या आदर्श अश्या नेत्या होत्या. आज ६ ऑगस्ट त्यांच्या सहाव्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन!



**श्री प्रदीप पाटील**
**भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य**
**मोबाईल क्र. ९९६०४९५४९५**
**मेल आयडी :- pradeep_patil2244@yahoo.com**

## महत्त्वाचे

### वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी पोलीस ट्रॅफिक वार्डन संकल्पना राबविणार : प्रदीप देशमुख

**पिंपळगाव बसवंत ।** पिंपळगाव बसवंत शहरामध्ये प्रामुख्याने भेडसवणारी वाहतूक सोडविण्यासाठी पोलीस ट्राफिक वार्डन ही संकल्पना राबविणार असल्याची माहिती पिंपळगावचे नवनिर्वाचित पोलीस निरीक्षक प्रदीप देशमुख यांनी दिली. पिंपळगाव बसवंत येथे नव्यानेच रुजू झालेल्या प्रदीप देशमुख यांचा शहरातील भारतीय जनता पार्टीच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी पिंपळगाव शहरातील कायदा सुव्यवस्था बाबत चर्चा करताना देशमुख बोलत होते.पोलीस ट्रॅफिक वार्डन यामध्ये महाविद्यालयातील काही गरजू विद्यार्थ्यांचा यामध्ये समावेश असेल जे आपल्या दिवसातील काही तास या कामासाठी देऊ शकतील. याचबरोबर पिंपळगाव शहराचे आकारमान हे मोठ्या प्रमाणात दिवसेंदिवस वाटत चालला आहे मात्र पोलिसांची संख्या दहावी वर्षपूर्वी होती तेवढीच आहे. यामुळे पोलीस संख्यबळ वाढवणे देखील काळाची गरज असून याबाबत वरिष्ठांकडे पाठपुरावा करणार आहे. तसेच दिवसेंदिवस वाढलेल्या चोऱ्या लक्षात घेता पिंपळगाव शहरात एकूण किती सीसीटीव्ही कॅमेरा आहे याचा अंदाज लक्षात घेऊन अजून कुठल्या ठिकाणी सीसीटीव्ही असणं गरजेचं आहे. याबाबत माहिती घेऊन शासन स्तरावर प्रयत्न करून योजनेच्या मार्फत सीसीटीव्ही कॅमेरे देखील पिंपळगाव शहरात उपलब्ध करून देण्यासाठी मागणी करणार असे पोलीस निरीक्षक प्रदीप देशमुख यांनी सांगितले. याप्रसंगी भाजपाचे सतीश मोरे, बापू पाटील, चिंधु काळे, सुहास शिंदे, निलेश शेळके, नारायण जाधव, अल्पेश पारख, मयूर गावडे, भारत सूर्यवंशी, प्रवीण मोरे, प्रशांत घोडके,आशिष विधाते, शंभू देवकर, किशोर कापसे, मदन घुमरे व कार्यकर्ते उपस्थित होते.

### मातोरी जनता विद्यालयात 'प्रोजेक्ट बंधन २०२५' कार्यशाळा

**नाशिक ।** मविप्रच्या मातोरी येथील जनता विद्यालयातील विद्यार्थ्यांनी स्वतः पारंपरिक राख्या तयार करत सामाजिक बांधिलकी जपली आहे. या उपक्रमातून जमा झालेला निधी संपूर्ण अमरावतीतील लवाडा येथील बांबू केंद्राला पाठविण्यात येणार आहे. हा निधी मेळघाटातील आदिवासी बांधवांच्या कल्याण व आर्थिक सक्षमीकरणासाठी वापरण्यात येणार आहे. मविप्र समाजाच्या केबीटी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या वतीने मातोरी येथील जनता विद्यालयात 'प्रोजेक्ट बंधन कार्यशाळा 2025' यशस्वीरित्या पार पडली. या कार्यशाळेच्या विशेष उपक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आपल्या सर्जनशीलतेचा आणि सृजनात्मकतेचा अविष्कार केला. विद्यार्थ्यांनी स्वतः पारंपरिक आणि आकर्षक अशा राख्या तयार केल्या.

### नाशिक जिल्ह्यात १५ ऑगस्टपर्यंत शस्त्र, जमावबंदी

**नाशिक ।** जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी रोहितकुमार राजपूत यांनी मुंबई पोलिस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये नाशिक ग्रामीण जिल्हा (पोलीस उपायुक्त नाशिक शहर यांची हद्द वगळून) कार्यक्षेत्रात १ ऑगस्ट २०२५ रोजी मध्यरात्रीपासून ते १५ ऑगस्ट २०२५ रोजी रात्री २४.०० वाजेपर्यंत शस्त्र व जमावबंदी आदेश जारी केला आहे. सदरचे आदेश लग्नकार्य, मिरवणुका, तालुका आठवडे बाजार किंवा प्रेतयात्रेच्या जमावास लागू राहणार नाहीत. तसेच हा आदेश पोलीस अधिकारी, कामावर असलेल्या इतर शासकीय अधिकारी, कर्मचारी यांना तसेच सभा अगर मिरवणुका काढण्यास रितसर परवानगी घेतली असलेल्या व्यक्तींना लागू नाही असे आदेशात नमूद केले आहे.

## एसटी बंद पडली भर रस्त्यात!

### रस्त्यावर बस बंद पडणे म्हणजे प्रवाशांच्या सुरक्षेशी तीन तेरा



**मनमाड ।** इंदूर-पुणे महामार्गावरील रेल्वे पुलावर मनमाड येथून कोपरगावकडे जाणारी एसटी बस अचानक बंद पडल्याने वाहतुकीला मोठा फटका बसला. एमएच १४ एमएच ०३३८ या क्रमांकाची ही बस तांत्रिक बिघाडामुळे पुलावर थांबली, परिणामी दोन्ही बाजूंनी येणाऱ्या-जाणाऱ्या वाहनांची मोठी कोंडी झाली.

या घटनेमुळे वाहनचालक आणि प्रवाशांचे मोठे हाल झाले. पुलावर अचानक एसटी बस बंद पडल्याने मागून येणारी वाहने अडकली. लांबच लांब वाहनांच्या रांगा लागल्या. बसमधील काही प्रवाशांनी बसमधून खाली उतरून चालत जाण्याचा किंवा इतर खाजगी वाहनांची मदत घेण्याचा मार्ग निवडला. विशेषतः वृद्ध, लहान मुले आणि महिलांना या प्रकारामुळे मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागले. एका लेनवरून वाहने सोडली जात होती, मात्र पुलावरील रुंदी कमी असल्याने वाहतुकीची गती अत्यंत मंदावली होती. एकीकडे एसटी प्रशासनाने बिघाड झालेल्या बसला हटविण्यासाठी तांत्रिक कर्मचारी दुपारपर्यंत आलेले नव्हते. मात्र तोपर्यंत जवळपास दीड ते दोन तास वाहतूक विस्कळीत राहिली. या प्रकारामुळे प्रवाश्यांनी व नागरिकांनी संताप व्यक्त केला. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था चालवणाऱ्या एसटी महामंडळाने आपल्या गाड्यांची वेळोवेळी तपासणी व देखभाल करावी, अशी मागणी प्रवाश्यांतून होत आहे. "जुनी झालेली वाहने अजूनही रस्त्यावर धावत आहेत, त्यामुळे अशा घटना वारंवार घडतात. अशी प्रतिक्रिया काही प्रवाश्यांनी दिली. तांत्रिक बिघाडामुळे अशा महत्त्वाच्या रस्त्यावर बस बंद पडणे म्हणजे प्रवाशांच्या सुरक्षेशी तीनतेरा असल्याची प्रतिक्रिया वाहनचालकांमधून उमटत आहे.

## पेठ एस. टी. स्टँडचे भिजत घोंगडे

### दोन वर्षांपासून कासव गतीने काम; प्रवाशांचे हाल



**पेठ ।** पेठ आगाराचे नवीन एस.टी बस स्टॅन्डचे काम गेली दोन वर्षांपासून सुरू असून सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने शालेय विद्यार्थी तसेच वयोवृद्धासह महिला प्रवाशांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

महामंडळाने या ठिकाणी तात्पुरते पत्र्याचे शेड मारून निवारा स्थानक बनवले असले तरी भर पावसात बसची वाट पाहतांना प्रवाशांची तारांबळ उडत आहे. बस स्थानका समोरील सर्वच परिसर चिखलमय असल्याने चिखलातून वाट काढत निवारा स्थानका पर्यंत जावे लागत आहे. सदरील बस स्थानकाचे काम हे दोन वर्षांपासून सुरू असले तरी या कामाबाबत कोणतेही फलक काम कधी सुरू झाले व कधी पर्यंत पुर्ण करायचे व किती रक्कमेचे आहे याबाबत कोणताच खुलासा होत नसुन आगारातील याची कोणतीच माहीती उपलब्ध होत नाही जिल्हास्तरावर स्वतंत्र यंत्रणा हे काम पाहत असल्याचे बोलले जाते.

या सोबतच पेठ एसटी आगाराच्या बस फे-यांचे वेळापत्रक हे कोलमडलेलेच असते तासनतास प्रवाशांना बसची वाट पाहावी लागते बस कमी असल्याचे कारण जरी सांगितले जात असले तरी अधिकचे उत्पन्न यावे म्हणुन येथील बस इतरत्र पाठवुन स्थानिक प्रवाशांची परवड केली जात असल्याचे चित्र आहे.वेळेवर बससेवा उपलब्ध होत नसल्याने खाजगी प्रवासी वाहतूक जोमात सुरू आहे.पेठ एसटी बस आगाराने वेळेत सुरक्षित व सुरळीत बस सेवा द्यावी, अशी मागणी प्रवासी वर्गातून होत आहे.

## पावसाळ्यात आरोग्याची काळजी घेण्याचे डॉ. राकेश पाटील यांचे आवाहन

**नाशिक ।** पावसाळा म्हणजे हिरवळ, गारवा आणि निसर्गाचा आनंद घेण्याचा काळ. मात्र याच ऋतूमध्ये अनेक संसर्गजन्य आजारांचा धोका वाढतो. त्यामुळे "आला पावसाळा, आरोग्य सांभाळा" हा संदेश अशोका मेडिकव्हर हॉस्पिटलचे जनरल फिजिशियन डॉ. राकेश पाटील यांनी नागरिकांना दिला.

ते म्हणाले की, सौंदर्याच्या आडून आजारांचे सावट येत असते. पावसाळ्याच्या सुरुवातीला वातावरणात उष्णता आणि आर्द्रता वाढल्याने श्वसनाचे विकार, सर्दी-खोकला, त्वचाविकार यांचा प्रकोप होतो. टायफॉईड, डेंग्यू, मलेरिया, चिकनगुनिया, कावीळ, अन्न विषबाधा आणि पोटाचे विकार यांचा धोका सर्व वयोगटांतील नागरिकांना असतो.



डॉ. पाटील यांचे पावसाळ्यातील आरोग्य सल्ले: रस्त्यावरील खाद्यपदार्थ टाळा बाहेरचे, उघड्यावरचे अन्नपदार्थ टाळा. हे बॅक्टेरियांनी दूषित होण्याची शक्यता अधिक असते. पोटदुखी, उलट्या-जुलाब यांचा धोका वाढतो. शक्यतो घरीच बनवलेले, स्वच्छ अन्न घ्या.उकळलेले पाणी प्या पावसाळ्यातील पाणीप्रदूषण टाळण्यासाठी पाणी उकळून प्यावे. प्रवास करताना स्वतःची पाण्याची बाटली सोबत ठेवा. डासांपासून संरक्षण करा, घराच्या आसपास पाणी साचू देऊ नका. डेंग्यू, मलेरिया यांसारख्या आजारांची लागण होऊ शकते. पाण्याची भांडी झाकून ठेवा. मच्छरदाणी, मॉस्किटो रिपेलंटचा वापर करा. वैयक्तिक स्वच्छता पाळावी, घरी आल्यावर हात धुणे, कपडे बदलणे, अँटीफंगल साबण आणि पावडर वापरणे आवश्यक आहे. गर्दीपासून शक्यतो लांब रहा. अशोका रुग्णालयात पावसाळ्यात होणाऱ्या विविध आजारांवर तत्काळ आणि प्रभावी उपचार उपलब्ध असल्याची माहिती डॉ. पाटील यांनी दिली. पावसाळा म्हणजे निसर्गाचा उत्सव, पण त्याचा आनंद घेताना आरोग्याकडे दुर्लक्ष होऊ नये. पावसात भिजण्याचा आनंद जितकाच गोड, तितकीच सावधगिरी आवश्यक आहे. कारण "आरोग्य हाच खरा खजिना" असल्याचेही डॉ. पाटील यांनी सांगीतले.

## सकारात्मक विचारांतून तुम्ही व्हाल यशस्वी : बानगुडे पाटील

**नाशिक ।** आपल्यातील क्षमता इतर कुणीही ठरवू शकत नाही. आपल्या क्षमतांना आपणच मर्यादित करतो. तुमच्या आयुष्यात घडते, त्यास इतर जबाबदार नसतात, तर तुम्ही स्वतः जबाबदार असता. जसा विचार कराल, तसे आयुष्य घडत जाते. नकारात्मक विचार केल्यास अपयशी व्हाल. याउलट नेहमी सकारात्मक विचार केल्यास जीवनात निश्चित यशस्वी व्हाल, असे प्रतिपादन प्रसिद्ध वक्ते व व्याख्याते प्रा. नितीन बानगुडे पाटील यांनी केले. लाडशाखीय वाणी मित्र मंडळ, नाशिकतर्फे खुटवडनगर येथील वाणी मित्र मंडळाच्या माहेरघर वस्तूत येथे झालेल्या कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते. लाडशाखीय वाणी मित्र मंडळाचे अध्यक्ष गिरीश मालपुरे, उपाध्यक्ष नितीन दहिवेलकर, निलेश कोतकर सचिव विवेक वाणी, डॉ. शशिकांत वाणी, शंकर महाराज जोशी यांच्या सह इतर सर्व प्रयोजक व समिती प्रमुख मिनल वाणी, नीतू ब्राह्मणकर आदी पदाधिकारी उपस्थित होते.

प्रा. बानगुडे पाटील म्हणाले की, उद्याची पिढी सक्षम बनवायची असेल, तर त्यांचे मन घडविले पाहिजे. त्यांना योग्य विचार करायला शिकविले पाहिजे. आपल्यातील






क्षमतांचा योग्य वापर करण्यासाठी प्रोत्साहित केले पाहिजे. विविध कारणांनी आपण आयुष्यातील खुप महत्त्वाचा वेळ वाया घालवितो. एक मिनिटाची रिल बघण्याच्या सवयीने एकाग्रतेवर परीणाम होतो. परीणामी अभ्यासात लक्ष लागत नाही. १८ वर्षाच्या आतील मुलांना मोबाईल द्यायला नको, असे दृढ वक्तव्य ज्याने मोबाईल निर्माण केला त्याने केले होते. तरी आपण आज मुलांच्या हातात मोबाईल देऊन काय साध्य करत आहोत, असा प्रश्न त्यांनी पालकांना विचारला. मुलांच्या हातात मोबाईलऐवजी पुस्तक दिल्यास प्राप्त ज्ञानाचा उपयोग व्यक्तीमत्त्व विकासासाठी ते करतील. त्यांच्यामध्ये जिज्ञासा निर्माण होईल, असे त्यांनी सांगितले.

### पाल्य तुमचे अनुकरण करतात

समर्थ भारत घडविण्यासाठी पुढील पिढी सामर्थ्यवान बनविणे गरजेचे आहे. अनेक पालकांचे तक्रार असते की पाल्य त्यांचे सांगितलेले ऐकत नाही. जरी ते ऐकत नसले तरी पालकांचे अनुकरण निश्चित करतात. त्यामुळे आपली वर्तणूकदेखील जबाबदार ठेवणे पालकांचे कर्तव्य आहे. पाल्यास सतत त्यांच्या चुका दाखवत राहाण्यापेक्षा त्या कशा सुधारता येतील, यासाठी प्रोत्साहित केले पाहिजे.

### मोठे स्वप्न बघायला शिका

अनेकांचे स्वप्न छोटे असल्याने ते त्यांच्या जीवनात मर्यादित यश मिळवू शकतात. परंतु मोठी स्वप्न बघायला शिकले पाहिजे. भले ही स्वप्ने पूर्ण झाली नाही तरी चालतील. परंतु तुम्ही निम्यापर्यंत पोहचले तरी ते मोठे यश राहिल. आयुष्यात येणार्या अडचणी तुम्हाला घडवत असतात. त्यामुळे अडचणींमुळे त्रस्त व्हायला नको. तर हिम्मतीने सामना केला पाहिजे. संघर्षातून पुढे आलेली मुले चांगली कामगिरी करु शकतात. म्हणून प्रतिकुल परीस्थितीतून आलेली मुले गुणवत्ता यादीत स्थान मिळवितात. मुलांना हव्या त्या सुविधा द्या. परंतु धेय्यप्राप्तीसाठी संघर्ष करण्याची सवय त्यांच्यामध्ये रुजवा, असे आवाहन त्यांनी केले. लाडशाखीय वाणी मित्र मंडळाच्या उपक्रामचे कौतुक त्यांनी केले. आयुष्यात सत्कार, गुणगौरव समारंभातून मिळालेले प्रोत्साहन अतिशय महत्त्वाचे असते, असे त्यांनी आवर्जुन नमूद केले.

### 'महाराष्ट्र वैभव'ला प्रतिसाद

लाडशाखीय वाणी समाजातर्फे महाराष्ट्र वैभव या अनोख्या उपक्रमाचे आयोजन यानिमित्त केले होते. याअंतर्गत रविवारी गड किल्ल्यांची ओळख करुन दिली. अक्षरा शिरूडे, अनुवेद कोठावदे, श्रेया नावरकर, पार्थ शिरोडे यांनी गडकिल्ले साकारताना बक्षीस जिंकले. तसेच लहान बालगोपाल यांनी शिवाजी महाराज, संभाजी महाराज, कवी कलश, जिजाऊ, यांची वेशभूषा करून उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

# इगतपुरी 'भात संशोधन केंद्रा'ला कर्मवीर पुंजाबाबा गोवर्धनेंचे नाव देणार : ना. कोकाटे




**इगतपुरी ।** तालुक्यातील शेतकरी व शेतमजूर यांच्यासाठी कर्मवीर पुंजाबाबा गोवर्धन यांनी 'भाताचा लढा' दिला होता. इंग्रजांच्या काळात दिलेल्या या लढ्याची ऐतिहासिक नोंद व बाबांचे या लढ्यातील शोर्य व कार्य लक्षात राहण्यासाठी शासनस्तरावर आपण इगतपुरी 'भात संशोधन केंद्रा'ला कर्मवीर पुंजाबाबांचे' नाव देण्यासाठी शासनस्तरावर प्रयत्न करू, असे प्रतिपादन राज्याचे क्रिडा व युवक कल्याण मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी केले. इगतपुरी येथील कर्मवीर पुंजाबाबा गोवर्धन महाविद्यालयात 'कर्मवीर पुंजाबाबा गोवर्धने जयंतीनिमित्त' आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

व्यासपीठावर मविप्रचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, मविप्र संस्थेचे उपाध्यक्ष विश्वास मोरे, संचालक विजय पगार, ॲड. संदीप गुळवे आदी व्यासपीठावर उपस्थित होते. ॲड.माणिकराव कोकाटे पुढे म्हणाले की म्हणाले की, जुन्या काळातील पुंजाबाबांसारखे तत्कालीन आमदार हे महाराष्ट्राला दिशा देणारे होते. निस्पृहपणे काम करताना त्यांनी समाजाला व शेतकऱ्यांना दिशा दिली. जनतेवर अन्याय झाला तर सरकारला घाम फोडणारी त्यांची कृती असायची. त्यांच्यासारखी माणसं हीच आमची आदर्श असल्याचे कोकाटे यांनी सांगितले. क्रीडा व युवक कल्याण खात्याचा कार्यभार स्वीकारल्यानंतर कोकाटे यांनी सर्वप्रथम नागपूर येथे जाऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या समवेत बुद्धिबळ स्पर्धेत जागतिक कीर्ती संपादन केलेल्या दिव्या देशमुख हिच्या सत्कार समारंभात प्रथम भाग घेतला, तर नाशिक जिल्ह्यात पहिला कार्यक्रम इगतपुरी येथे घेतला. त्यामुळे इगतपुरी येथील अनेकांनी समाधान व्यक्त केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.किरण रकिबे यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. बलराम कांबळे तर आभार प्रदर्शन ज्योती भोर यांनी केले. पोलीस निरीक्षक सारिका आहेरराव, माजी मुख्याध्यापक वसंतराव गोवर्धने, श्रीमती प्रतिभाताई गोवर्धने, संपतराव मुसळे, पांडुरंग मामा शिंदे, मा.जि.प. सदस्य उदय जाधव, विजय कडलग, कचरू शिंदे, उत्तमभाऊ मांडे, उत्तम गोवर्धने, भाऊराव जाधव, प्रथमेश पुरोहीत, समाधान गुंजाळ, सागरभाऊ नागरे, गणेश पाटील व गोवर्धन परिवारातील अनेक मान्यवर सदस्य उपस्थित होते. याप्रसंगी महाविद्यालयातील विविध शाखा व सांस्कृतिक - क्रीडाक्षेत्रातील नेत्रदीपक यश संपादन करणा-या विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी एस. बी. फाकटकर, डॉ.विष्णू राठोड, प्रा.कन्हैया चौरसिया, डॉ.एस.एस परदेशी, डॉ.बी.सी.पाटील यांनी प्रयत्न केले.

### बाबांचे कार्य पुढील पिढीच्या स्मरणात राहील

बाबांच्या परिवारातील ॲड.जयंत गोवर्धने यांनी कर्मवीर पुंजाबाबांनी सामान्य शेतकरी व शेतमजूर यांच्यासाठी भातलढ्यात केलेले कार्य विविध माध्यमातून लक्षात राहण्यासाठी ब-याच वर्षांपासून शासनस्तरावर प्रयत्न केले जात आहे. शालेय शैक्षणिक अभ्यासक्रम व शेती संबंधित संशोधन केंद्राना नाव दिल्यास बाबांचे कार्य पुढील पिढीला कायम स्मरणात राहील असे मनोगतात व्यक्त केले. मविप्रचे इगतपुरी तालुका संचालक ॲड.संदीप गुळवे यांनी बाबांचे साधे राहणीमान आणि उच्च विचार यामुळे सर्वसामान्य जनतेत त्यांना वेगळे स्थान होते. तर मविप्र संस्थेचे उपाध्यक्ष विश्वास मोरे यांनी सांगीतले की, पुंजाबाबांनी शेतकरी व बहूजन समाजाच्या जनजागृतीसाठी जलशाच्या माध्यमातून केलेले कार्य आजही प्रेरणादायक ठरले आहे. मविप्र संस्थेचे सरचिटणीस ॲड.नितीन ठाकरे यांनी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना 'कर्मवीर पुंजाबाबांचे' कार्य हे मविप्र संस्थेतील संस्थापक कर्मवीरांना सोबत घेऊन 'बहूजन समाजाच्या विकासाला व शेतकरी- शेतमजूर वर्गाच्या जीवनाला कलाटणी देणारे होते.

# मधुमेह, उच्च रक्तदाब यामुळे किडनी विकाराच्या समस्यांमध्ये वाढ : डॉ. केळकर



**नाशिक ।** जीवनशैलीचा दैनंदिन जीवनमानावर होणारा बदल तसेच उच्च रक्तदाब आणि मधुमेहामुळे किडनीच्या समस्यांमध्ये वाढ होत असल्याचे प्रतिपादन नारायणी हॉस्पीटलचे किडनीविकार तज्ञ देवीकुमार केळकर यांनी केले. डॉ. देवीकुमार केळकर म्हणाले की, सकाळी उठल्यावर डोळ्याभोवती सुज येणे, चेहरा किंवा पायावर सुज येणे, लघवीमध्ये रक्त किंवा प्रोटीन जाणे, लघवी करतांना त्रास होणे यासारखे लक्षणे दिसल्यास तज्ञ डॉक्टरांचा सल्ला घ्या. वेळीच निदान होऊन योग्य उपचार घेतल्यास पुढील आजार टाळता येणे शक्य असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

मनोमिलन ज्येष्ठ नागरिक संघ पाथर्डी गाव, नाशिक यांच्यातर्फे आयोजित व्याख्यान कार्यक्रमात डॉ.केळकर बोलत होते. यावेळी व्यासपीठावर मंडळाचे अध्यक्ष किरण देशमुख, उपाध्यक्ष सुभाष दांडगे,दिलीप पाटील, शांताराम कतोरे व कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते. डॉ.केळकर म्हणाले की, डायबेटिस होऊ नये असा विचार आपण करत असू तर सर्वांत आधी स्वतःचं निरीक्षण करताना आपलं वजन, रक्तातील साखरेची पातळी, जीवनशैली यांचा विचार करणे महत्वाचे आहे. यामध्ये घरामध्ये डायबेटिसने मागच्या पिढ्यांमध्येच प्रवेश केला केला आहे अशा लोकांना डायबेटिसचा धोका जास्त असतो. त्यांनी अधिक काळजी घेणे गरजेचे असल्याचेही डॉ. केळकर यांनी सांगितले. यावेळी संघाचे सभासद मोठया संख्येने उपस्थित होते.

# कोथरूडच्या घटनेचा पिंपळगाव बसवंत येथे निषेध

## संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात बाबत निवेदन



**पिंपळगाव बसवंत ।** पुणे येथील कोथरूड मध्ये झालेल्या घटनेचा पिंपळगाव बसवंत येथे निषेध करण्यात आला असून, त्या मुलींना चुकीची वागणूक देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, असे निवेदन पिंपळगाव पोलिसांना देण्यात आले आहे.

निवेदनात मागणी केली आहे की, पुणे शहरातील कोथरूड पोलीस ठाण्यातील जातीय अत्याचाराच्या एका गंभीर घटनेकडे वेधू इच्छितो. मागासवर्गीय समाजातील तरुणींना "चुकीची भाषा वापरणे", "तसेच जातीवाचक बोलणे लोक अत्यंत घृणास्पद आणि अपमानास्पद शब्द वापरून शारीरिक व मानसिक छळ करण्यात आला आहे. हे वक्तव्य केवळ समाजद्रोही नसून, SC/ST अत्याचार प्रतिबंधक कायदा, IPC कलम 354, IPC 509, तसेच मानसिक छळवणूक याअंतर्गत येणारा गंभीर गुन्हा आहे. परंतु, या घटनेनंतरही अद्याप कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही, है अत्यंत दुर्दैवी आहे. तसेच संबंधित पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांवर तात्काळ निलंबन व बडतर्फीची कार्यवाही करावी.. SC/ST Act, IPC 354, 509, आणि मानसिक छळ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात यावा. या घटनेची न्यायालयीन चौकशी करण्यात यावी.पीडित महिलांना सुरक्षा, न्याय आणि मानसिक सन्मान मिळवून द्यावा. पोलीस खात्यातील सर्व कर्मचाऱ्यांना जातीय संवेदनशीलतेचे प्रशिक्षण देण्यात यावे. यावेळी योगेश गांगुर्डे, सदाभाऊ सोळसे, शशिकांत सोनवणे, संदीप जाधव, शशांक गांगुर्डे, भाऊसाहेब सोळसे, संतोष सुरडकर, रोहिदास गांगुर्डे, दशरथ शिरसाठ, गणेश शिरसाठ, विकी गांगुर्डे, दीपक मोरे, सागर शेजवळ,राहुल पगारे, शामकुमार मोर्य,वमंगेश शिरसाठ, शरद जाधव, सोमनाथ साबळे, राजेंद्र वाघमारे, रोहित जाधव, मार्कस भालेराव, कावेरी पगारे, सुनील गांगुर्डे उपस्थितहोते.

## ➤ महत्त्वाचे

### बाल कलाकारांनी सादर केले विविध कलाविष्कार

**इंदिरानगर ।** बालनाट्य दिवसाचे निमित्ताने बालरंग भूमी परिषद नाशिक शाखा आणि



ज्ञानवर्धिनी विद्याप्रसारक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने विविध उपक्रमांच्या माध्यमातून बालकलाकारांच्या हक्काचा हा दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी बालकलाकारांनी माझ्या पप्पांनी गणपतीआणला, डम डम डमरू वाजे या गाण्यांवर नृत्य करून लहानग्यांनी उपस्थितांचे लक्ष वेधले,तर पाणीटंचाई, मुक्ताबाई यां सारख्या विषयांवर एकपात्री अभिनय सादर करून बाल कलाकारांनी सगळ्यांचीच वाहवा मिळवत हक्काचा हा दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. 'बालकांच्या अंगी असलेल्या कलागुणांना वाव देणे,तसेच त्यांच्या कलेला प्रोत्साहन देणारे बाल प्रेक्षक निर्माण करणे' हे उद्दिष्ट मराठी बालनाट्य सोहळ्याने साध्य झाले. आपल्या हक्काचा एक दिवस मिळतो आहे, याचा आनंद मुलांच्या चेहऱ्यावर दिसत होता. याप्रसंगी बालरंगभूमी परिषद नासिक शाखेच्या अध्यक्षा डॉ.आदिती मोराणकर,उपाध्यक्ष जयदीप पवार, ज्ञानवर्धिनी विद्या प्रसारक संस्थेचे संचालक गोपाळ पाटील, मुख्याध्यापिका माधुरी मरवट, राजेश भुसारे उपस्थित होते. कार्यक्रमासाठी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद नाशिक शाखेचे अध्यक्ष प्रा.रवींद्र कदम व प्रमुख कार्यवाह सुनील ढगे यांचे सहकार्य लाभले. समारोप आजच्या पिढीतली देशभक्ती दाखविणारी काही गाणी, काही पोवाडे आणि छोटे नाटुकले यावेळी सादर करण्यात आले. बाल रंग भूमीतर्फे बालकलाकारांचा सन्मान चिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन त्यांच्या कलेचा गौरव करून सन्मान आला.

### तळ्यातील भैरवनाथ येथे रंगला जेष्ठांचा आनंद मेळा

**सिन्नर ।** लायन्स क्लब ऑफ सिन्नर सिटी यांच्या वतीने तळ्यातील भैरवनाथ येथे जेष्ठ नागरिकांसाठी आयोजित आनंद मेळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या मेळ्यात जेष्ठ नागरिकांनी विविध खेळांमध्ये सहभाग घेऊन आपल्या वातावरण आनंदमय केले. मेळ्यात चमचा-लिंबू, संगीतमय खुर्ची, तळ्यात मळ्यात अशा विविध खेळांचे आयोजन करण्यात आले होते. या खेळांमुळे जेष्ठ नागरिकांना आपल्या तरुणपणीच्या आठवणींना उजाळा मिळाला. या कार्यक्रमासाठी आर्थिक साह्य ला.डॉ दत्तात्रय गडाख यांनी केले. सहभागी विजेत्यांना क्लबचे अध्यक्ष ला. बबनराव वाजे, खजिनदार ला. प्रशांत, ला. हेमंत वाजे, ला. पांडुरंग वारुंगसे, ला. मनीष गुजराथी आणि ला. अतुल आग्रवाल यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. या कार्यक्रमाला ला. सुरेश कट्यारे, ला. संजय सानप, ला. जितेंद्र जगताप, ला. सौ. तेजस्विनी वाजे, ला. डॉ. प्रतिभा गारे, ला. सौ. शिल्पा गुजराथी, ला. डॉ. सौ. भरीतकर, ला. सौ. संगीता कट्यारे, ला. सौ. संगीता वाजे, ला. सौ. अग्रवाल, ला. सौ. अर्चना चव्हाण ला.सौ जयश्री जगताप यांच्यासह क्लबचे अनेक सभासद उपस्थित होते.

# लक्ष्मण सावजी पक्ष निष्ठा जपणारा नेता : सतिश (बापू) सोनवणे



**नाशिक ।** निर्मोही वृत्ती, अतुट वैचारिक बांधिलकी आणि पक्षानिष्ठा ह्यांचा अपूर्व संगम म्हणजे लक्ष्मण सावजी होय. भारतीय जनता पक्षाच्या कुटुंबातील अत्यंत आदराने नतमस्तक व्हावं असं कुलीन आणि शालिन नांव असलेल्या लक्ष्मण सावजींचा वाढदिवस साजरा होतांना मन से वी आनंद होतो, असे मत भारतीय जनता पक्षाचे माजी सभागृह नेते सतीषबापू सोनवणे यांनी व्यक्त केले. नाशिकच्या मायको सर्कल येथे प्लेमेंट ग्रुपने आयोजीत केलेल्या सत्कार सोहळ्यात ते बोलत होते.

भाजपा अल्पसंख्यांक आघाडीचे राज्य उपाध्यक्ष गणेश कांबळे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. श्री सोनवणे म्हणाले की, सावजी म्हणजे निष्ठा, नीतिनुसार निश्चयी आचरण, कर्तृत्ववान व कर्तव्यपरायण कर्मयोगी. सावजी ही केवळ व्यक्ती नसून हे एक वंदनीय व्यक्तिमत्त्व आहे. आपल्या पक्षाप्रती केलेलं निःस्वार्थ समर्पण आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, जनसंघ आणि भाजप ह्या चढउतार पाहिलेल्या तीन स्थित्यंतरांशी ते सोबत राहिलेले कार्यकर्ते होते. देशभर रुजलेल्या, बहरलेल्या, पसरलेल्या भाजपच्या विस्तारात "सामान्य कार्यकर्ता" रुपात दिलेल्या निःस्वार्थ योगदानामुळे महाराष्ट्र प्रदेश प्रवक्तेपदाची जबाबदारी पक्षाने त्यांच्यावर सोपवली आहे. नाशिक शहरात भारतीय जनता पार्टीच्या मोठ्या विस्ताराला ज्यांनी अतोनात मेहनत घेतली, कष्ट केले त्यात सावजी यांचा आदराने उल्लेख करावाच लागेल. त्यांचे संपूर्ण जीवन संघर्षमय प्रवास आहे. सर्व क्षेत्रांची सखोल माहिती असलेले उत्कृष्ट वक्ता तसेच कुशल संघटक आहेत ते. सुसंस्कृतपणा व स्पष्टोक्तपणा हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील विशेष गुण आहेत. यावेळी दैनिक 'महासागर'चे संपादक प्रा. जयंत महाजन म्हणाले की, जनसंघाचा कार्यकर्ता म्हणून सावजी पुढे आले. राष्ट्रनिष्ठा व पक्षनिष्ठा असलेली ५५ वर्षांहून अधिक काळ कार्यरत असलेली त्यांची ही तपश्चर्या कौतुकास्पद व प्रशंसनीय आहे. "प्रगत समाजात जुन्या पिढ्यांनी नव्या पिढ्यांच्या प्रगतीचा मार्ग प्रशस्त करायचा असतो, हा विचार राजकारणात कुणीही करत नसतो; पण असा विचार लक्ष्मण सावजींसारखा एखादा दिलदार माणूसच करु शकतो. गणेश कांबळे यांनी सावजींचा जीवनपट उलगडून सांगीतला. प्रशांत कोतकर यांनी आभार मानले. यावेळी सर्वश्री प्रा. मीरजकर, शिवा देशमुख, काँग्रेसचे माजी नगरसेवक लक्ष्मणअण्णा धोत्रे, भाजपकडून इच्छुक मनपा निवडणूकीसाठी इच्छूक असलेले शिवा देशमुख, शशीभाई कन्सारा, बाबा शहा, के. एम. गारे.

### नितीन साळवेंमुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या

लक्ष्मण सावजी यांच्याशी ज्यांचा कुणाता संपर्क आला, ते कायम त्यांच्याशी समरस होऊन जातात. त्याला व्यवसाय, पक्ष अशी कधीही मर्यादा राहत नाही. परंतु त्यांचा वाढदिवस प्लेमेंट ग्रुपच्या वतीने साजरा करण्याचे ठरल्यावर सर्वांनी जातीने हजेरी लावली. त्यात बहुतांश भाजपचे नेते, कार्यकर्ते, पत्रकार व व्यावसायिक हजर होते. परंतु नुकतेच मनसेचा राजीनामा देऊन शिंदे गटात गेलेले नितीन साळवे यांनी देखील तेथे हजेरी लावल्याने भाजपमध्ये पुन्हा मोठ्या प्रमाणावर इन्कमिंग होणार का ? याबाबत चर्चा सुरू झाली. अर्थात साळवे यांनी त्यास नकार दिला असला, तरी नकार देणारेच भाजपमध्ये जाऊन पोहोचतात असा सर्वसाधारण सूर गर्दीत दिसून येत होता. काँग्रेसचे माजी नगरसेवक लक्ष्मण धोत्रेदेखील सावजींना शुभेच्छा देण्यासाठी हजर होते.

# नाशिकरोड ते जेआयटी महाविद्यालय बससेवा सुरु




**नाशिक ।** नाशिक महानगर परिवहन महामंडळ लि. अर्थातच सिटीलिंकच्या वतीने मार्ग क्रमांक २३१ नाशिकरोड ते गिरणारे हा नवीन बस मार्ग सुरु करण्यात आला आहे.

गेल्या काही दिवसांपासून जे.आय.टी महाविद्यालयातील विद्यार्थी प्रवाश्यांची महाविद्यालय मार्गावर बसफेरी सुरु करण्याची मागणी होत होती. त्यानुसार संपूर्ण सर्वेक्षण करण्यात आले आणि अखेर सोमवार दि. ४ ऑगस्टपासून सदर मार्गावर बसफेरी सुरु करण्यात आली आहे. **असा असेल नवीन मार्ग**- मार्ग क्रमांक २३१ – नाशिकरोड ते गिरणारे मार्गे द्वारका, सिव्हील, सातपूर, अशोकनगर, जे. आय. टी महाविद्यालय व पुन्हा त्याच मार्गाने परत येणार. **अशा असतील बसफेऱ्या**- नाशिकरोड ते गिरणारे – ०८:०० वाजता. नाशिकरोड ते गिरणारे – १०:०० वाजता. नाशिकरोड ते जे.आय. टी महाविद्यालय – १५:०० वाजता. जे.आय.टी महाविद्यालय ते नाशिकरोड – १६.३० वाजता ४ ऑगस्ट २०२५ रोजी पासून सदर मार्ग सुरु करण्यात आला असून, जास्तीत जास्त प्रवाश्यांनी या बससेवेचा लाभ घेण्याच आवाहन सिटीलिंकतर्फे करण्यात आले आहे.

# नाशिकमधील किराणा व्यापाऱ्यांची कोट्यवधींची फसवणूक प्रकरण

## आमदार प्रा. फरांदे यांनी केंद्रीय मंत्र्यांना पाठविले निवेदन

**नाशिक ।** नाशिकमधील किराणा व्यापारांची कोट्यावधींची फसवणूक ठेकेदाराकडून झाली आहे. याबाबत सोमवारी (दि. ४) व्यापाऱ्यांनी आमदार प्रा. देवयानी फरांदे यांची भेट घेतली. यातून मार्ग काढण्याची मागणी केली आहे. दरम्यान, आमदार फरांदे यांनी ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण विभागाचे केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांना याप्रकरणी तातडीने लक्ष देण्याची विनंती एका निवेदनाद्वारे केली आहे.

नाशिक शहरातील अंबड औद्योगिक वसाहतीमध्ये केंद्रीय वखार महामंडळाचे गोदाम असून, या ठिकाणी नाशिक शहरातील अनेक व्यापाऱ्यांनी आपला किराणामाल तसेच मिरची, मसाले, तांदूळ, ड्रायफ्रूट्स आदी वस्तूंची व भुसार मालाची साठवणूक केली आहे. केंद्रीय वखार महामंडळाचे हे गोदाम भाडेतत्त्वावर नवी दिल्ली नजीक असलेल्या गाजियाबाद येथील ठेकेदाराला दिले आहे. मात्र ठेकेदाराने केंद्रीय वखार महामंडळाचे भाड्याचे पैसे थकविल्यामुळे महामंडळाने नाशिक-अंबड एमआयडीसीमधील नाशिकमधील व्यापाऱ्यांचा साठवणूक केलेल्या किराणा मालाला सिल लावले असून एका दिवसाच्या नोटीसीवर आता त्या मालाचा किराणा मालाचा लिलाव देखील करण्यात येत आहे. याप्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात दोघा आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, या प्रकरणी व्यापाऱ्यांनी आमदार प्रा. देवयानी फरांदे यांची भेट घेतली असून, याप्रकरणी मार्ग काढण्याची मागणी केली आहे. आमदार फरांदे यांनी केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांना याप्रकरणी तातडीने लक्ष देण्याची विनंती एका निवेदनाद्वारे केली आहे. नाशिकमधील सुमारे २० किराणा व्यापाऱ्यांची केंद्रीय वखार महामंडळाच्या गोदामातील मालाची सुमारे ३ कोटी पेक्षा जास्त मालाचे अडवणूक करण्यात येत असून, अशा प्रकारची कोट्यावधी रुपयांची प्रथमच फसवणूक होत असल्याने याप्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संबंधित ठेकेदारांविरुद्ध कठोर कारवाईची मागणी व्यापाऱ्यांनी केली आहे. वास्तविक हे प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने याची कोणती पूर्वकल्पना न देता लिलाव जाहीर केला आहे. विशेष म्हणजे येथील व्यवस्थापकांना देखील या संदर्भात माहिती दिली. मात्र त्याची कोणतीही बाजू समजून न घेता मॅनेजरने व्यवस्थापकाने त्यांना तेथून हाकलून लावले. त्यामुळे सर्व व्यापाऱ्यांनी या संदर्भात कायदेशीर नोटीस दाखल करण्याचा निर्णय घेतला. मात्र आता कोणत्याही परिस्थितीत हा मालाचा लिलाव झाल्यास सुमारे २० व्यापाऱ्यांचे जवळपास ३ कोटींच्या मालाचे लिलाव होणार असून त्यांचे कोट्यावधीचे नुकसान होणार आहे. त्यामुळे व्यापाऱ्यांची व्यापाऱ्यांमध्ये घबराट निर्माण झाले आहे. या संदर्भात संबंधित ठेकेदाराने म्हणजेच आरजेव्हीएम प्रॉडक्ट कंपनीचे वैभव अग्रवाल, राज कुमार, जतीन गुप्ता (रा.गाजियाबाद, उत्तर प्रदेश) यांनी केंद्रीय वखार महामंडळाचे भाडे थकवल्यामुळे या महामंडळाने कोणताही मागचा पुढचा विचार न करता अंबड एमआयडीसी मधील आमच्या मालाला सिल लावले आहे. तसेच एका दिवसाच्या नोटीसीवर या मालाचा लिलाव देखील जाहीर केला आहे.

### केंद्राकडे घेतली धाव...

केंद्रीय वखार महामंडळहाभारत सरकारचा उपक्रम असून, देशभरात गोदामांचे जाळे निर्माण करून औद्योगिक व कृषी क्षेत्रास, अन्नधान्याची नासाडी होऊ नये म्हणून, साठवणुकीची सुविधा पुरविण्यासाठी या महामंडळाची निर्मिती केलेली आहे. औद्योगिक वस्तू, किराणामाल, कृषी गोदामांमध्ये धान्य साठवणूक इत्यादी मालाचे संरक्षण करणाऱ्या केंद्रीय वखार महामंडळ (सेंट्रल वेअर हाउसिंग कॉर्पोरेशन) या केंद्रीय स्तरावरील संस्थेची गोदाम पुरवठा साखळीत अत्यंत महत्त्वाची भूमिका आहे. मात्र भाडेकरूंच्या चुकांमुळे व्यापाऱ्यांच्या वस्तूंना ई-लिलावापासून संरक्षण देण्याची आणि सेंट्रल वेअरहाऊसिंग कॉर्पोरेशन, अंबड, नाशिककडून वस्तू सोडण्याची विनंती केंद्रीय मंत्र्यांना निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. नाशिक जिल्ह्यातील व्यापाऱ्यांच्या वतीने, आमदार प्रा. देवयानी फरांदे यांनी तातडीच्या लक्ष वेधण्यासाठी हे निवेदन सादर केले आहे. वेअर्स हाऊस मध्ये माल तथा वस्तू जमा करताना, त्यांना अशा कोणत्याही वादाची माहिती देण्यात आली नव्हती किंवा कोणत्याही जोखमीची जाणीव करून देण्यात आली नव्हती. कोल्ड स्टोरेजमध्ये साठवलेला माल पूर्णपणे या व्यापाऱ्यांचा आहे, तरीही आता त्यांना तृतीय-पक्षाच्या करारातील डिफॉल्टमुळे होणारे नुकसान सहन करावे लागत आहे. नाशिक जिल्ह्यातील अनेक लघु आणि मध्यम व्यापाऱ्यांच्या उपजीविकेला धोका निर्माण झाल्यामुळे ही बाब अत्यंत गंभीर आहे ,असेही या निवेदनात म्हटले आहे.

# मेंदूचा विकासच नाही तर आरक्षण कळणार कसे?

कोणतेही कारण नसताना आरक्षणाचा मुद्दा उकरून काढून, आरक्षणावर काही चुकिची माहिती देऊन वाद निर्माण करण्याचे काम मेंदूचा विकास न झालेले लोक करत असतात. आरक्षणाचा लाभार्थी असुनही आरक्षणा बद्दल चुकीचे विधान करणारे प्रत्येक जन बुद्धीने कमकुवतच असतो. आरक्षण जातीला आहे आणि त्यातही एकाच जातीला आरक्षण आहे असे समजणाऱ्यांनी तरी आपल्या बुद्धीची तपासणी करून घेणे आवश्यक आहे. कारण आरक्षण हे जातीला नसुन प्रवर्गाला आहे.

-----------------

महाराष्ट्राचा विचार केला तर महाराष्ट्रात ओबीसी प्रवर्गात २६१ जातींचा समावेश आहे. एसटी प्रवर्गात ४७ जातींचा समावेश आहे आणि एस सी प्रवर्गात ५९ जातीचा समावेश आहे. आणखी विशेष म्हणजे एस सी मधील महार जात सोडली तर बाकी अपवाद वगळता सर्व जाती हिंदू धमार्तीलच आहेत.

ही सर्वसामान्य माहिती ज्याला माहिती नाही तो बुद्धीने गरीबच समजावा. जवळपास सर्वच जातींना आरक्षणाचा फायदा मिळत असताना आरक्षणा बद्दल अपशब्द येतात कसे हा खरा मुद्दा आहे. आरक्षणाबाबत चुकीचे तेच लोक बोलतात एक तर त्यांची बुद्धी कमी आहे नाहीतर ते कोणाचे तरी गुलाम आहेत.

बरेच लोक म्हणतात आरक्षण हे जाती आधारित नाही तर आर्थिक निकषांवर पाहिजे. असे बोलणाऱ्या लोकांच्या डोक्यात मेंदू आहेच की नाही ही शंका निर्माण होते? कारण आरक्षण कोणत्या जातीला आहे? या प्रश्नाचे उत्तर त्यांच्याकडे नाही आणि आरक्षणाची गरज का पडली याचा इतिहास ज्यांना माहिती नाही त्यांनी आरक्षणावर बोलणे म्हणजे आपण निर्बुद्ध असल्याचे सिद्ध करणे होय.

आरक्षण समजण्यासाठी समाज व्यवस्था व इतिहास माहिती असणे आवश्यक आहे. दुसरी गोष्ट आरक्षणाचे लाभार्थी कोण आहेत हे माहिती असणे आवश्यक आहे. थोडक्यात सांगायचे झाल्यास महाराष्ट्रात तेली, साळी, कोळी, माळी, कुणबी, धनगर, बंजारा, वंजारी, अशा सगळ्याच जाती आरक्षणाचा लाभ घेणाऱ्या असतील आणि याच जातीतील लोक बुद्धीचा वापर न करता आरक्षणावर बोलत असतील तर ते आपल्याच समाजाचा घात करत आहेत.

आरक्षण आर्थिक निकषांवर नाही कारण आरक्षण गरीबी हटाव चा कार्यक्रम नसुन तो सामाजिक प्रतिनिधित्वाचा प्रश्न आहे. गरीबी हटावसाठी शासनाकडे वेगवेगळ्या योजना असतात त्यावर हजारो करोडो रुपये खर्च होतात. योजना कागदावर आणि पैसे राजकारण्याच्या घरात जातात तो भाग वेगळा पण आरक्षण गरीबी हटाव चा कार्यक्रम नाही.

गरीबी प्रत्येकाची दुर झालीच पाहिजे त्यासाठी सरकारला धारेवर धरून प्रत्येकाने प्रश्न विचारलेच पाहिजे. पण सरकारला प्रश्न न विचारता आरक्षणाला दोष देऊन गरिबी हटाव सोबत संबंध जोडणारा प्रत्येकजन हा बुद्धीने कमकुवत आहे. बरेच स्वंयघोषित विद्वान, सुशिक्षित लोक म्हणतात आरक्षण नकोस बुद्धीमत्तेनुसार संधी असायला हवी.

बुद्धीमत्ते नुसार संधी असायलाच हवी यामध्ये कुठेच दुमत नाही. पण प्रश्न हा आहे की आपल्याला बुद्धीमत्ता पचते का? बुद्धीमत्तेच्या गोष्टी करून आरक्षण नाकारणारे लोक खरचं बुद्धीमत्तेची कदर करणारे असते तर जगातील सर्वात बुद्धीमान महामानव, जगाचा उद्धारक ज्ञानाचा महासागर तथागत सिद्धार्थ बुद्ध आज त्यांच्या घरात असते. बुद्धीमत्तेची जाणीव असती तर सिम्बॉल ऑफ नॉलेज म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा गौरव संपूर्ण जग करते आणि आपल्या येथे त्यांनाच जातीत बंद केले जाते त्यांनी बुद्धीमत्तेच्या गोष्टी कराव्यात?



विनोद पंजाबराव सदावर्ते
समाज एकता अभियान
रा. आरेगांव, ता. मेहकर
९१३०९७९३००

बुद्धीमत्तेच्या गोष्टी करणारे बुद्धीहीन लोक संविधान एकाच जातीचे आहे असे म्हणतात त्यांनी बुद्धीमत्तेवर बोलावे म्हणजे स्वतः च स्वतःच्या बुद्धीने प्रदर्शन मांडणे होय. ज्या लोकांना तथागत गौतम बुद्ध, महात्मा फुले, शाहु महाराज डॉ बाबासाहेब आंबेडकर, संत कबीर, संत तुकाराम महाराज, संत तुकडोजी महाराज, संत गाडगेबाबा, संत नामदेव महाराज यांचे विचार व कार्य मान्य नसतील त्यांची बुद्धी किती विकसित असेल याचा अंदाज येतो.

तरीही ते म्हणत असतील बुद्धीमत्ते नुसार नोकरी मिळाली पाहिजे. तर नोकरी बुद्धीमत्ते नुसारच मिळते पण काही प्रश्नांची उत्तरे मिळाली तर चांगले होईल. लग्न बुद्धीमत्ता बघुन होतात की जात? मंदिरात प्रवेश नाकारला जातो बुद्धीमत्ता बघुन की जात? मंदिरात पुजारी असतात बुद्धीमत्ता बघुन की जात? आज पर्यंत भोंदू तयार झाले, पाखंडी तयार झाले, बलात्कारी तयार झाले लाखो लोक त्यांच्या पायावर झुकले बुद्धीमत्ता बघून की जात?

पाखंडी, बलात्कारी, भोंदू लोकांच्या पायावर लोटांगण घेणारे आणि महापुरुषांना वंदनही न करणाऱ्यांनी बुद्धीमत्तेवर बोलावे म्हणजे आश्चर्यच आहे. आरक्षण हा खुप खोल व गंभीर विषय आहे. आरक्षणामुळे अनेकांना प्रतिनिधित्व मिळाले. ज्यांना गाव बंदी होती, ज्यांच्या सावलीचा विटाळ व्हायचा, मडके बणवणारा, धान्य पिकवणारा, कपडे धुणारा, माळी काम करणारा, मेंढ्या राखणारा, दगड फोडणारा, मेलेली जनावरे ओढणारा आरक्षणामुळे कलेक्टर, पोलीस अधीक्षक सारख्या महत्वाच्या पदावर जाऊन बसले आणि त्यांचा सामाजिक विकास झाला.

आरक्षणावर चुकीचे बोलुन सामाजिक वातावरण दुषित केले जाते. पण सत्य परिस्थिती बघुन समाजाला जागृत करण्याची हिम्मत कोणी करत नाही. आरक्षणाचे लाभार्थी यांना गुणवत्ता धारक वाटत नसतील तर आपण ज्या ठिकाणी आरक्षण लागु नाही ती परिस्थिती बघू.

आता ज्या ठिकाणी आरक्षण लागु नाही तेथे जे बुद्धीमान लोक बसलेले आहेत त्यांच्या बद्दल बोलले तर जातीवाद होतो. तरीही आपण उदाहरण म्हणू बघु या. देशात आरक्षण सोडून आयएएस, आयपीएस कोण आहेत? आदिवासी समुहाचे जातप्रमाण पत्र घेऊन कोणी नोकऱ्या हडप केल्या? सर्वोच्च न्यायालयाचा व उच्च न्यायालयाचा मुख्य नायधिश होण्यासाठी कोणतेही आरक्षण नाही तेथे किती तेली, साळी, कोळी, माळी, धनगर, कुणबी, वंजारी, बंजारा लोक आहेत? का यांच्या कडे बुद्धीमत्ता नाही? का होऊ शकले नाहीत ते न्यायाधीश? एमपीएससी, युपीएससी मध्ये कुणबी, तेली, साळी कोळी, माळी, धनगर जाती सह ज्यांना ज्यांना आरक्षण आहे त्या उमेदवारांना लेखी परिक्षेत जास्त गुण मिळतात आणि मुलाखती मध्ये कमी गुण मिळतात हे कशामुळे? युपीएससी ची परिक्षा न घेता, आरक्षणाचा विचार न करता सरळ सचिव पदावर दरवर्षी खाजगी क्षेत्रातील उमेदवार बसवले जातात, त्यामध्ये किती कुणबी, मराठा, तेली, साळी, कोळी, माळी धनगर आहेत? यांच्या कडे गुणवत्ता नाही? याचा विचार कोणी करणार आहे की नाही?

औद्योगिक क्षेत्र व प्रसारमाध्यमांमध्ये आरक्षण नाही तर मराठा, तेली, कुणबी, माळी, धनगर, थोडक्यात आरक्षणाचा लाभ घेणाऱ्या लोकांच्या किती कंपन्या आहेत? यांच्या किती मोठमोठ्या बँका आहेत? किती टिव्ही चॅनल हे मराठा, कुणबी, माळी, धनगर तेली, साळी, कोळी, कुंभार यांचे आहेत? का यांच्याकडे कंपनी सुरू करायला, चॅनल सुरू करायला बुद्धीमत्ता नाही?

बर ते सोडा मराठा, कुणबी, माळी, धनगर तेली, साळी, कोळी, कुंभार या पैकी किती लोक मोठमोठ्या मंदिरात पुजारी आहेत? का यांच्या कडे बुद्धीमत्ता नाही? ज्या ठिकाणी आरक्षण नाही तेथे मक्तेदारी कोणाची आहे? तेथे एकच लॉबी कशी काय टिकुन आहे? हा मुळ प्रश्न असताना तो बाजूला सारून आरक्षणावर बोलुन बुद्धीचे प्रदर्शन मांडले जाते.

आरक्षणाच्या नावाखाली एकाच जातीला लक्ष केले जाते. जेथे आरक्षण नाही तेथे कोणत्या जातीचे लोक राहतात हा साधा प्रश्न जरी केला तरीही जातीवाद होतो. म्हणून आरक्षण हे सर्वांना समान संधी देऊन सामाजिक प्रवाहात सर्वांना समान करते. म्हणून सामाजिक आरक्षण हे भारतीय समाजाला खुप आवश्यक आहे.

विद्वत्तेच्या पोकळ गप्पा करणाऱ्या जर संविधानाचे गांभीर्य नसेल त्या व्यक्तीएवढा मंद व्यक्ती दुसरा कोणीही नसेल. म्हणून आरक्षणावर बोलणे, आरक्षण समजून घेणे, हे येड्या गबाळाचे काम नाही. फालतू सोशल मिडीयावर येऊन नको ते कुटाणे करून स्वतः आरक्षणाचे लाभार्थी असताना आणि सामाजिक विकासासाठी आरक्षणा शिवाय दुसरा पर्याय नसताना आरक्षणाबाबत चुकीचे बोलणे म्हणजे स्वतःच्या पायावर स्वतः च कुऱ्हाड मारून आपली बुद्धी किती कमकुवत आहे हे दाखवणे होय.

-----------------

(ही लेखकाची वैयक्तिक मते आहेत.)

# आमिषाचं षडयंत्र रचून लाडक्या बहिणींच्या भावनांशी खेळ

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना ही आर्थिकदृष्ट्या दुर्बल वर्गातील २१ ते ६५ वयोगटातील महिलांना आर्थिक मदत पुरवण्यासाठी सुरु केलेली एक महत्त्वपूर्ण योजना आहे. महिलांचे आर्थिक स्वातंत्र्य वाढवणे आणि सर्वांगीण विकास साधणे म्हणजेच राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी, त्यांच्या आरोग्य आणि पोषणामध्ये सुधारणा करून कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबूत करणे या उद्दिष्टांचा बनाव करून महाराष्ट्र सरकारने २०२४ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या काही महिन्यांपूर्वी लाडकी बहीण योजना सुरू केली होती.

-------------

महाराष्ट्रातील 'लाडकी बहीण योजना' निवडणुकीपूर्वी महिलांना भुलवण्यासाठी वापरण्यात आलेले एक षडयंत्र आहे. त्याद्वारे १५०० रूपये हप्ता देण्यात आला. मात्र, निवडणुकीनंतर निधीअभावी हप्ते थकले. योजनेमुळे राज्याची आर्थिक स्थिती विस्कटली. यामुळे इतर खात्यांचा निधी वळवला जात आहे. सरकारच्या या आर्थिक कोंडीमुळे लाडक्या बहिणींमध्ये नाराजी असून, २१०० रूपयांचा हप्ता तर कोसो दुरच राहिला, पण सध्या १५०० रूपयांचाही पत्ता नाही. राज्यावर कर्जाचा डोंगर वाढत असून सरकार फक्त आश्वासने देत आहे. ही 'लाडकी बहीण योजना' फक्त निवडणुकीसाठी वापरलेला फसवणुकीचा प्रकार आहे, असं म्हणायला हरकत नाही.

सध्या महायुती सरकारमधील तिन्ही भावांना लाडक्या बहिणींचा विसर पडल्याचं दिसून येत आहे. मे आणि जून महिन्याचा हप्ता काही लाडक्या बहिणींना अद्याप मिळालेला नाही, असं लाडक्या बहिणींची ओरड सुरु आहे. योजनेच्या तांत्रिक बाबींमुळे बहिणींच्या खात्यात हप्ता येणे थकले आहे. आता, ज्यांच्या कौटुंबिक उत्पन्नात वार्षिक एक लाख रुपये येतात, त्यांना या योजनेतून वगळण्यात येईल असे म्हणतात.

तुम्ही कोणतंही काम कराल तरी महिन्याला दहा हजार रुपये इतका पगार मिळतोच आणि प्रत्येक कुटुंबात एखादा तरी दहा हजार रुपये कमावणारा असतोच असतो. म्हणजे 'काम झालं माझं आणि काय करू तुझं' या उक्तीप्रमाणे इतर निकषांच्या आधारे कित्येक लाडक्या बहिणींना वगळण्याचा प्लॅन आहे. यावरून सिद्ध होते की, ही 'लाडकी बहीण योजना' फक्त निवडणुकीसाठी वापरलेला फसवणुकीचा प्रकार होता.

दुसऱ्या राज्याची संकल्पना उचलून महाराष्ट्रात महायुती सरकारने तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात 'लाडकी बहीण योजना' जाहीर केली आणि विधानसभा निवडणुकीच्या काही महिने आधी राज्यभरातील बहिणींना ३ महिन्यांचे प्रत्येकी १५०० रूपये प्रमाणे ४५०० रूपये खात्यात देऊन लाडक्या बहिणींच्या मतांची भाऊबीज आपल्या ओंजळीत घेतली.

पण हीच 'लाडकी बहीण योजना' आता पुन्हा निवडून आल्यावर राज्य सरकारला महागात पडत आहे. या योजनेद्वारे सुमारे दीड कोटी बहिणींना निधी वाटण्यात आला आणि नंतर कळले की निकषात न बसणाऱ्या बहिणींनाही हा निधी घेण्याचा मोह आवरला नाही. त्यामुळे राज्याची आर्थिक स्थिती विस्कटली. सध्या राज्याची आर्थिक अवस्था 'आमदनी अठ्ठनी खर्चा रुपया' अशी झाली आहे.



शब्दस्पर्शी सुनील शिरपुरे
कमळवेल्ली, यवतमाळ.
७०५७९८५४७९

राज्याचे अर्थमंत्री अजित पवार यांनी महाराष्ट्राचा आर्थिक पाहणी अहवाल अर्थसंकल्प अधिवेशनाच्या काळात विधिमंडळात मांडला. या अहवालात लाडकी बहीण योजनेची माहिती देण्यात आली. या योजनेत जून २०२४ पासून डिसेंबर २०२४ या ७ महिन्याच्या कालावधीत २ कोटी ३८ लाख लाभार्थी बहिणींना निधी देण्यात आला. हा निधी तब्बल १७,५०५ कोटी रुपये इतका होता.

'लाडकी बहीण योजना' ऐन निवडणुकीच्या तोंडावर जाहीर केल्यामुळे सरकारने होता नव्हता निधी वापरला. मात्र, पुन्हा निवडून आल्यावर काय करायचे? याचा विचार बहुधा केला गेला नाही. त्यातच पुन्हा सरकार यावे या हेतुने १५०० रूपयांचा हप्ता थेट २१०० रूपये करण्याचे आश्वासन दिले आणि महायुती सरकार मोकळे झाले. राज्यातील बहिणींनी त्यांच्यावर विश्वास ठेवून त्यांना पुन्हा निवडून दिले. त्यानंतर मात्र महायुती सरकारची पंचायत होऊ लागली.

या योजनेसाठी अर्थसंकल्पात तरतूदच केलेली नव्हती. मग काय, आर्थिक ताळमेळ बसवण्यासाठी इतर खात्यातील निधी वळवण्याची व पळवण्याची वेळ आली. लाडक्या बहिणींना एप्रिल महिन्याचा हप्ता ७ मे दरम्यान देण्यात आला होता. आता, मे ते जुलै महिन्याचे ४५०० रूपये कधी मिळणार, याची प्रतिक्षा आहे.

दरम्यान, अर्थमंत्री अजित पवार यांनी लाडकी बहीण योजनेत चूक झाल्याचे जाहीर केले. त्यामुळे निधी मिळणार की नाही, हा प्रश्न उपस्थित झाला आहे. लाडकी बहीण योजनेत १५०० रूपयांचा हप्ता २१०० रूपये कधी होणार हे तर दुरच राहिले. आता १५०० रूपये तरी मिळणार की नाही, असा प्रश्न बहिणींना पडत आहे.

राज्यासमोर आर्थिक संकट वाढत आहे. महसुली उत्पन्नापेक्षा खर्च जास्त आहे. कर्ज व व्याजापोटी मोठी रक्कम खर्च होत आहे. भांडवली खर्चासाठी दुसरे कर्ज काढण्याशिवाय पर्याय नाही. आर्थिक पाहणी सर्वेक्षण अहवालातून राज्याची गंभीर स्थिती समोर आली आहे. म्हणजे खर्चाच्या तुलनेत उत्पन्न कमी आहे.

कर्ज आणि व्याजापोटी राज्यावरील कर्जाचा डोंगर वाढत चालला आहे. यामुळे खर्च भागवताना अडचणी येत आहे. दरम्यान, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी सरकारी कर्मचा-यांना लाभ बंद केल्याबाबतची माहिती दिली.

५ महिन्यांपूर्वी लक्षात आले की सरकारी महिला कर्मचारी लाभ घेत आहेत. त्यामुळे त्यांना बंदी घालण्यात आली. आता तर महिला आणि बालविकास विभागाने केलेल्या ऑडिटमध्ये असे आढळून आले आहे की, लाडकी बहीण योजनेअंतर्गत १४,००० हून अधिक पुरुषांनी फसवणूक करून आर्थिक लाभ मिळवले आहेत.

ऑडिटमध्ये असे म्हटले आहे की या योजनेअंतर्गत १४,२९८ पुरुषांना २१.४४ कोटी रुपये वितरित करण्यात आले. पण जेव्हा सरकारी महिला कर्मचारी आणि पुरुष लाभ घेत होते, तेव्हा निकष तपासणारे काय करत होते? त्यामुळे या पुरुषांवर कार्यवाही होणार का आणि त्यांच्याकडून दिलेली रक्कम वसूल करण्यात येईल का? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

आतापर्यंत सर्वच निकषांच्या आधारे अर्जाची पडताळणी सुरू होती. त्यामुळे जवळपास ५० लाख बहिणींना वगळण्यात आले. ही पडताळणी पुढेही सुरू ठेवली असती, पण येणाऱ्या मनपा, नप, जिप, पंस व ग्रापं निवडणुकीचा विचार करता ही प्रक्रिया तात्पुरती बंद करण्यात आली. एवढेच नव्हे तर रक्षाबंधनचे औचित्य साधून ज्या बहिणींचे मे पासूनचे हप्ते थकले, त्यांना मे ते ऑगस्ट असे ४ महिन्यांचे प्रत्येकी १५०० रूपये प्रमाणे ६००० रूपये तर चालू बहिणींना जुलै व ऑगस्ट असे २ महिन्यांचे प्रत्येकी १५०० रूपये प्रमाणे ३००० रूपये देऊन आमिषांच्या षडयंत्रात अडकवण्याचा प्रयत्न सुरु आहे.

परंतु लाडक्या बहिणींच्याही आता लक्षात येऊ लागले आहे की, हे महायुतीचे सरकार फसवे आहे. म्हणून लाडक्या बहिणींनो सरकार कोणतीही अक्कल लढविली, तरी त्यांच्या अकलेच्या तमाशाला भुलून जावू नका आणि त्यांच्या चक्रव्युहात अडकू नका.

तसं पाहता महायुती सरकारमध्ये जनतेला फेस करण्याची ताकद उरली नाही. म्हणूनच तर जन सुरक्षा विधेयक पारीत करून सामान्य जनतेच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणण्याचा व सर्वाधिकार हिरावून घेण्याचा प्रयत्न सुरु आहे. पण लाडक्या बहिणींनो तुमच्यात हे विधेयक हाणून पाडण्याची ताकद आहे. त्यामुळे ते पारीत होण्यापूर्वीच हाणून पाडा. एकदा का हे विधेयक पारीत झाले तर मग कोणत्याच गोष्टीसाठी तुम्ही लढू शकणार नाही. त्यामुळे आताच जागे व्हा, उठा आणि लढा..! ■ ■ ■

# पाठीचा कणा, मणक्याचे विकार आणि आयुर्वेद

मागील काही वषार्पासून मणक्याचे विकार व त्याच्याशी संबंधित पाठ दुखी, कंबर दुखी, मान दुखी खूप प्रमाणात वाढली आहे.

**स्पॉन्डिलायटिस :**

हा शब्द वाचता चटकन तुमच्या डोळ्यांसमोरया आजाराने ग्रस्त असलेल्या असंख्य व्यक्तींचे नाव पुढे आली असतील. प्रथम बरेच दिवस हात दुखणे, मान दुखणे, सकाळी पाठ दुखणे, कंबर दुखणे, खांद्याला कळ लागणे ही लक्षणे दिसतात.

मेंदूकडून संपूर्ण मास पेशींना आदेश देण्याकरिता मणक्यांमधून वात नाडया, त्या त्या मांसपेशीना जात असतात . या मणक्यामध्ये एक मऊ गादी असते या गादीमुळे पण मणके एकमेकांना घासले जात नाही व या वातनाडी आपल्या संदेशवहनांचे कार्य आव्हतपणे करीत असतात. काही कारणांनी गादी झिजली गेली की मणक्याचे संघर्ष सुरू होणे व वातनाडीवर दाब पडून विविध लक्षणे निर्माण होतात. मानेपासून कमरेपर्यंत कुठलीही विकृती घडू शकते.

परंतु मान व कंबर हे भाग सातत्याने ताणवतात असतात हालचालीत असतात, फिरत असतात म्हणून हे दोन भाग प्रथम घासले जातात, याच्या तीव्रतेवरून मणक्याचे अनेक विकार निर्माण होतात . पाठीच्या मणक्यामध्ये सहजासहजी अधिक आघात झाल्याशिवाय बदल होताना दिसत नाहीत. त्यामुळे मणक्याच्या गादीचे पोषण झाल्याशिवाय ही व्याधी बरी होणार नाही.

**आयुर्वेदाचे उत्तम उत्तर :**

ही व्याधी आयुर्वेदिक चिकित्सेने सहज थांबू शकते, पुराण काळापासून संधी हाड यासाठी आयुर्वेदिक चिकित्सा प्रसिद्ध आहे. आयुर्वेदिक निदान पद्धतीमध्ये सूक्ष्म विचार केला जातो वाताच्या विकृतीने अस्थिद्धातू व मज्जा धातू यांना विकृती होत असते.

व्यक्तीप्रमाणे हे निदान बदलले जाते व त्यामुळे औषधी चिकित्सा, पंचकर्म चिकित्सा बदलते.

मणक्याच्या विकाराचे निष्कर्ष काढल्यास असे दिसून येते की, बँकेतील कर्मचारी दिवसभर कॉम्प्युटरवर काम करतात शिक्षक, कंपनीमध्ये विशिष्ट चालीत काम करणारे , वजन उचलणारे, शेतात पुढे वाकून काम करणारे या व्यक्तीमध्ये मणक्याचे विकाराचे प्रमाण अधिक आहे. उच्चपदस्त व्यक्तिमध्ये मान खाली घालून, गाडीत विशिष्ट स्थितीतील बसून राहण्याचे हा आजार बळवताना दिसतो. सतत थंड हवेच्या संघर्षात असल्याने वात वृद्धी होऊन स्थानी जखंडून मणक्यांना त्रास संभवतो.

रस्त्यावरील गातीरोधक रस्त्यावरील खड्डे दुचाकी वाहनांवर जास्त फिरणे व या कारणांनी मणक्यावर अधिक ताण पडून गादीला जखम पोहोचते.



**आयुर्वेदिय चिकित्सा :**

मणक्याच्या विकारांमध्ये बसून उठताना, झोपून उठताना चक्कर येणे, फेकल्यासारखे होणे ,ही लक्षणे हल्ली जास्त दिसून लागलेली आहेत .वात नाडीवरील दाबामुळेच ही लक्षणे निर्माण होतात.

**उपचार :**

वेदनाशामक औषधे घेणे ,तात्पपुरते वजन लावून दाब कमी करणे, हे उपचार तात्पुरतेच असतात,परंतु आयुर्वेदिक दृष्ट्या आहार , विहार व व्यायाम वातनाशक औषधे याचा संगम केल्यास संपूर्ण आराम मिळताना अनेकांना दिसतो.

**औषधी चिकित्सा :**

रुग्णांच्या प्रकृती प्रमाणे वात नाशक अमृता गुग्गुळ,केशर गुग्गुळ सुवर्णकल्प असलेले बृहत्वात चिंतामणी रस, सुर्वणमालिनि,कुमार कल्याण, तसेच एकांगवीर, महावत विध्वंस वापरता येतात.

ही औषधे वेदना तर कमी करतातच, वातनाळ्यांमध्ये पोषण करून शक्तीही देतात. वातांचे नियमन करताना शरीरतील वात सम झाल्यास मणक्याचे सांध्याचे पोषणही उत्तम होऊन आराम मिळतो. सांध्याचे पोषण करणे ही कल्पना आयुर्वेदाचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल.

**मलावष्टंभ :**

शौचाला साफ होऊन वात सरणे हे वात दुष्टीचे कारण नष्ट करण्याकरिता एरंड तेलासारखे औषध नाही . कोरडेपणा आणून वात वाढणारे रोचक वापरू नये.

**पंचकर्म चिकित्सा :**

पंचकर्माचा उपयोग मणक्याच्या विकारांमध्ये एखाद्या चमत्कारासारखा होताना दिसतो- स्नेहन, स्वेदन, बस्ती , कटी बस्ती , हे प्रकार या विकारावर वैशिष्ट्य तेलाचा उपचार करून वापरता येतो.

स्नेहन-मणके हे साधे असून वाताचा अधिकार त्याच्यावर जास्त असतो.सांध्यांमधील स्तंभता, जखडणे, स्नायूचे आकुंचन हे वाताचे रुक्ष गुण वाढण्याचे फलित असते. स्नेहा नाणे ही विकृती काढते मलावष्टभाने वाढलेला वात मणक्याच्या व्याधीचे मुख्य कारण ठरतो.

**आहारीय कारणे :** फास्टफुड, मधाचे विविध पदार्थ, आंबवलेल पदार्थ, शीतपेय शीळ अन्न यांनी वात वाढतो.

पंचकर्मातील तेल हे व्याधी, अवस्था, स्थिती, वय याचा विचार करून विविधतेलांनी अभंग करतात. यात मधुमेह, स्थूल व्यक्ती, स्त्रिया बालक याप्रमाणे वेगवेगळे तेल घेतले जातात. जसे मधुमेही साठी धन्वन्तरम, बलातेल, बला अश्वगंधादी तेल, सहचारादि, अमृतादि तेल.

स्वेदन - औषधाची स्टीम सामान्यत : दशमुळे, बला , निर्गुडी इं वनस्पतीचे काढे वापरतात.

**बस्ती :**

वाताच्या नियमाची श्रेष्ठ चिकित्सा

शुद्धनिर्जूक्त, तूप, काढे यांचा बस्ती ३, ५, ७, १४, २१दिवस दिला जातो.

तेल तूप शरीराते राहून मणक्याचे, सांध्याचे वातनाडीचे तात्काळ पोषण करून परिणाम दाखवतात.

याप्रमाणे कटीबस्ती , पिंडस्वेद, विविध आसने आणि आहार-विहारमध्ये बदल करून, आयुर्वेदिक औषधे व पंचकर्म घेऊन करून आपण नक्कीच आपल्या पाठीच्या मणक्याची काळजी घेऊ शकतो व पाठीचा कणा ताठ करून आजारापासून मुक्त होऊ शकतो .सर्व प्रक्रिया औषधेही तज्ञ आयुर्वेदिक व पंचकर्म तज्ञ वैद्याकडून घ्यावे.

Dr. Priya Authentic Ayurveda
Panckarma Centre
Benam chowk, Beside Bank of Baroda,Sai Nagar
7588085975

■ ■ ■

## वाचक लिहितात

### राखीची सात्विकता जपूयात

बहीणभावांचे प्रेम वृध्दींगत करणारा रक्षाबंधन हा सण सगळीकडे आनंदाने साजरा होतो. प्रत्येक बहीण भावाला, भाऊ नसेल तर नात्यातील एखाद्या भावाला किंवा मानलेल्या भावाला राखी बांधते.

सध्या अधुनिकतेच्या नावाखाली राख्यांचे विविध प्रकार पहायला मिळतात. ॐ, स्वस्तिक, देवतांची चित्रे असलेल्या राख्या तसेच अनेक प्रकारचे वेडेवाकडे हावभाव करणाऱ्या कार्टूनच्या राख्या रक्षाबंधनाच्या सणापूर्वीच बाजारात विक्रीस येतात. ॐ, स्वस्तिक, देवता यांच्या राख्या सात्विक असल्या तरी सण झाल्यावर इकडेतिकडे , कचऱ्याच्या ढिगाऱ्यात पडलेल्या दिसतात. प्रसंगी पायदळी तुडवल्या जातात. यामुळे या चिन्हांचा, देवतांचा अपमानच होतो. कार्टूनच्या राख्या ह्या आकर्षक रंगसंगती व पोषाखातील असल्याने घेणारा त्याकडे आकर्षित होऊन खरेदि करतो. कार्टून राख्या असात्विक असतात. कार्टूनच्या राख्यांमुळे लहान मुले शास्त्र माहीत नसल्याने थोडावेळ आनंदीत होतात. अशा राख्या बांधून अध्यात्मिक लाभ होत नाही व सणाचा हेतू साध्य होत नाही. सणाचा आनंद मिळवण्यासाठी शास्त्र समजून घेऊन सात्विक राख्या बांधूयात.

■ दिपाली गिते, सातारा.

### कान उपटूनही वाचाळवीर सूसाट

महायुती सरकारमध्ये वादग्रस्त विधान करण्याची काही आमदार आणि मंत्र्यांमध्ये जणू स्पर्धाच लागली आहे, त्यात भाजपा आणि शिंदेसेनेचे मंत्री, आमदार आघाडीवर दिसतात. मंत्री आणि आमदारांच्या अशा बेताल वक्तव्यांमुळे समाजातून संताप व्यक्त होत असल्याने आणि सरकारची छी थू होवू लागल्याने अखेर मुख्यमंत्री फडणवीस यांनी काही मंत्र्यांचे कान उपटले, समज दिली, माणिकराव कोकाटे या मंत्र्यांचे खाते बदलण्यात आले. तरीही, वाचाळवीर आटोक्यात येत नसल्याचे दिसते, मनोहर भिडे नावाचा एक माणूस गेली कित्येक वर्षे वादग्रस्त विधान करून समाजात दुही निर्माण करण्याचे, विष कालवण्याचे काम करतो, आजही त्याने सर्वधर्म समभाव म्हणजे ना धड पुरूष.. ना धड स्त्री... लाल किल्ल्यावर भगवा फडकवा.. असे वादग्रस्त विधान केले आहे, सरकारची याला फूस आहे का? असल्या विकृतीवर कारवाई का होत नाही?

■ भूषण पाटील, नागपूर.

# दीर्घायुष्यासाठी हे ७ नियम पाळा



आजच्या काळात १०० वर्षांपेक्षा जास्त जगणं, तेही पूर्णपणे निरोगी आणि सक्रिय राहून, हे अनेकांना अशक्य वाटतं. पण एका १०१ वर्षांच्या डॉक्टरने हे शक्य असल्याचं सिद्ध केलं आहे. या डॉक्टरने आपल्या आयुष्यात काही साध्या पण महत्त्वाच्या सवयी अंगीकारल्या, ज्या त्यांनी दीघार्युष्याचे रहस्य म्हणून जगासोबत शेअर केल्या आहेत. हे नियम कोणत्याही महागड्या औषधोपचारांवर किंवा विशिष्ट जनुकीय रचनेवर आधारित नाहीत, तर रोजच्या जीवनातील निवडक सवयींवर अवलंबून आहेत.

**डॉक्टरचे ७ लाइफस्टाइल सीक्रेट्स**

या डॉक्टरने अनेक दशकांपासून या सवयी पाळल्या आहेत आणि आता ते त्या जगाला सांगत आहेत.

**तंबाखूला ना म्हणा :** या डॉक्टरने नेहमीच धूम्रपानापासून स्वतःला दूर ठेवले. धूम्रपान हे अकाली मृत्यूचे एक मोठे कारण आहे, असे ते ठामपणे मानतात.

**दारूचे सेवन टाळा :** त्यांनी कधीही दारूचे सेवन केले नाही. त्यांच्या मते, दारूमुळे कर्करोग आणि इतर गंभीर आजारांचा धोका वाढतो, ज्यामुळे आयुष्य कमी होतं.

**जिमऐवजी मैदानी व्यायाम :** त्यांच्या फिटनेसचे रहस्य गार्डनिंग आणि घराबाहेर केलेली कामे आहे. जिममध्ये जाऊन कठोर व्यायाम करण्याऐवजी, ते नैसर्गिकरित्या सक्रिय राहण्यावर भर देतात. ते सांगतात की, विशेषतः ४० ते ७० या वयामध्ये सक्रिय राहणे खूप महत्त्वाचे आहे, कारण याच काळात आरोग्याच्या समस्या सुरू होतात.

**इंटरमिटेंट फास्टिंग :** निरोगी वजन आणि चयापचय क्रिया उत्तम ठेवण्यासाठी ते फक्त नाश्ता आणि दुपारचं जेवण करतात, रात्रीचं जेवण टाळतात. यामुळे शरीराला आराम मिळतो आणि पचनशक्ती सुधारते.

**आयुष्यभर शाकाहार :** गेल्या 20 वर्षांपासून ते शाकाहारी आहेत. त्यांच्या आहारात दूध आणि अंडी यांचा समावेश आहे, पण कोणत्याही प्रकारचे मांस नाही. शाकाहारामुळे अनेक गंभीर आजार टाळता येतात, असा त्यांचा विश्वास आहे.

**गोड पदार्थ कमी करा :** ते अतिरिक्त साखरेऐवजी फळे आणि इतर नैसर्गिक गोड पदार्थांना प्राधान्य देतात. यामुळे लठ्ठपणा आणि हृदयरोगाचा धोका कमी होतो.

**सॅचुरेटेड फॅट टाळा :** त्यांच्या आहारात सॅचुरेटेड फॅट कमी असते, ज्यामुळे हृदयरोगाला प्रतिबंध होतो आणि रक्तवाहिन्या निरोगी राहतात.

या डॉक्टरची गोष्ट आपल्याला हे शिकवते की, निरोगी आणि दीघार्युष्यासाठी कोणत्याही विशिष्ट डाएट किंवा महागड्या उपचारांची गरज नाही. साधेपणा, सातत्य आणि शिस्त या तीन गोष्टींवर त्यांनी जोर दिला. ■ ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### खिरापत

आळीपाळीने
मंत्रीपद घेवू
वाटून सारे
खिरापत खाऊ..

जगा व जगू द्या
आमचे आहे तत्व
टिकून राहिले पाहिजे
भौ पक्षाचे अस्तित्व...

स्वार्थासाठीच आम्ही
हात मिळवणी करतो
राजकीय फायदे
पदरात पाडून घेतो!

# कुलाब्यातील पालिका शाळा बंद करण्याचा घाट

**मुंबई, दि. ५ : प्रतिनिधी**

कुलाब्यातील महापालिकेच्या शाळा संकुलातील सी-1 शाळेची इमारत धोकादायक ठरवून रिकामी करण्यात आली आहे. तर सी-2 ही इमारत केवळ दुरूस्ती करण्याचे आदेश असताना अचानक धोकादायक ठरविण्यात आली आहे. त्यामुळे कुलाब्यातील महापालिकेची शाळा बंद करण्याचा डाव असल्याचा आरोप राज्य शिक्षक परिषदेने केल आहे.

सी-2 ही इमारत नोव्हेंबर 2024 ला संबंधित अधिकाऱ्यांनी दुरुस्ती करण्यासाठी पत्र दिले. तर 1 मे 2025 रोजी या इमारतीत मुले बसण्यास काहीच हरकत नसल्याचे सांगण्यात आले. तर जून 2025 अखेरीस अचानक शाळा धोकादायक असल्याचे सांगत शाळाच बंद करण्यात आली. एकाच वेळी दोन्ही इमारती रिकाम्या केल्याने येथे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची प्रचंड मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे.

गैरसोयीमुळे कुलाबा इंग्रजी प्राथमिक शाळेतील मुले 15 जुलै पासून शाळेत येत नाहीत. कारण बसण्यास जागा नाही. तब्बल 20 दिवस मुले शाळेवाचून भटकत असल्याचे समजते. 200 पालकांनी शाळा सोडल्याचे दाखले काढून घेऊन खासगी शाळेत प्रवेश घेतल्याने महापालिकेची ही शाळा प्रशासनाला बंद करायची आहे काय, असा सवाल राज्य शिक्षक परिषदेने केला आहे.

याबाबत परिषदेचे कार्यवाह शिवनाथ दराडे यांनी सांगितले की, स्कूल इन्फ्रास्ट्रक्चर डिपार्टमेंट यांनी ही बाब मे महिन्यात केली असती तर सत्र सुरु झाल्यानंतर अचानक अशी समस्या उदभवली नसती. प्रशासनाने अचानक असा निर्णय घेतल्याने शाळेला जागा कोठे मिळणार किंवा एकदम इतर शाळेत प्रवेश कसा मिळणार ही मोठी समस्या असल्याने उच्च पदस्थ अधिकाऱ्यांनी तत्काळ लक्ष घालण्याची गरज आहे.

या निर्णयामुळे सदर शाळेत शिकणाऱ्या सुमारे 1500 विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार आहे. त्यामुळे याप्रकरणाकडे लक्ष देण्याचे आवाहन निवेदनाद्वारे महापालिका आयुक्तांना केल्याचे दराडे यांनी सांगितले.

# सर्वधर्मसमभाव म्हणजे नीचपणा, ढोंगीपणा आणि षंढपणा संभाजी भिडे यांचे अजून एक वादग्रस्त निंदनीय वक्तव्य

**नाशिक, दि. ५ : प्रतिनिधी**



आपल्या प्रत्येक भाषणात वादग्रस्त विधान करणारे श्री शिवप्रतिष्ठानचे प्रमुख संभाजी भिडे यांनी नाशिक येथील कार्यक्रमात पुन्हा एकदा असेच विधान करुन नवीन वाद ओढवून घेतला आहे. यावेळी त्यांनी देशाच्या सर्वधर्मसमभावावर टिकास्त्र सोडले. सर्वधर्मसमभाव म्हणजे नीचपणा, ढोंगीपणा आणि षंढपणा आहे. ध्वज म्हणजे देशाच्या एकात्मतेचे प्रतीक. भगव्या ध्वजाचा उल्लेख विद्वानांनी सूर्य आणि केतू केला आहे. त्यामुळेच छत्रपती शिवराय आणि संभाजी महाराजांनी भगव्यासाठी शेवटपर्यंत संघर्ष केला, आता दिल्लीच्या लाल किल्ल्यावर 15 ऑगस्टला भगवा फडकविण्यासाठी एकसंघ व्हावे, असे आवाहनही संभाजी भिडे यांनी केले. आंबे खाल्याने मुलं होतात, असे वादग्रस्त विधान नाशिकमध्येच यापूर्वी केल्यानंतर पून्हा एकदा नाशिकमध्येच त्यांनी वादग्रस्त विधान केले. नाशिक येथील राणे नगरात श्री शिवप्रतिष्ठान नाशिक महानगराच्या वतीने सोमवारी सायंकाळी भिडे गुरूजी यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी भिडे यांनी सर्वधर्मसमभावावर टीका केली. आपण सर्वधर्मसमभाव म्हणत असलो तरी हे हिंदू राष्ट्र आहे. आपण हिंदू राष्ट्रासाठी जगले पाहिजे. हिंदुस्तानच्या राष्ट्राची वाटचाल 96 हजार वर्षांपासून आहे. यात उदंड परिवर्तने झाली. देश, देव, धर्म आणि हजारो वर्षांचा इतिहास साक्षी ठेऊन मी बोलतो. 1794 ते 1803 या काळात लाल किल्ल्यावर भगवा फडकवला गेला, असा इतिहास सांगतो. त्याचे भान ठेवा. स्वराज्य अजिंक्य ठेवण्यासाठी सिंधू आणि सप्त नद्या यावर आपले वर्चस्व ठेवले पाहिजे. कारण अजूनही नद्यांच्या आजूबाजूचा परिसर परकीयांच्या ताब्यात असल्यासारखा दिसतो. सर्वच राज्ये आपली आहेत. परंतु, देशाच्या तोंडावर असणारे राज्य म्हणजे महाराष्ट्र आहे. कारण, या राज्यात शिवछत्रपतींच्या जीवनातील मोठे प्रसंग आहेत. छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांनी संघर्ष करणारा, लढणारा समाज निर्माण केला. छत्रपती शिवाजी महाराजांचा हा वारसा पुढे चालविण्यासाठी हिंदुस्तानशी असलेले नाते सोडता कामा नये, असे आवाहन भिडे यांनी केले.

श्री शिवप्रतिष्ठान नाशिक महानगराच्या वतीने उभारलेल्या 51 फुट उंच हिंदवी स्वराज्य स्तंभाचे अनावरण भिडे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी विविध आखाड्यांचे संत, महंत, धारकरी आणि हिंदुत्ववादी संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. कुठलाही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलिसांनी मोठ्या प्रमाणावर बंदोबस्त तैनात केला होता.

# मुंबई महानगरपालिका, अदाणी इलेक्ट्रिसिटी आणि अदाणी फाऊंडेशन यांच्यातील 'प्रोजेक्ट उत्थान'च्या परवाना प्रमाणपत्राचे हस्तांतरण

**मुंबई, दि. ५ : प्रतिनिधी**



मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभाग अंतर्गत कार्यरत शाळांमधील विद्यार्थ्यांची पायाभूत साक्षरता आणि संख्याशास्त्र (एफएलएन) बळकट करण्याच्या उद्देशाने बृहन्मुंबई महानगरपालिका, अदाणी इलेक्ट्रिसिटी आणि अदाणी फाऊंडेशन यांच्यात 'प्रोजेक्ट उत्थान' हा प्रकल्प राबविला जात आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका आणि अदाणी समूह यांच्यात या प्रकल्पासंदर्भातील परवाना प्रमाणपत्र आज (दिनांक ०४ ऑगस्ट २०२५) बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालयात हस्तांतरित करण्यात आले.

बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक श्री. भूषण गगराणी, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) डॉ. अमित सैनी, उपायुक्त (शिक्षण) श्रीमती प्राची जांभेकर, अदाणी समुहाचे व्यवस्थापकीय संचालक श्री. कंदर्प पटेल, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. रमेश शर्मा, श्री. शनय शहा, श्री. कैलास शिंदे, श्री. जतीन उपाध्ये, श्री. सुबोध सिंग आदी यावेळी उपस्थित होते.

बृहन्मुंबई महानगरपालिका, अदाणी इलेक्ट्रिसिटी आणि अदाणी फाऊंडेशन यांच्यात शिक्षणकेंद्रीत सार्वजनिक-खाजगी भागीदारी अंतर्गत २०२१ पासून 'प्रोजेक्ट उत्थान' हा प्रकल्प राबविला जात आहे. केंद्र शासनाच्या 'निपूण भारत मिशन'शी सुसंगत असलेला हा प्रकल्प राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (२०२०) च्या मुलभूत तत्वांना मूर्त रुप प्रदान करतो.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाने जानेवारी-एप्रिल २०२५ मध्ये इयत्ता दुसरीच्या सर्व ३१००० विद्यार्थ्यांना घेऊन प्रायोगिक तत्वावर एक प्रकल्प राबविण्यात आला. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणात लक्षणीय प्रगती दिसून आली आहे.

याच पार्श्वभूमीवर, या प्रकल्पाचा २०२५-२६ ते २०२७-२८ या तीन शैक्षणिक सत्रांसाठी आणि इयत्ता पहिली ते चौथीच्या मधील सर्व विद्यार्थ्यांसाठी आता विस्तार करण्यात आला आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ९४७ शाळांमधील इयत्ता पहिली ते चौथीच्या सुमारे दीड लाखांहून विद्यार्थ्यांना याचा लाभ होईल. देशात इतक्या व्यापक प्रमाणावर कार्यरत असलेल्या प्रकल्पांपैकी हा एक प्रकल्प आहे.

या अंतर्गत, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासातील महत्वाचा घटक असलेल्या पायाभूत साक्षरता आणि संख्याशास्त्र (फाऊंडेशनल लिटरसी अँड न्यूमरसी, एफएलएन) बळकट करण्यावर भर दिला जाईल. त्यासाठी शाळांमध्ये एकूण ३१६ प्रशिक्षित उत्थान सहायक महिलांची नेमणूक करण्यात येईल. शाळेत नियमित न येणारे, शिक्षणात अधिक रस नसणारे किंवा बौद्धिक स्तर कमी असलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी या सर्व उत्थान सहायक संबंधित शाळेतील शिक्षकांना सहाय्य करतील. विद्यार्थ्यांचे दैनंदिन मूल्यमापन, प्रत्येक विद्यार्थीकेंद्रीत अध्ययन आदी बाबीही यात अंतर्भूत असतील. तसेच, इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांची गुणात्मक प्रगती साधण्यासाठी त्यांना सराव साहित्य पुरविण्यात येईल. या प्रकल्पासाठी लागणाऱ्या संपूर्ण आर्थिक खर्चाची जबाबदारी अदाणी इलेक्ट्रीसिटी आणि अदाणी फाऊंडेशनने घेतली आहे. तर, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाकडून या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातील.

# माजी आमदार राहुल मोटे यांनी हाती बांधले घड्याळ;अजितदादा पवारांनी केले स्वागत

**मुंबई, दि. ५ : प्रतिनिधी**



स्वर्गीय यशवंतराव चव्हाणसाहेबांनी आपल्याला बेरजेचे राजकारण शिकवले आणि ते आपण करतोय. जातीभेद, धर्म, पंथ न बाळगता एकत्र नांदण्याचा प्रयत्न करत आहोत. छत्रपती शिवाजी महाराजांनी अठरापगड जातीच्या लोकांना घेऊन हिंदवी स्वराज्य निर्माण केले. त्यामुळे जातीय सलोखा राखण्याची जबाबदारी आपली असली पाहिजे. लोकांचे प्रश्न त्यांच्यात मिसळून सोडवले गेले पाहिजे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज केले. शरदचंद्र पवार गटाचे भूम-परांडा विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार राहुल मोटे यांनी आज आपल्या असंख्य कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जाहीर प्रवेश केला.

पक्षाच्या वाढीसाठी नवीन कार्यकर्त्यांची उभारणी करायची आहे. त्यासाठी वडीलधा-या लोकांचा आशिर्वाद घ्यायचा आहे. आणि त्यांच्या सहकार्यानेच पक्षाची बांधणी करायची आहे. हे सांगतानाच पक्षाची स्थापना अशाच ज्येष्ठ लोकांच्या आशिर्वादाने झाली आणि आज पक्ष २६ वर्षाचा झाल्याचे अजित पवार म्हणाले.

सत्तेच्या विरोधात जाऊन विकासकामे होत नसतात तर सत्तेत राहून जनतेची कामे होत असतात. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका येत आहेत. त्यादृष्टीने कामाला लागा. भेदभाव न करता आपल्या पक्षाला कसे यश मिळेल याकडे लक्ष द्या. चुकीच्या पद्धतीने केलेल्या कामामुळे पक्षाला फटका बसू शकतो हे सुद्धा अजित पवार यांनी आवर्जून सांगितले.

आपण चुकीचे वक्तव्य करतो आणि मग ते सर्व माध्यमातून दाखवले जाते. सोशल माध्यमांची सध्या ताकद वाढली आहे. त्यामुळे सर्वांनी भान ठेवून वागले पाहिजे, बोलले पाहिजे असा सल्लाही अजित पवार यांनी कार्यकर्त्यांना दिला.

याशिवाय धाराशिव, अहिल्यानगर, अकोला या जिल्हयातील विविध पक्षातील असंख्य पदाधिकाऱ्यांनीही राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला.

# यंदा मुंबईत आता पर्यंत 50 टक्केही पाऊस नाही

**मुंबई, दि. ५ : प्रतिनिधी**



मुंबई शहर व उपनगरांत मे महिन्यात दाखल झालेल्या मान्सूननंतर गेल्या जवळपास सव्वा दोन महिन्यांत मुंबईत 50 टक्केही पाऊस झाला नाही. 4 ऑगस्टपर्यंत 47 टक्के इतकाच पाऊस झाला. यात शहर विभागात अवघा 43 टक्के इतका पाऊस झाला असून हा मागील वर्षापेक्षा 30 ते 35 टक्केपेक्षा कमी आहे. अपवाद वगळता जुलै ते ऑगस्ट या दोन महिन्यांत मुंबईत सरासरीच्या 60 टक्क्यांपेक्षा जास्त पाऊस होतो. मात्र या जुलै महिन्यामध्ये जेमतेम 22 टक्के पाऊस झाला. पर्जन्यमापक यंत्राच्या नोंदीनुसार आतापर्यंत 43 टक्के पाऊस झाला असून उपनगरांत 48 टक्के पाऊस झाला आहे.

पाऊस 2004 च्या जुलै, ऑगस्ट या दोन महिन्यांत झाला होता. मुंबईमध्ये 26 जुलै 2005 मध्ये एकाच दिवसात सर्वाधिक 944 मिमी पावसाची नोंद झाली होती, तर मुंबई शहर व उपनगरांत 2007 मध्ये जुलै व ऑगस्ट या दोन महिन्यांत 47 टक्के पाऊस पडला होता. ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यात पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. त्यामुळे जेमतेम वार्षिक सरासरी इतका मुंबईत पाऊस होईल असे सांगण्यात येत आहे. दरम्यान ऑगस्ट व सप्टेंबरमध्ये मोठा पाऊस पडण्याची शक्यता वर्तवल्यामुळे पाऊस गणेश उत्सव गाजवणार आहे.

# नर्सरी, केजी शाळांसाठी लवकरच नवा कायदा

**मुंबई, दि. ५ : प्रतिनिधी**

लहान मुलांच्या शैक्षणिक वाटचालीचे पहिले पाऊल म्हणून ओळखल्या जाणाऱ्या खासगी नर्सरी, केजी शाळांना आता चाप बसणार आहे. कोणतीही परवानगी नसताना सुरू असलेल्या आणि कोणाचेही नियंत्रण नसलेल्या अशा शाळांसाठी राज्य सरकार लवकरच कायदा लागू करणार आहे. नव्या कायद्यानुसार नर्सरी, केजी शाळांसाठी सरकारची परवानगी बंधनकारक राहणार असून, शिक्षकांच्या नेमणुकीपासून अभ्यासक्रम आणि विद्यार्थ्यांच्या वयाबाबत सुस्पष्टता येणार आहे. पुढील शैक्षणिक वर्षापासून या कायद्याची कार्यवाही होणार असून याबाबतचा कायदा आगामी हिवाळी अधिवेशनात विधिमंडळात आणला जाणार आहे. नर्सरी आणि केजी शाळांमध्ये मुलांसाठी शैक्षणिक आणि सामाजिक वातावरणाची पायाभरणी केली जाते. या शाळांमध्ये मुलांचा सर्वांगीण विकास साधण्याचा प्रयत्न केला जातो. शासकीय बालवाडी तसेच अंगणवाड्यांवर सरकारचे नियंत्रण असते. मात्र शिक्षणाचा गोरखधंदा बनलेल्या खासगी नर्सरी आणि केजी शाळांवर कोणाचेही नियंत्रण नाही. अशा शाळांना परवानगी नसतानाही जागोजागी त्याचे पेव फुटलेले दिसते.

राज्यभरात लाखोंच्यावर असलेल्या अशा खासगी नर्सरी आणि केजी शाळांची नोंदच सरकारकडे नाही. यापुढे अशा शाळा मनमानी पद्धतीने चालवता येणार नसून नर्सरी, केजी शाळा सुरू करण्यासाठी शिक्षण विभागाची परवानगी घ्यावी लागणार आहे. नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात 'अर्ली चाइल्डहूड केअर अँड एज्युकेशन'चा अंतर्भाव आहे. त्यानुसार नर्सरी आणि केजी शाळांना नव्याने नियम लागू करण्यासाठी शालेय शिक्षण विभाग कायदा करणार आहे. यामध्ये शिक्षकांची नेमणूक करताना त्यांचे शिक्षण, शैक्षणिक अभ्यासक्रमाचा कोर्स याचा विचार केला जाणार आहे. याशिवाय नर्सरी, केजी शाळांना किती जागा असावी, तेथील सोयी-सुविधा, वाहतूक सुविधा, सुरक्षिततेच्या उपाय योजनांबरोबरच कोणत्या वयापासून मुलांना प्रवेश द्यायचा याबाबतही निर्णय घेतला जाणार आहे, अशी माहिती अधिकाऱ्याने दिली.

**'फी'वर निर्बंध नाही**

अशा शाळांमध्ये फीबाबत मनमानी असते. नव्या कायद्यामध्ये विद्यार्थ्यांच्या इतर गोष्टींचा आढावा घेतला जात असला तरी नर्सरी, केजी प्रवेशासाठी आकारल्या जाणाऱ्या भरमसाट फीविरोधात कोणतेही निर्बंध लादणार नसल्याचे अधिकाऱ्याने स्पष्ट केले.


## आज का अंदाज

बुधवार ६ ऑगस्ट २०२५

**पत्थर फोड एकच**

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ० | १ | ४ | ७ | ३ | ५ | ६ | ९ |
| ३७० | ३८० | ७८९ | ३७७ | १३९ | ४५६ | १६१ | १२६ |
| ४६० | ४७० | २४८ | ४६७ | २३८ | २३० | १५० | २८९ |
| २८० | ५६० | ३४७ | ५५७ | ३३७ | ३३७ | ११४ | ४७८ |
| ०२ | १२ | ४३ | ७३ | ३८ | ५८ | ६१ | ९१ |
| ०५ | १५ | ४६ | ७६ | ३७ | ५७ | ६० | ९० |
| ०८ | १८ | ४९ | ७९ | ३४ | ५४ | ६२ | ९२ |

**६ ऑगस्ट : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | ६१ | ५३ | ९३ |
| २४ | ६४ | ५८ | ९८ |
| २७ | ६७ | ५० | ९० |
| ६७९ | ६०० | ६९० | ९०० |
| २४६ | ७९० | २६७ | २३४ |
| १२९ | ८८० | ३५७ | १९९ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४


# झी टीव्हीच्या कलाकारांनी सांगितल्या त्यांच्यासाठी खास असलेल्या मैत्रीच्या गोष्टी



**मुंबई, ५ ऑगस्ट :** फ्रेंडशिप डे हा आपल्या जीवनात आनंद, आधार आणि अर्थ घेऊन येणाऱ्या नात्यांची आठवण करून देणारा एक हृदयस्पर्शी दिवस आहे. हे त्यांचे सेलिब्रेशन आहे जे आपल्या प्रत्येक चढ–उतारामध्ये आपल्यासोबत ठामपणे उभे राहतात एकटेपणाची भावना थोडीशी कमी करतात. मग ती बालपणीची, ऑफिसमधली सोबत असो, किंवा अगदी अलीकडे जुळलेली ती जिव्हाळ्याची ओळख प्रत्येक मैत्री जीवनाच्या कॅनव्हासला स्वतःचा एक खास रंग देते. या वर्षी, झी टीव्हीवरील कलाकार सरूमधील अनुष्का मर्चंडे, वसुधामधील अभिषेक शर्मा, तुम से तुम तक मधील निहारिका चौक्सी, जाने अनजाने हम मिले मधील आयुषी खुराणा, छोरियाँ चली गाँव मधील ऐश्वर्या खरे, आणि जमाई नं. १ मधील अभिषेक मलिक यांनी त्यांच्या आयुष्यातील मैत्रीचे महत्त्व आणि त्यांच्या मनात खोलवर घर करून बसलेल्या आठवणी शेअर केल्या.

झी टीव्हीच्या 'छोरियाँ चली गाँव' या मालिकेतील अभिनेत्री ऐश्वर्या खरे म्हणाली, मैत्री म्हणजे एकत्र वाढणे आणि एकमेकांसाठी सुरक्षित जागा बनणे. मला त्या दोघी बहिणींच्या रूपात दोन बेस्ट फ्रेंड्स मिळाल्या आहेत, ज्या माझ्या आयुष्याच्या सुरुवातीपासूनच माझ्यासोबत आहेत.

## राशीभविष्य

**मेष :** आज तुम्हाला एका जुन्या मित्राची भेट होईल. विद्यार्थ्यांना अभ्यासात रस असेल. कोणत्याही स्पर्धेत किंवा परीक्षेत तुम्हाला यश आणि आदर मिळेल. एका नवीन औद्योगिक युनिटचे उद्घाटन होईल.

**वृषभ :** आज, प्रतिस्पध्यार्शी किंवा शत्रूशी लढाई संपेल. आणि पुन्हा सुसंवाद निर्माण होईल. कौटुंबिक मित्रासोबत व्यावसायिक संबंध सुरू होऊ शकतात. कामाच्या ठिकाणी अनुभवाचे कौतुक केले जाईल.

**मिथुन :** आजचा दिवस विशेष आनंद आणि प्रगतीचा राहणार नाही. महत्त्वाच्या कामात संघर्ष वाढू शकतो. सामाजिक कार्यात संयमाने वागा. विरोधक तुमचा अपमान करण्याचा प्रयत्न करू शकतात.

**कर्क :** आज तुम्हाला कामाच्या ठिकाणी विशेष सहकार्य आणि आदर मिळेल. काही महत्त्वाच्या कामाची जबाबदारी मिळाल्याने तुमचा प्रभाव वाढेल. व्यवसायात नफा कमावण्याची संधी मिळेल.

**सिंह :** आज तुमच्या मुलांप्रती असलेली जबाबदारी पार पडेल. तुम्हाला जवळचा मित्र भेटेल. विद्यार्थ्यांना अभ्यासात रस असेल. कामाच्या ठिकाणी तुमचे बौद्धिक कौशल्य पाहून सर्वांना आश्चर्य वाटेल.

**कन्या :** कामाच्या ठिकाणी जवळच्या व्यक्तीशी तुमची जवळीक वाढेल. राजकारणात पद आणि प्रतिष्ठा वाढेल. लोक तुमच्याकडे आकर्षित होतील. काही महत्त्वाच्या कामात यश मिळण्याची शक्यता आहे.

**तुळ :** कामाच्या ठिकाणी कठोर परिश्रम करूनही तुम्हाला सारखे परिणाम मिळणार नाहीत. सहकाजयांशी मतभेद होऊ शकतात. कोणाच्याही प्रभावाखाली येऊ नका. तुम्हाला सरकारी योजनेचा लाभ मिळेल.

**वृश्चिक :** आज, कामाच्या आणि व्यवसायाच्या क्षेत्रात तुमच्या समस्यांना गांभीयार्ने तोंड देण्यासाठी तयार राहा. घाबरू नका. संघर्षानंतर महत्त्वाच्या कामात तुम्हाला यश मिळेल. जुन्या मित्रांची भेट होईल.


**धनु :** आजचा दिवस तुमच्यासाठी सकारात्मक असेल. प्रलंबित कामे पूर्ण होण्याची शक्यता आहे. समाजात तुमची प्रतिष्ठा वाढेल. शत्रू तुमच्याशी स्पर्धेची भावना बाळगतील. प्रकृतीकडे अधिक लक्ष पुरवा.

**मकर :** आज तुम्हाला तुमच्या कारकिर्दीला नवीन दिशा देण्यासाठी अनेक उत्तम संधी मिळतील. कृषी क्षेत्रात तुम्हाला काही नवीन संधी मिळतील. बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये कार्यरत लोकांना मान मिळेल.

**कुंभ :** आज तुम्हाला कुटुंबात काही चांगली बातमी मिळेल. सरकारी मदतीने काही महत्त्वाच्या कामातील अडथळे दूर होतील. तुम्हाला परीक्षा आणि स्पर्धांमध्ये यश मिळेल. कौटुंबिक जीवन आनंददायी राहील.

**मीन :** शिक्षण, अर्थशास्त्र आणि कृषी क्षेत्रात काम करणाजया लोकांना फायदेशीर संधी मिळतील. विरोधक तुमच्या कमकुवतपणाचा फायदा घेण्याचा प्रयत्न करतील. व्यवसायात नवीन भागीदार मिळतील.

## शब्दकोडे क्रमांक २१८४




**आडवे शब्द :-**
१) सत्तेवर असणाऱ्या माणसाची हांजी हांजी करणारे नीच लोक
८) जेमतेम
११) एक दागिना
१२) माणूसकी
१४) एक चर्मवाद्य
१७) गीत
१९) नवऱ्या मुलीची बहीण
२१) एका किल्ल्याचे नाव
२४) कर्णेंद्रिय
२५) बासरी
२६) बगळा
२७) वारी करणारा
२९) इच्छा
३०) मन, विचार, मानलेला
३१) वर्ष, साल
३२) भांडण, चर्चा
३३) मकबरा
३५) मीठाची चव
३७) दारूबाज, छचोर
३८) चामखीळ
४१) मोठी नदी
४२) सिद्धता
४४) एखादी गोष्ट पूर्ण करण्याचे मनापासून ठरविणे
४६) मान्यतेचा शब्द
४७) हिन्दुस्थानी
४९) मोठा नगारा
५०) आईचा भाऊ
५२) सिनेमा
५४) एक रत्न
५५) शपथ
५७) श्रीरामाचे एक नाव
५८) महादेव
६०) वयाने जास्त असलेला
६२) पार्वतीचे एक नाव
६३) चित्र काढणारा
६५) नमूना
६७) लाज
६८) परतफेड
६९) बोललेले
६९) आकाशयान
७०) खाण्याची तंबाखू
७१) एकागे नजर
७३) सत्यनारायणाचा गोड पदार्थ
७४) गीतातील शब्दालंकार
७६) विवाहविच्छेदाची मुस्लीम पद्धती
७७) फालतू, किरकोळ सामान
७८) शर्थीचे प्रयत्न

**उभे शब्द :-**
१) त्वरित
२) टांगा, रथ यांना ओढणारा प्राणी
३) व्रत
४) धोबी
५) गाय
६) समाजातील प्रतिष्ठा, एक अवयव
७) छावा, बच्चे
९) छाया
१०) सुनेला सासरी होणारा छळ
१३) चंद्र
१५) तफावत
१६) लाकडाची एक जात
१८) ज्यात जहर आहे असे
२०) अरण्य
२२) भीती
२३) ठेकेदार
२५) पर्ण
२८) कथा सांगणारा, कीर्तनकार
३०) पुढेच्या विरुद्ध
३१) मोठी उथळ वाटी
३४) बेडकांचे ओरडणे
३६) दात
३७) फोटो
३९) वेळ
४०) प्रेक्षक, बघणारे
४३) मयूर
४५) दारूचा एक प्रकार
४७) स्तुती करणारा
४८) धनुष्यबाण
५१) दुर्भिक्ष, चणचण
५२) चिमण्यांच्या आवाजांचा गोंधळ
५३) परकीय, आपला नसलेला
५५) सूर्याचे एक नाव
५६) मनोरंजन
५९) द्रवपदार्थ
६१) यश मिळवून देणारा
६२) हजर
६४) ख्रिश्चनांचा प्रार्थनेचा दिवस
६६) लाजणारा
७२) सत्वांश
७३) रक्तवाहिनी
७५) झकास

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका

## राज्य निवडणूक आयुक्तांनी घेतला पूर्वतयारीचा आढावा । मतदान केंद्रांवरील सोईसुविधा, आवश्यक मनुष्यबळाचे नियोजन करण्याचे दिले निर्देश




**नाशिक ।** आगामी होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी शासन स्तरावर हलचाली सुरू झाल्या असून, राज्याचे निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी पूर्वतयारीचा आढावा घेतला.

यावेळी त्यांनी मतदार संख्या, मतदान केंद्रे, तेथील सोईसुविधा, निवडणूक पार पाडण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ, उपलब्ध इलेक्टॉनिक मतदान यंत्र आदींची संपूर्ण तयारी आणि पूर्वनियोजन करण्याचे निर्देश प्रशासनाला दिले. नाशिक विभागातील पाचही जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूक पूर्व तयारी संदर्भात वाघमारे यांनी मंगळवारी (दि. ५) येथील नाशिक विभागीय आयुक्त कार्यालय येथे आढावा घेतला. त्यावेळी ते बोलत होते. राज्य निवडणूक आयोगाचे सचिव सुरेश काकाणी, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांच्यासह पाचही जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी, महापालिकांचे आयुक्त यावेळी उपस्थित होते. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी १ जुलै २०२५ पर्यंत नावे नोंदविलेली विधानसभेची मतदार यादी वापरण्याचे नियोजन करण्यात येत आहे. त्यादृष्टीने भारत निवडणूक आयोगाची परवानगी लवकरच प्राप्त होईल. मात्र, त्या अनुषंगाने प्रत्येक जिल्ह्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील जिल्हा परिषद गट आणि पंचायत समिती गणासाठी निवडणूक घेण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ, निवडणूक निर्णय अधिकारी व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांची उपलब्धता, संभाव्य मतदान केंद्रे आणि तेथील सोईसुविधांची उपलब्धता यांचाही वाघमारे यांनी तपशीलवार आढावा घेतला. त्यांनी प्रत्येक जिल्ह्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती, नगरपरिषद व नगरपंचायत तसेच महापालिकांच्या निवडणुकांच्या अनुषंगाने जिल्हा प्रशासन आणि महानगरपालिका प्रशासनाने केलेल्या तयारीचा आढावा घेतला. वाघमारे म्हणाले की, भारत निवडणूक आयोगाने तयार केलेली मतदार यादीच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी वापरली जाते. स्वतंत्र मतदार यादी तयार केली जात नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका बहुसदस्यी पद्धतीने घेण्यात येतात. त्यामुळे विधानसभेच्या निवडणुकीपेक्षा या निवडणुकीत मतदान केंद्रांची संख्या वाढेल. मतदान केंद्र निश्चितीबाबत राज्य निवडणूक आयोगाने स्वतंत्र आदेशाद्वारे निकष निश्चित केले आहेत. सर्वसामान्य मतदार आणि दिव्यांग मतदारांसह सर्व घटकांचा विचार करून मतदान केंद्रांवर सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याबाबत दक्षता घ्यावी. प्रत्येक जिल्ह्यांनी त्यांच्याकडे उपलब्ध मतदान यंत्रांचा आढावा घेऊन संभाव्य किती मतदान यंत्रांची आवश्यकता लागणार आहे, याची मागणी नोंदवावी. राज्य निवडणूक आयोगाने मध्य प्रदेश निवडणूक आयोगाशी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे मिळण्याबाबत पत्रव्यवहार केला आहे. आवश्यकतेनुसार पुरेशी मतदान यंत्र उपलब्ध करून देण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाचे प्रयत्न सुरू असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. काकाणी यांनीही, मतदान यंत्रांची प्रथमस्तरीय तपासणी करुन ती निवडणुकांसाठी सज्ज करण्यात यावी. त्याचबरोबर मतदान यंत्रांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक त्या सर्व उपाययोजना वेळीच करण्यात याव्यात. मतदान केंद्राची जागा निश्चिती, मतदान केंद्र इमारतींची स्थिती, तेथील सर्व सोयीसुविधांबाबत आतापासूनच तयारी करावी; तसेच मनुष्यबळाची उपलब्धता किंवा कमतरतेबाबत वेळोवेळी आढावा घेण्यात यावा. गरजेनुसार वेळीच मनुष्यबळ उपलब्ध होणे आवश्यक आहे. त्यासाठी संबंधित जिल्ह्यांनी विभागीय आयुक्तांशी समन्वय साधावा, अशा सूचना केल्या. यावेळी सुरुवातीला विभागीय आयुक्त डॉ. गेडाम यांनी नाशिक विभागातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक पूर्वतयारीची सादरीकरणाद्वारे माहिती दिली. यावेळी त्यांनी सन २०११ च्या जनगणनेनुसार त्यावेळची लोकसंख्या, आताची संभाव्य लोकसंख्या, मागील निवडणूकीवेळी असणारे मतदान केंद्रे, संभाव्य मतदान केंद्रे, तेथील सोईसुविधा, मतदार यादी विभाजनाचे नियोजन आदींबाबतची माहिती दिली. पाचही जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी यांनी यावेळी जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपरिषद व नगरपंचायत निवडणूक तयारीच्या अनुषंगाने माहिती दिली तर महापालिका आयुक्तांनी तेथील महानगरपालिका निवडणूक पूर्वतयारीची माहिती सादरीकरणाद्वारे दिली.

# आगामी निवडणुकीसाठी कामाला लागावे : गोकुळ झिरवाळ



**दिंडोरी ।** आगामी होऊ घातलेल्या जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीसाठी कार्यकर्त्यांनी आतापासूनच कामाला सुरुवात करावी तसेच येत्या दहा तारखेला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा पुणे येथे वर्धापन दिन होणार असून, या वर्धापन दिनाला कार्यकर्त्यांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन युवा नेते गोकूळ झिरवाळ यांनी केले.

दिंडोरी येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटाची बैठक संपन्न झाली. त्याप्रसंगी झिरवाळ बोलत होते. बैठकिच्या अध्यक्षस्थानी जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष गणपतराव पाटील होते. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष राजेंद्र उफाडे यांनी पुणे येथे होणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या अधिवेशनाची माहिती दिली. सर्व कार्यकर्त्यांना खबरदारीच्या सूचना दिल्या दिंडोरी पासून पूर्व भागातील कार्यकर्त्यांनी प्रवासाचे नियोजन कसे करावे याबाबत मार्गदर्शन केले. राष्ट्रवादी काँग्रेसचा वर्धापन दिन यशस्वी करून अजितदादा पवार व ना नरहरी झिरवाळ यांचे हात बळकट करावे असे आवाहन उफाडे यांनी केले. यावेळी ज्येष्ठ नेते प्रकाश शिंदे, कादवा कारखान्याचे संचालक बाळासाहेब जाधव, ज्येष्ठ नेते विश्वासराव देशमुख, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष प्रकाश वडजे, माजी सभापती सदाशिव शेळके, माजी जिल्हा परिषद सदस्य विलास कड, माजी नगराध्यक्ष कैलास मवाळ, राष्ट्रवादी युवक काँग्रेस तालुकाध्यक्ष कृष्णा मातेरे आदींनी मनोगत व्यक्त केले. बैठकीला सुरेश कळमकर, माजी जिल्हा परिषद सदस्य अशोक टोंगारे, विष्णू संधान, माधवराव साळुंखे, विनोद देशमुख, नरेंद्र पेलमहाले, गोपीनाथ पाटील, बबन जाधव, एकनाथ गायकवाड, हिरामण गावित, संजय केदार, संजय मोरे, अजित कड, अतुल निगळ, सुनील बोरस्ते, अनिकेत बोरस्ते, डॉ. विजय गटकळ, प्रतिक जाधव, सचिन धुमणे, बापू तासकर, परिक्षित देशमुख, जयवंत जाधव, नीलेश पेलमहाले, संदीप गोतरणे, मधुकर बोरस्ते, विजय पाटील, सुभाष मातेरे, शिवाजी मातेरे, सलीम मिर्झा, सरफराज तांबोळी, अनिल ठुबे, राहुल कावळे, सचिन कावळे, तुषार दवंगे अमोल पवार, दत्तात्रय गटकळ, मंगेश घोलप, संगीता राऊत, पंडित बागुल, निवृत्ती मोंढे, बाळू जोपळे आदींसह राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्येकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नाशिक जिल्ह्यातील १८५ गावांमध्ये होणार पर्यावरण संवर्धन

**नाशिक ।** नाशिक जिल्ह्यातील ११ तालुक्यांमधील १८५ गावांमध्ये पर्यावरण संवर्धन विषयक कार्य करण्याच्या उद्देशाने मराठा विद्या प्रसारक समाज संचलित समाजकार्य महाविद्यालय-नाशिक आणि राह फाउंडेशन-मुंबई यांच्यामध्ये सामूहिक वनहक्क व्यवस्थापन अंतर्गत नुकताच सामंजस्य करार करण्यात आला आहे.

मविप्रचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, शिक्षणाधिकारी डॉ. नितीन जाधव, डॉ.भास्कर ढोके, प्राचार्य डॉ.विलास देशमुख, राह फाउंडेशनच्या उपाध्यक्षा शरयू कामत, प्रकल्पाचे जिल्हा व्यवस्थापक तुषार पिंगळे यांच्या उपस्थितीत हा करार करण्यात आला. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वर्ग आणि शिक्षकेतर सेवक उपस्थित होते. या कराराअंतर्गत १८५ गावांत जाऊन सामूहिक वन हक्क व्यवस्थापन समितीची स्थापना करणे तसेच त्या गावात ग्रामसभेच्या माध्यमातून पर्यावरण विकासाचा आराखडा तयार करणे ही कामे केली जाणार आहेत. यामध्ये सामूहिक वनहक्क व्यवस्थापन कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी या कायद्यांतर्गत सरकारने ज्या गावांच्या ग्रामसभांना वनजमिनी सुपूर्द केल्या आहेत, त्यावर वन्यजीव व वन उत्पादने यांच्या वाढीसाठी आणि पर्यावरण संवर्धनाच्या अनुषंगाने लोकसहभागातून कामी केली जाणार आहेत. समाजकार्य महाविद्यालयातील विद्यार्थी या १८५ गावांमध्ये कायद्याविषयक जनजागृती करणार आहेत. हे विद्यार्थी प्रत्यक्ष या गावांमध्ये जाऊन गावाची भौगोलिक, पर्यावरणीय व वन उत्पादने विषयक माहिती जमा करणार असून, हा ४० पानी फॉर्म ॲपच्या माध्यमातून भरून घेतला जाणार आहे. शासनाकडून सामूहिक वन हक्क समितीला गावातील मिळालेली वनजमीन प्रत्यक्ष पाहून त्याचा नकाशादेखील तयार केला जाणार आहे. गावातील सरपंच, ग्रामसेवक, ग्रामपालिकेचे इतर पदाधिकारी, सामूहिक वन हक्क समितीचे अध्यक्ष आणि सदस्य यांच्या माध्यमातून शासनाच्या विविध खात्यांमार्फत वृक्ष लागवड करून तसेच विविध विकास योजनांचा आराखडा तयार करून प्रत्येक गावात पर्यावरण विकासाच्या दृष्टीने लोकसहभाग वाढविला जाणार आहे. यासाठी सामूहिक वनहक्क व्यवस्थापन अंतर्गत काम करणाऱ्या सर्व गावांनी सहकार्य करावे, असे आवाहन मविप्रचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे आणि प्राचार्य डॉ. विलास देशमुख यांनी केले आहे.

### मुंबईतील टेकड्यांवर अडीच कोटी वृक्ष लागवड

राह फाउंडेशनने २०२२-२३ पासून त्र्यंबकेश्वर, नाशिक, चांदवड, इगतपुरी या तालुक्यांमध्ये आत्तापर्यंत एक लाख ७५ हजार पेक्षा जास्त झाडांची लागवड केलेली आहे. आजपर्यंत वड, पिंपळ, चिंच अशा मोठ्या झाडांची लागवड केली गेलेली आहे. संस्थेने सीएसआरच्या माध्यमातून साडेसात कोटींपेक्षा जास्त रुपये खर्च करून मुंबई शहराच्या आजूबाजूच्या अनेक टेकड्यांवर अडीच कोटी वृक्ष लागवड केलेली आहे. यावरून संस्थेच्या कामाची व्याप्ती लक्षात येते.

## ➤ महत्त्वाचे

### व्ही.एन.नाईक महाविद्यालयात उद्योजक आपल्या भेटीला उपक्रम

**नाशिक ।** येथील क्रांतीवीर वसंतराव नाईक शिक्षण संस्थेच्या कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात वाणिज्य विभागाच्यावतीने "उद्योजक आपल्या भेटीला" उपक्रमाचे उत्साहात आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष कोंडाजी आव्हाड होते तर प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ उद्योजक तथा निमाचे अध्यक्ष धनंजय बेळे उपस्थित होते. उपक्रमाची सुरुवात क्रांतिवीर वसंतराव नाईक तसेच जे.आर.डी. टाटा यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करून झाली. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.संजय सानप, वाणिज्य विभागप्रमुख प्रा. डॉ.धीरज झाल्टे, डॉ.रुपाली सानप, प्रा.हेमलता दराडे, प्रा.कैलास चौधरी, प्रा.वैशाली वाघ, प्रा.रेश्मा कुटे, प्रा.महेश आव्हाड, प्रा.नवनीत कौर, प्रा.राजश्री बोडके, प्रा.कामिनी वाघ, प्रा.प्रतीक्षा आव्हाड, डॉ.संध्या सोनकांबळे यांच्यासह वाणिज्य शाखेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी मार्गदर्शन करतांना उद्योजक धनंजय बेळे म्हणाले की उद्योग व्यवसायातील मोठ्या संधी बघता कौशल्यपूर्ण मनुषबळ उपलब्ध होण्यासाठी काळानुसार शिक्षण पद्धतीत बदल झाला पाहिजे,वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना औद्योगिक क्षेत्रात प्रचंड प्रमाणात रोजगाराच्या संधी आहेत. त्यासाठी विद्यार्थ्यांनी कौशल्यपूर्ण कोर्सेस पूर्ण करून, अद्यावत पद्धतीचे तांत्रिक ज्ञान अवगत केले पाहिजे. नाशिक जिल्ह्याची ओळख औद्योगिक जिल्हा म्हणून राहणार असून, नाशिक जिल्ह्यासाठी पाच हजार एकर औद्योगिक वसाहतीसाठी आरक्षित केलेले आहे तसेच पुढील वर्षात कुंभमेळाही नाशिकला होणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना उद्योग व्यापार व व्यवसायात निश्चित चांगल्या संधी उपलब्ध होणार आहे. यासाठी विद्यार्थ्यांनी तयारी करणे महत्त्वाचे असून, यशस्वी होण्यासाठी आपल्यातील आतल्या गुणवत्तेला वाव दिला पाहिजे. याप्रसंगी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना कोंडाजी आव्हाड म्हणाले की विद्यार्थ्यांनी जगाच्या प्रवाहाबरोबर राहायला शिकले पाहिजे. जिद्द चिकाटी ध्येय व कठोर परिश्रमातून चांगले यश मिळत असते या दृष्टीने वाटचाल करावी. जीवनात यश मिळवण्यासाठी स्वतः अद्यावत राहून स्पर्धेत सहभागी होणे काळाची गरज आहे. प्राचार्य डॉ.संजय सानप यांनी स्वागतपर मनोगत व्यक्त करून विभागाच्या उपक्रमांचा विद्यार्थ्यांनी फायदा करून घ्यावा, असे आवाहन केले. प्रास्ताविकातून डॉ.धीरज झाल्टे यांनी प्रस्तुत उपक्रमाची सविस्तर रूपरेषा सांगितली.

### मंगेश कुलकर्णी यांचे निधन

**नाशिक ।** येथील रहिवासी तथा ज्येष्ठ प्रसार



माध्यम प्रतिनिधी मंगेश बबनराव कुलकर्णी (वय 53) यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. प्रसार माध्यम क्षेत्रात त्यांनी विविध वृत्तपत्रे, वृत्तवाहिन्यात दीर्घकाळ काम केले. त्यांच्या पश्चात भाऊ, पत्नी, मुलगा, मुलगी, जावई असा परिवार आहे.

# शाळेत दाखले वाटप आपल्या दारी : डॉ. आप्पासाहेब शिंदे



## वेळ व खर्च दोघांची बचत

**दिंडोरी ।** महसूल सप्ताहानिमित्त शाळेतील विद्यार्थ्यांना शाळेत जाऊन दाखले वाटप केल्याने विद्यार्थी व पालकांचा वेळ व खर्च वाचणार असल्याने "शासन आपल्या दारी" हा उपक्रम यशस्वीपणे राबविला जात असल्याचे प्रतिपादन दिंडोरी पेठ उपविभागीय अधिकारी डॉ आप्पासाहेब शिंदे यांनी केले. महसूल सप्ताह अंतर्गत दिंडोरी महसूल विभागाच्या वतीने दिंडोरी जनता इंग्लिश स्कुल मध्ये विद्यार्थ्यांना दाखले वाटप कार्यक्रमाप्रसंगी डॉ. आप्पासाहेब शिंदे बोलत होते.

ते पुढे म्हणाले महसूल विभागाचा नागरिकांच्या दैनंदिन जीवनात अतिशय महत्त्वाचा सहभाग असतो. विविध कागदपत्रांची गरज आपल्याला शिक्षण, नोकरी, शासकीय योजना अशा अनेक ठिकाणी भासते. या सर्व सेवा अधिक प्रभावी, पारदर्शक आणि वेळेत देणे, हेच महसूल विभागाचे प्रथम कर्तव्य आहे. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपविभागीय अधिकारी डॉ आप्पासाहेब शिंदे होते. व्यासपीठावर तहसीलदार मुकेश कांबळे, मविप्र संचालक प्रवीण नाना जाधव, परिक्षाविधींन उपजिल्हाधिकारी दीपा जेधे, पंचायत समिती गटशिक्षणाधिकारी चंद्रकांत गवळी, मंडळ अधिकारी भारती रकीबे, माध्यमिक शालेय समिती अध्यक्ष बाळासाहेब मुरकुटे, शिवाजी जाधव, गणपतराव जाधव, बंडू भाऊ भेरे, तुषार वाघ, प्राचार्य शरद शेजवळ, उपप्राचार्य उत्तम भरसठ, पर्यवेक्षक पी के पगारे, डी के टोपले आदी उपस्थित होते. यावेळी मविप्र संचालक प्रवीण जाधव मनोगत व्यक्त करताना म्हणाले की छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ पराक्रमी योद्धेच नव्हते, तर एक दूरदृष्टी असलेले प्रशासक देखील होते. त्यांनी स्थापन केलेल्या स्वराज्याची मजबूत पायाभरणी ही महसूल व्यवस्थेवर होती. आज त्यांच्याच प्रेरणेतून सुरू झालेल्या या अभियानामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शाळेत हे दाखले मिळत आहे, हे पाहून समाधान वाटते. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना दाखले वाटप करण्यात आले. प्रास्तविक प्राचार्य शरद शेजवळ यांनी केले. प्रास्तविकात महसूल सप्ताहानिमित्त दाखले वाटप योजनेची माहिती सांगितली.

### डॉ. शिंदे यांचा सत्कार

१ ऑगस्ट रोजी महसूल दिनाच्या निमित्ताने उपविभागीय अधिकारी आप्पासाहेब शिंदे यांचा नाशिक जिल्हाधिकारी कार्यालयात उत्कृष्ट कामकाज केल्याबद्दल उत्कृष्ट उपजिल्हाधिकारी म्हणून गौरविण्यात आले होते. त्याबद्दल त्यांचा मविप्र संचालक प्रवीण जाधव यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनाही ग्रंथ, शाल व पुष्प देऊन सन्मानित करण्यात आले. सूत्रसंचालन संतोष कथार यांनी तर आभार श्रीमती सुमन विरकर यांनी मानले.

# वंजारी समाजरत्न पुरस्कार २०२५ जाहीर



**नाशिक ।** वंजारी समाज सेवा प्रतिष्ठान व न्यू विकलांग बहुउद्देशीय संस्था महाराष्ट्र राज्य संचलित यांच्या संयुक्त विद्यमाने देण्यात येणारा 'वंजारी समाज रत्न' हा मानाचा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

याबाबत वंजारी समाजाचे डोंगरे वसतिगृह याठिकाणी पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी भाजपा दिव्यांग विकास आघाडीचे उत्तर महाराष्ट्र प्रभारी बाळासाहेब घुगे यांनी माहिती देताना सांगितले की, वंजारी समाजात अनेक व्यक्ती विविध कार्यक्षेत्रात कार्य करत असतात यांचे कार्य समाजापुढे यावे त्यांना प्रेरणा मिळावी व त्याचबरोबर समाज संघटित होऊन एकत्रित यावा यासाठी समाजरत्न पुरस्काराचे आयोजन करण्यात आले असून, सदर पुरस्काराचे वितरण व सत्कार समारंभ १० ऑगस्ट रोजी डोंगरी वसतिगृह, क्रांतिवीर वसंतराव नारायणराव नाईक शिक्षण संस्था या ठिकाणी आयोजित करण्यात आले आहे. या कार्यक्रमात एमपीएससी, यूपीएससी परीक्षेत यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा देखील सत्कार करण्यात येणार आहे याचबरोबर विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाचे निमंत्रण ना. पंकजा मुंडे यांना देण्यात आलेले असल्याची माहिती देण्यात आली. यावेळी संकेत सानप, बी के नागरे, कैलास कराड आदी उपस्थित होते. वंजारी समाजरत्न पुरस्कार्थी पुढीलप्रमाणे- कांतीलाल सुदामराव बोडके (आदर्श सरपंच- दारणा सांगवी), वसंतराव मुरलीधर धात्रक (आदर्श शिक्षक), लक्ष्मण एकनाथ गोमासे (बांधकाम व्यावसायिक), बी जी घुगे सर) आदर्श मुख्याध्यापक, शिवाजी नबाजी ऊगले (ट्रान्सपोर्ट व्यवसायिक), बाळनाथ देवराम घुगे (आदर्श शिक्षक), विठोबा राजे फडे (राजकीय), सचिन कोंडाजी शेळके (प्रशासन), काशिनाथ बाबुराव मुंढे (आदर्श मुख्याध्यापक), जगन आप्पा कुंटे (समाजसेवक), डॉ आनंदा सानप (वैद्यकीय सामाजिक शैक्षणिक), ॲड. रमेश काळे, दापुर, भास्कर आव्हाड (कुषी अधिकारी-निफाड), दत्ता बबनराव सोनवणे (आदर्श सरपंच गोंदे), किरण नागरे सामान्य प्रशासन, गोरख कारभारी घुगे (देशसेवा), संदीप बबन नांगरे (राजकीय), गणपतराव हाडपे (जेष्ठ समाजसेवक), आदिती प्रकाश गायकवाड (आदर्श समाजसेविका), नारायण काकड समाज सेवा, योगेश भास्करराव कातकाडे (समाजसेवक, कर सल्लागार), प्रकाश सानप (युवा उद्योजक), मारुती मुंडे (दिव्यांग सेवक - उस्मानाबाद), माणिक घुगे आदर्श शेतकरि, सुमन सोनवणे, माणिक घुगे (आदर्श शेतकरी), आदर्श पत्रकार- नितीन ढाकणे (दैनिक अतुल्य महाराष्ट्र - परळी वैजनाथ), बाळासाहेब फड (दैनिक सोमेश्वर साथी - परळी वैजनाथ), नरहरी उंबरे (दैनिक पुण्यनगरी - मनमाड), ज्ञानेश्वर प्रकाश आंधळे, सचिन सांगळे (दैनिक लोकमत-सिन्नर), विलास माधवराव ढाकणे (दैनिक देशदूत, दिंडोरी)

# महागली 'विदेशी'; तळीरामांची 'देशी'कडे गर्दी !


नैवेद्या बिदरी यांजकडून

## विदेशी दारूचा खप कमी झाल्याचा दावा : किमतीबाबतही संभ्रमावस्था...

**मनमाड ।** "देशी वस्तू वापरा,विदेशी वस्तु टाळा" हे आपण नेहमीच ऐकत असतो.मात्र राज्य शासनाने विदेशी दारूच्या करामध्ये वाढ केल्यामुळे विदेशी दारूच्या किमती प्रती क्वार्टर ५० ते २०० रुपयांनी वाढल्या आहेत. या वाढीव किंमती परवडत नसल्याने अनेक तळीरामांनी आपला मोर्चा 'देशी' दारूकडे वळविल्याचे दिसत आहे.

शासनाने गेल्या महिन्यात देशी, भारतीय बनावटीची विदेशी आणि विदेशी दारूवर १० टक्के व्हॅट, १५ टक्के परवाना शुल्क आणि ९ ते ७० टक्के जादा उत्पादन शुल्क लावण्याचा निर्णय घेतला आहे. शासनाने नवीन दर हा दारूच्या नवीन एमआरपीनुसारचा स्टॉक बाजारात आल्यानंतर लागू करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, राज्यातील अनेक बार चालकांनी शासनाचा निर्णय जाहीर झाल्यानंतर अवघ्या दोन-चार दिवसांतच नवीन कर रचनेनुसार दर आकारण्यास सुरुवात केली. जुना स्टॉकही नवीन दरानेच विकणे सुरू केले. कोणत्या ब्रँडची किंमत किती असणार, हे निश्चित नसतानाच अनेक ठिकाणी हे नवीन दर लागू करण्यात आले.

बारमध्ये भारतीय बनावटीच्या विदेशी दारूच्या किमती ५० ते २०० रुपयांपर्यंत वाढलेल्या आहेत. ही वाढीव किंमत अगदी गब्बर तळीरामांच्या खिशालासुद्धा परवडेनाशी झाली आहे. यामुळे अनेक तळीरामांनी आपला 'कोटा' कमी केलेला दिसत आहे,



कुणी महागडे ब्रँड टाळून 'स्वस्तात मस्त' बँडला पसंती देत आहेत. तर कुणाचे रोजचे भरणारे अधिवेशन आता साप्ताहिकवर आलेले दिसत आहे. बारमधील मित्रामित्रांच्या मैफिलीही कमी झालेल्या दिसत आहेत. काहीजण बारमधील दर परवडत नसल्याने वाईन शॉपमधून दारूची खरेदी करताना दिसत आहेत. या सगळ्याचा परिणाम म्हणून बारमधील भारतीय बनावटीच्या विदेशी दारूचा खप जवळपास ४० टक्क्यांनी कमी होत असल्याचा दावा काही मद्यविक्री करणाऱ्या चालकांनी केलेला आहे. राज्य शासनाच्या वाढीव कर प्रणालीमुळे बार मालकांना फटका बसला असून बार तळीरामाविना ओस पडत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

### 'देशी' कडे कल..!

विदेशी दारूच्या किमती आवाक्याबाहेर गेल्याने अनेक पट्टीच्या तळीरामांनी 'देशी'चा आसरा घेतल्याचे दिसत आहे. एकतर देशी दारूच्या किमतीत केवळ १० रुपयांनी वाढ झाली आहे. दुसरे म्हणजे गेल्या काही वर्षात देशी दारू उत्पादन करणाऱ्या कंपन्यांनी वेगवेगळ्या चवींचे आणि वासाचे अनेक ब्रेड बाजारात आणले आहेत. यापैकी काही ब्रँडची तर विदेशी ब्रेडशीही तुलना होते. परिणामी अनेक विदेशी शौकीन तळीराम आजकाल देशी दारूकडे वळताना दिसत आहेत. गेल्या काही दिवसांत देशी दारूच्या विक्रीत प्रचंड प्रमाणात वाढ झाल्याचे काही मद्यविक्री करणाऱ्या चालकांनी सांगितले.



# ट्रम्प यांच्या टॅरिफ वाढवण्याच्या धमकीचा परिणाम

## सेन्सेक्समध्ये 308 अंकांची घसरण

**मुंबई, दि. ५ प्रतिनिधी**

मंगळवारी शेअर मार्केटमध्ये घसरण झाली. दोन्ही बेंचमार्क निर्देशांक, सेन्सेक्स आणि निफ्टी ५०, लाल चिन्हावर बंद झाले. मागील चार ट्रेडिंग सत्रांपैकी तिघांमध्ये या दोन्ही निर्देशांकांमध्ये घसरण झाली आहे.

मंगळवारी सेन्सेक्सने ८०,९४६ या स्तरावर बाजाराची सुरुवात केली आणि ०.३८ टक्क्यांच्या घसरणीसह ८०,७१० या पातळीवर बंद झाला. त्याच वेळी, निफ्टी ५० ने २४,७२० या स्तरावर ओपनिंग दिली आणि दिवसाअखेरीस ०.३० टक्क्यांच्या घसरणीसह २४,६४९ या स्तरावर बंद झाला.

ही घसरण बीएसई मिडकॅप आणि बीएसई स्मॉलकॅपमध्येही दिसून आली. एका बाजूला बीएसई मिडकॅपमध्ये ०.१३ टक्क्यांची घसरण झाली आणि बीएसई स्मॉलकॅपमध्ये ०.२६ टक्क्यांची घसरण झाली.

निफ्टी ५० मधील टॉप गेनर्सकडे पाहिल्यास, इंडसइंड बँकेचा शेअर सर्वात वर राहिला, ज्यामध्ये १.८८ टक्क्यांची वाढ झाली. त्यानंतर टायटन कंपनीमध्ये १.८५ टक्के, एसबीआय लाईफमध्ये १.४ टक्के, मारुती सुझुकीमध्ये १.४ टक्के आणि ट्रेंटमध्ये १.३१ टक्क्यांची वाढ झाली.

दुसरीकडे, निफ्टी ५० मधील टॉप लूजर्समध्ये सर्वाधिक



**सेन्सेक्स 80,710**

**निफ्टी 24,649**

नुकसान अदानी पोर्ट्सला झाले, ज्यामध्ये २.२२ टक्क्यांची घसरण झाली. त्यानंतर अदानी एंटरप्रायझेसमध्ये १.५ टक्के, रिलायन्स इंडस्ट्रीजमध्ये १.४१ टक्के, इन्फोसिसमध्ये १.३७ टक्के आणि आयसीआयसीआय बँकेत १.२९ टक्क्यांची घसरण झाली.

शेअर मार्केटमधील घसरण असूनही, सर्वाधिक वाढ निफ्टी इंडिया डिफेन्स निर्देशांकामध्ये झाली, ज्यामध्ये ०.८५ टक्क्यांची वाढ झाली. त्याचप्रमाणे निफ्टी ऑटो निर्देशांकातही ०.३७ टक्क्यांची वाढ झाली.

सर्वात जास्त घसरण निफ्टी ऑईल अँड गॅस निर्देशांकामध्ये झाली, ज्यामध्ये ०.९६ टक्क्यांची घसरण झाली. त्यानंतर निफ्टी फार्मामध्ये ०.८३ टक्के, निफ्टी एफएमसीजीमध्ये ०.७२ टक्के, निफ्टी आयटीमध्ये ०.४८ टक्के, निफ्टी बँकमध्ये ०.४७ टक्के आणि निफ्टी रिअल्टीमध्ये ०.४६ टक्क्यांची घसरण झाली.

# भारताने डोनाल्ड ट्रम्प यांना दाखवला आरसा

## अतिरिक्त टॅरिफ आकारण्याच्या धमकीनंतर रशियाचेच उदाहरण देत जारी केले निवेदन

**नवी दिल्ली, दि. ५ वृत्तसंस्था**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आधी भारत व पाकिस्तान यांच्यातील संघर्षात आपणच मध्यस्थी केल्याचे दावे वारंवार करून भारत सरकारला अडचणीत आणण्याचा प्रयत्न केला. आता ट्रम्प सातत्याने भारताला अतिरिक्त टॅरिफ लागू करण्याची धमकी देत आहेत. काही दिवसांपूर्वीच भारतावर २५ टक्के टॅरिफ आणि अतिरिक्त दंड आकारला जाईल, असं ट्रम्प यांनी जाहीर केलं होतं. सोमवारी संध्याकाळी केलेल्या सोशल पोस्टमध्ये रशियाकडून भारत तेल खरेदी करतो म्हणून आणखी टॅरिफ आकारले जाईल, अशी नवी धमकी ट्रम्प यांनी दिली आहे. यावर आता भारत सरकारने रशियाचंच उदाहरण देत ट्रम्प यांना प्रत्युत्तर दिलं आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतीय प्रमाणवेळेनुसार सोमवारी संध्याकाळी ट्रुथ या सोशल मीडिया साईटवर पोस्ट शेअर केली. या पोस्टमध्ये भारतावर अतिरिक्त टॅरिफ आकारणार असल्याचं त्यांनी सांगितलं आहे. मात्र, त्याचबरोबर रशियाकडून भारत तेल आयात करत असल्याचं कारणही त्यांनी पुढे केलं आहे.

"भारत रशियाकडून फक्त तेल आयातच करत नाही, तर त्या तेलाचा मोठा भाग खुल्या बाजारात विकून मोठा नफादेखील कमावत आहे. रशियाच्या युद्धनीतीमुळे युक्रेनमध्ये किती लोक मारले जात आहेत याची भारताला अजिबात फिकीर नाही. त्यामुळे मी भारताकडून अमेरिकेला दिल्या जाणाऱ्या टॅरिफमध्ये वाढ करत आहे", असं ट्रम्प यांनी या पोस्टमध्ये म्हटलं आहे.

दरम्यान, ज्या रशियाचं नाव घेऊन डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताला धमकावलं आहे, त्याच रशियाकडून अमेरिका व युरोपियन युनियन कच्चा माल आयात करत असल्याचा दाखला भारतानं दिला आहे. यासंदर्भात परराष्ट्र मंत्रालयाकडून सोमवारी संध्याकाळी उशीरा निवेदन जारी करण्यात आलं आहे. परराष्ट्र



खात्याचे प्रवक्ते रणधीर जैस्वाल यांनी आपल्या अधिकृत एक्स हँडलवरून हे निवेदन शेअर केलं आहे.

"युक्रेन युद्ध सुरू झाल्यापासून अमेरिका व युरोपियन राष्ट्रे रशियाकडून तेल आयात करतो म्हणून भारतावर सातत्याने टीका करत आहेत. पण युक्रेन युद्ध सुरू झाल्यापासून तेलाचे उपलब्ध पुरवठा पर्याय हे युरोपकडे वळवण्यात आले. त्यामुळेच भारतानं रशियाकडून तेल आयात करायला सुरुवात केली. त्यावेळी जागतिक स्तरावरील ऊर्जा बाजारपेठेतील समतोल टिकवण्यासाठी अशा प्रकारची आयात करण्यास अमेरिकेने भारताला मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन दिलं होतं", असं या निवेदनात भारतानं स्पष्ट केलं आहे.

दरम्यान, भारतावर टीका करणारे देशच रशियाशी व्यापार करत असल्याचं भारतानं निवेदनात म्हटलं आहे. "भारतीय ग्राहकांना परवडणाऱ्या दरात इंधन उपलब्ध होण्यासाठी भारत रशियाकडून तेल आयात करतो. जागतिक बाजारपेठेच्या परिस्थितीमुळे भारताला हे करणं भाग पडलं. पण जे देश भारतावर टीका करतात, तेच देश रशियाशी व्यापार करत असल्याचं उघड झालं आहे. आमच्याप्रमाणे हा व्यापार करणं या देशांना आवश्यक नसूनही हा व्यापार चालू आहे", असा उल्लेख या निवेदनात करण्यात आला आहे.

"२०२४मध्ये युरोपियन युनियनने रशियाशी ६७.५ बिलियन युरोचा द्वीपक्षीय व्यापार करार केला. २०२३ मध्येदेखील युरोपियन युनियनचा रशियाशी १७.२ बिलियन युरोचा सेवा क्षेत्रातील करार होता. भारताने त्या वर्षी किंवा त्यानंतरही रशियाशी केलेल्या व्यापार करारापेक्षा हे प्रमाण निश्चितच जास्त आहे. युरोपिनय देशांमध्ये रशियातून आयात होणारा LNG २०२४ मध्ये तब्बल १६.५ मिलियन टन इतका होता. त्याआधी सर्वाधिक १५.२१ मिलियन टन LNG २०२२ मध्ये रशियातून युरोपियन देशांनी आयात केला होता", अशी आकडेवारी या निवेदनात देण्यात आली आहे.

# "श्रीमंत लोक थेट सर्वोच्च न्यायालयात का येतात?"

## भूपेश बघेल यांच्या याचिकेवर सुप्रीम कोर्टाने ठणकावले

**नवी दिल्ली, दि. ५ वृत्तसंस्था**

बऱ्याचदा प्रभावी व श्रीमंत व्यक्ती फौजदारी गुन्ह्यांच्या प्रकरणांमध्ये दिलासा मिळावा यासाठी थेट सर्वोच्च न्यायालयात दाद मागतात, अशी टिप्पणी करत सर्वोच्च न्यायालयाने नाराजी व्यक्त केली आहे. छत्तीसगडमधील कथित मद्य घोटाळा व इतर गुन्ह्यांच्या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी करताना न्यायमूर्ती सूर्य कांत व न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची यांच्या बेंचने याचिकाकर्त्यांच्या वकिलांना प्रश्न विचारला की "एफआयआर, अटक, रिमांड व मनी लॉन्डरिंग प्रतिबंधक



कायद्याच्या (पीएमएलए) तरतुदींविरोधातील तुमच्या याचिकांवर सर्वोच्च न्यायालयाने काय विचारायला हवा? मुळात तुम्ही उच्च न्यायालयात का गेला नाहीत? श्रीमंत लोक थेट सर्वोच्च न्यायालयात का येतात?"

न्यायमूर्ती म्हणाले, "उच्च न्यायालय देखील संवैधानिक आहे. तिथेही अशा प्रकरणांमध्ये निकाल दिला जातो. आम्हाला असं विचारावं लागतंय कारण आम्ही या समस्येशी सामना करत आहोत. उच्च न्यायालय अशा प्रकरणांमध्ये निकाल देऊ शकत नाही किंवा न्यायनिवाडा करू शकत नाही असं तुम्हाला वाटतं का? तसं असेल तर त्या न्यायालयांचा काय फायदा?"

छत्तीसगडचे माजी मुख्यमंत्री भूपेश बघेल व त्यांचे पुत्र चैतन्य बघेल यांनी तपास यंत्रणांची दंडात्मक कारवाई व पीएमएलए कायद्यातील तरतुदींना सर्वोच्च न्यायालयात आव्हान देत वेगवेगळ्या याचिका दाखल केल्या होत्या. यावर सर्वोच्च न्यायालयाने नाराजी व्यक्त केली.

# लाल किल्ल्यात नेलेला डमी बॉम्ब पोलिसांना सापडलाच नाही

## ७ जण निलंबित, सुरक्षेत मोठी चूक

**नवी दिल्ली, दि. ५ वृत्तसंस्था**

स्वातंत्र्यदिनापूर्वी सुरक्षा व्यवस्थेतील गंभीर त्रुटींमुळे दिल्ली पोलिसांनी मोठी कारवाई करण्यात आली आहे. दिल्लीच्या लाल किल्ल्याच्या सुरक्षेसाठी तैनात असलेल्या पोलिसांना डमी बॉम्ब शोधता आली नाही. त्यामुळे लाल किल्ल्याच्या सुरक्षेसाठी तैनात असलेल्या ७ पोलिसांना निलंबित करण्यात आले आहे. यामध्ये कॉन्स्टेबल आणि हेड कॉन्स्टेबलचा समावेश आहे. कर्तव्यात निष्काळजीपणा केल्यामुळे या सर्वांना निलंबित करण्यात आल्याचे दिल्ली पोलिसांचे म्हणणे आहे.

२ ऑगस्ट रोजी हा सगळा प्रकार घडला. दिल्ली पोलिसांनी सोमवारी या घटनेची माहिती दिली. १५ ऑगस्टच्या कार्यक्रमाला लक्षात घेऊन दिल्ली पोलिस दररोज सिक्युरिटी ड्रिल घेत होते. शनिवारी, विशेष कक्षाच्या पथकाने असाच एक ड्रिल घेतला. पथकाने लाल किल्ल्याच्या परिसरात साध्या पोशाखात प्रवेश केला आणि सोबत एक डमी बॉम्ब घेतला. या दरम्यान, तिथे तैनात असलेल्या पोलिसांना डमी बॉम्ब शोधता आला नाही. ही सुरक्षेतील एक मोठी चूक होती. यामुळे त्यांना ७ पोलिसांना निलंबित करण्यात आले.

# गुरमीत राम रहीम ४० दिवसांसाठी तुरुंगाबाहेर


**सिरसा, दि. ५ वृत्तसंस्था**

डेरा सच्चा सौदा प्रमुख गुरमीत राम रहीम पुन्हा एकदा तुरुंगाबाहेर आला आहे. यावेळी राम रहीमला ४० दिवसांचा पॅरोल मिळालाय. पॅरोलवर तुरुंगातून बाहेर आल्यानंतर तो पहाटेच पोलिस संरक्षणात सिरसा डेरा येथील आपल्या आश्रमात रवाना झाला. विशेष म्हणजे, शिक्षा झाल्यापासून राम रहीम १४ व्यांदा तुरुंगातून बाहेर आला आहे. यापूर्वी ९ एप्रिल रोजी तो २१ दिवसांच्या फर्लोवर बाहेर आला होता.

गुरमीत राम रहीम महिला साधूंचे लैंगिक शोषण आणि पत्रकार रामचंद्र छत्रपती हत्याकांड प्रकरणात रोहतकच्या सुनारिया तुरुंगात २०१७ पासून शिक्षा भोगत आहे. मात्र, तेव्हापासून आतापर्यंत राम रहीमला १४ वेळा पॅरोल आणि फरोल मिळाला आहे. आता तो ५ ऑगस्ट ते १४ सप्टेंबर पॅरोलवर बाहेर असेल. पॅरोलच्या अटींनुसार त्याला सिरसा आश्रमातच राहावे लागेल. यापूर्वी एप्रिलमध्ये राज्य सरकारने राम रहीमला २१ दिवसांच्या फर्लोवर सोडले होते. दरम्यान, पॅरोलवर बाहेर येणे ही राम रहीमसाठी नवीन गोष्ट नाही. याआधीही तो पॅरोलवर तुरुंगातून बाहेर येत आलाय. आता पॅरोलवर बाहेर आलेला राम रहीम येत्या १५ ऑगस्ट रोजी त्याचा ५८ वा वाढदिवस साजरा करणार आहे. या दरम्यान संपूर्ण महिनाभर आश्रमात विविध कार्यक्रम होणार आहेत.

# वंडरबॉय कैवल्य

काही मुल हि इतर सर्वसामान्य मुलापेक्षा वेगळीच असतात. त्यांना निसर्गाने अचाट स्मरणशक्तीचे जणू वरदानच दिलेले असते. तीन वर्षांचे वय हे खेळण्या-बागडण्याचे असते मात्रलहान वयातच काही मुलांमध्ये असामान्य बुद्धिमत्तेची चुणूक दिसून येते. त्याची हुशारी भल्याभल्यांना थक्क करून सोडते. चंद्रपूर जिल्ह्यातील कोरपना तालुक्यातील नांदा या गावात राहणाऱ्या कैवल्य अमोल भोयर या तीन वर्षांच्या चिमुकल्याने आपल्या सामान्य ज्ञान आणि स्मरणशक्तीच्या जोरावर भल्याभल्यांना आश्चर्यचकित करून सर्वांच्या भुवया उंच करावयास भाग पाडले आहे.जी वय मुलांची खेळायची असते अशा वयात कैवल्यची जनरल नॉलेजसोबत मैत्री आहे. कैवल्यला दररोज घडणाऱ्या घटनांची व नवनवीन माहिती जाणून घ्यायची उत्सुकता असते. त्याचे आई-वडील देखील त्याला



**मुलखांवेगळी माणसं**

माहिती देण्याचा प्रयत्न करत असतात. कैवल्यचे वडील हे एका खाजगी कंपनीत कार्यरत आहेत, तसेच त्यांचा मोबाईल दुरुस्तीचे काम देखील आहे,व कैवल्यची आई वैशाली अमोल भोयर ह्या नांदा या गावच्या पोलीस पाटील आहेत. आई वडील या दोघांचाही दिनक्रम अतिशय व्यस्त असतांना देखील कैवल्यला वेळात वेळ काढून संपूर्ण जनरल नॉलेज सोबत घडणाऱ्या रोजच्या नवीन घटनाची माहिती त्याला देत असतात. यात त्याला चित्राच्या माध्यमातून देखील ओळख करून दिली जाते. ज्यात त्याला माहिती जाणून घेण्यास मदत होते. सध्या कैवल्य शाळेत जात नसला तरी देखील तो लवकर प्रत्येक गोष्ट आत्मसाद करतो येणाऱ्या अभ्यास वर्षात त्याचा चांगल्या शाळेत प्रवेश देणार असल्याचे त्याच्या वडीलाने सांगितले.चंद्रपूर जिल्ह्यासह संपूर्ण सोशल मिडीयावर कैवल्याचा विडीओ चांगलाच व्हायरल होत आहे. युटूबर नादखुळा या चॅनेलने कैवल्याच्या हा व्हिडीओ अपलोड केला असता त्याला ४ लाख ७२ हजार लोकांनी बघितले असून हजारो लाईक सोबत प्रशंसनीय कमेंट्ससुद्धा आहेत.यात त्याने तीन मिनिटात जवळजवळ ७५ प्रश्नांना न अडखळता उत्तरे दिली आहेत.कैवल्य दीड पावणेदोन वर्षांचा असतानाची गोष्ट आहे. तो नुकताच बोलायला लागला होता. त्याची आई स्पर्धा परिक्षेची तयारी करीत होती. त्यावेळी तो शेजारी बसला असताना त्याला काही प्रश्न व त्याची उत्तरे सहजच सांगितली. ज्यात आपला जिल्हा, राज्य आदी माहिती होती. दुसऱ्या दिवशी पुन्हा अभ्यासाला त्याची आई बसली असताना कैवल्यने आदल्या दिवशी सांगितलेली माहिती बिनचूकपणे आईला पुन्हा सांगितली. तेव्हा आम्हाला आश्चर्यच वाटले. त्याला मग दररोज नवनवी माहिती देत गेलो. त्यानेही ती तात्काळ आत्मसात केली. त्याला स्मरणशक्तीचे वरदान असल्याचे तेव्हाच आमच्या लक्षात आले. आम्ही त्याला टीव्ही जास्त पाहू देत नाही. काही महत्त्वाचे व माहितीपूर्ण कार्यक्रमच पाहू देतो. एकूणच,मूर्ती लहान पण कीर्ती महान असलेला छोटा कैवल्य त्याच्या याच अफाट आणि अचाट स्मरणशक्तीचे जोरावर भविष्यात आपले नाव कीर्तिमान करणार यात शंका नाही.

**लोकमानस**

# कोण खरा भारतीय, कोण नाही हे न्यायमूर्ती ठरवू शकत नाही

## प्रियंका गांधींनी केला राहुल गांधींचा बचाव

**नवी दिल्ली, दि. ५ वृत्तसंस्था**

काँग्रेसचे नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी लष्कराबाबत केलेल्या कथित विधानावरून सर्वोच्च न्यायालायने त्यांना खडेबोल सुनावले होते. तसेच चीनने भारताची दोन हजार चौरस किमी जमीन बळकावली हे तुम्हाला कसं समजलं? तुम्ही खरे भारतीय असता तर असे बोलला नसता, अशा शब्दात न्यायमूर्तींनी राहुल गांधी यांची कानउघाडणी केली होती. त्यानंतर आता राहुल गांधी यांच्या भगिनी प्रियंका गांधी यांनी त्यांचा बचाव केला आहे.

प्रियंका गांधी म्हणाल्या की, माननीय न्यायमूर्तींचा पूर्ण सन्मान ठेवून मी सांगू इच्छिते




की, खरा भारतीय कोण आहे हे न्यायमूर्ती ठरवू शकत नाही. कोण खरा भारतीय आहे, कोण खरा भारतीय नाही हे न्यायालय ठरवू शकत नाही. हा विषय त्यांच्या कार्यकक्षेत येत नाही. राहुल गांधी यांच्या मनात लष्कराप्रति पूर्ण आदर आणि सन्मान आहे. माझा भाऊ कधीही सैन्याविरोधात बोलणार नाही. तो त्यांच्या प्रति आदर बाळगतो. तसेच त्यांच्या वक्तव्याचा चुकीचा अर्थ काढला गेला.

राहुल गांधी यांनी लष्कराबाबत केलेल्या कथित वक्तव्याप्रकरणी खालच्या कोर्टाने त्यांच्याविरोधात समन्स बजावले होते. मानहानीच्या या खटल्याविरोधात राहुल गांधी यांनी आव्हान देणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल केली होती. या खटल्याची सुनावणी सोमवारी सर्वोच्च न्यायालयात झाली. त्यावेळी राहुल गांधी यांना फटकारताना सर्वोच्च न्यायालयाने चीनने दोन हजार चौरस किमी जमीन बळवकावली, हे तुम्हाला कसे कळले. तुम्ही खरे भारतीय असता तर असं विधान केलं नसतं, असे न्यायमूर्ती म्हणाले होते.

# निशिकांत दुबेंच्या विरोधात मनसेकडून याचिका दाखल

**नाशिक, दि. ५ प्रतिनिधी**

भाजपा खासदार निशिकांत दुबे यांनी पंधरा दिवसांपूर्वी मराठी भाषेबाबत आणि मराठी माणसांबद्दल जे उद्गार काढले की, महाराष्ट्र आमच्या तुकड्यावर जगतो... मराठी माणसाला पटक पटक के मारेंगे..., या विधानांबाबत काही दिवसांपूर्वी निशिकांत दुबे यांना नोटीस बजावली होती. यामध्ये पंधरा दिवसांत मराठी माणसाची माफी मागावी, अशी मागणी आम्ही केली होती. परंतु, या नोटिसीला निशिकांत दुबे यांनी प्रतिसाद दिला नाही. या अनुषंगाने आमच्या वकिलांनी नाशिक न्यायालयात दावा दाखल केला आहे, अशी माहिती मनसे शहराध्यक्ष



सुदाम कोंबडे यांनी दिली. पहिली इयत्तेपासून हिंदी सक्तीचा मुद्दा, त्याला मनसे, शिवसेना ठाकरे गट तसेच राज्यातील अनेक संस्था संघटना यांनी केलेला विरोध यानंतर मराठी-अमराठी वाद निर्माण झाला. यानंतर भाजपा खासदार निशिकांत दुबे यांनी केलेली अनेक विधाने वादग्रस्त ठरली. याला राज ठाकरे यांनीही प्रत्युत्तर दिले. यानंतरही निशिकांत दुबे यांना विधाने करण्याचा सिलसिला सुरूच राहिला. यामुळे आता मनसेकडून नाशिक कोर्टात निशिकांत दुबे यांच्याविरोधात याचिका दाखल केला आहे. निशिकांत दुबे सातत्याने राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांचा अपमान करत आहेत. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही त्यांना सांगितले की, अशी बेताल वक्तव्ये करू नये. परंतु, हा माणूस थांबायला तयार नाही. म्हणूनच यांना धडा शिकवला गेला पाहिजे. आता आम्ही दुबेला दाखवू की, कसे पटक पटक के मारते हैं. तू नाशिकला ये. त्यांना समजतच नाही की, संपूर्ण देशाची महाराष्ट्र ही आर्थिक राजधानी आहे. हा माणूस खासदार असला तरी त्यांना अभ्यास कमी आहे. म्हणून दुबे, तुला धडा शिकवावा लागेल. तू नक्की नाशिकला ये, असे आव्हान मनसे नेते सुदाम कोंबडे यांनी दिले.

# पदमजी पेपर प्रॉडक्ट्सचा सौरऊर्जा प्रकल्प लवकरच होणार कार्यान्वित

पदमजी पेपर प्रॉडक्ट्स लिमिटेडच्या करपूर्व नफ्यात ३० जून २०२५ रोजी संपलेल्या पहिल्या तिमाहीत गत वर्षाच्या तुलनेत ३० टक्के वाढ होऊन तो ४,८२९ लाख रुपयांवर झेपावला आहे. कंपनीचा इबीडटा (EBIDTA) गेल्या वर्षीच्या

**दखल**

याच कालावधीतील तिमाहीतील २० टक्क्यांच्या तुलनेत यंदा २७ टक्के इतका नोंदविला गेला आहे. तथापि, महसूलात गत वर्षाच्या तुलनेत तीन टक्क्यांनी घट होऊन तो १९,६४५ लाख रुपये इतका नोंदविला गेला आहे. महाड येथील प्रस्तावित विस्तार योजनेसाठी कंपनी प्रकल्प तपशील तयार करत आहे. तसेच या विस्तारीत प्रकल्पासाठी लागणारी यंत्रसामग्री निश्चित करण्यासाठी कंपनी सध्या परदेशी यंत्रसामग्री पुरवठादारांशी चर्चा करत आहे.कंपनीचा महाराष्ट्रातील १५.४ मेगावॅट क्षमतेचा सौरऊर्जा प्रकल्प यंदाच्या आर्थिक वर्षाच्या मध्यापर्यंत कार्यान्वित होण्याची



अपेक्षा आहे. कंपनीच्या सध्याच्या एकूण वीज गरजेत हरित ऊर्जेचा वाटा या प्रकल्पामुळे सुमारे ५० टक्क्यांपर्यंत वाढणार आहे. त्यामुळे पर्यावरण शाश्वततेच्या उद्दिष्टाला पाठबळ मिळणार आहे. तसेच ऊर्जेवरील एकूण खर्च कमी होणार आहे. कंपनीने विविध जैविक विघटन (बायोडिग्रेडेबल) आणि कंपोस्टेबल अशा विशेष प्रकारच्या कागद निर्मितीवर आपले लक्ष केंद्रित केलेले आहे. या विशेष कागदांमध्ये प्रतिरोधक गुणधर्म आहेत. अशा प्रकारचे कागद विविध प्रकारची अन्न उत्पादने, औषधनिर्माण आणि इतर उत्पादने, रुग्णालयातील वापर, स्वच्छता क्षेत्रे, मिठाई इत्यादी क्षेत्रांत शाश्वत पॅकेजिंगच्या पर्यायासाठी इनपुट म्हणून वापरले जातात. या कागदांच्या मागणीत वेगाने वाढ होताना दिसत आहे.

# विद्यार्थ्यांना अघोरी शिक्षा करणाऱ्या शिक्षकांवर कायदेशीर कारवाई व्हावी का?

**माझं मत**

**१] संजय डोळस**
**[पालक ]**

आमच्या लहानपणी जे शिक्षक होते ते आम्हाला छडीचा केवळ धाक दाखवायचे. अगदीच विद्यार्थ्यांनी प्रमाणापेक्षा अति आगाऊपणा केला किंवा अभ्यासात टाळाटाळ केली तर हातावर छडी बसायची. मात्र हल्लीचे शिक्षक मग ते पुरुष असो कि स्त्री शिक्षक कमी आणि एखाद्या जेलचे जेलरच अधिक बनताना दिसतात. विद्यार्थ्यांना मायेने,प्रेमाने शिकवले तर ते नक्कीच शिक्षण आत्मसात करतात असे शिक्षणतज्ज्ञाचे देखील संशोधन आहे. मग,अगदी कायदा हातात घेऊन विद्यार्थ्यांना जबर मारहाण कर,मेणबत्तीचे चटके दे,वाळूवर किंवा मिठावर गुडघे टेकायला लाव,त्यांना भर वर्गात नागडे कर असे अघोरी प्रकार करणाऱ्या शिक्षकावर कायदेशीर कारवाई होऊन त्यांना जबरदस्त शिक्षा व्हायलाच हवी.

**२] विद्या काळे**
**[शिक्षिका ]**

हल्ली रोज कुठे ना कुठे शिक्षकांनी विद्यार्थ्यांना जबर मारहाण केल्याच्या किंवा त्यांच्यावर प्राणघातक स्वरूपाचे अघोरी मारहाणीचे प्रयोग शिक्षा म्हणून केल्याचे वाचायला आणि ऐकायला ऐकायला मिळते. हे खरोखरच चुकीचे आणि शिक्षण क्षेत्रालाच काळिमा फासणारे आहे. मात्र अशी विकृती हि क्वचित कुठे तरी पाहायला मिळते. मात्र विद्यार्थ्यांना चुकल्यानंतर किंवा अभ्यासात हलगर्जी पणा केल्यानंतर छडीचा धाक हा असायलाच हवा. कारण शिक्षकांचा धाक हा विद्यार्थ्यांचे भवितव्य घडविण्यासाठी असतो. अन्यथा सर्वच विद्यार्थी हे मोकाट सुटतील आणि कसले ताळतंत्रच राहणार नाही.

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# बिहारमध्ये डोमिसाईल पॉलिसी मंजूर

## शिक्षक भरतीमध्ये ८५ टक्के बिहारींनाच नोकरी मिळणार

**पाटणा, दि. ५ वृत्तसंस्था**

बिहारमध्ये नितीशकुमारांनी काढलेल्या बंपर शिक्षक भरतीमध्ये अधिवास धोरण मंजूर करण्यात आले आहे. यानुसार या भरतीमध्ये ८५ टक्के जागा या बिहारी नागरिकांनाच मिळणार आहेत.

नितीशकुमार यांच्या मंत्रिमंडळाने शिक्षक भरतीमध्ये अधिवास धोरणाला मान्यता दिली आहे. सुमारे ८५ टक्के जागा राज्यातील रहिवाशांसाठी राखीव ठेवल्या जाणार आहेत. शिक्षकांच्या भरतीत बिहारमधील रहिवाशांना (डोमिसाइल) प्राधान्य देण्यासाठी संबंधित नियमात आवश्यक सुधारणा करण्याचे निर्देश शिक्षण विभागाला देण्यात आले होते. भरतीमध्ये फक्त बिहारमधील रहिवाशांनाच प्राधान्य दिले जाणार आहे.



डोमिसाईल म्हणजे निवासस्थान किंवा घर म्हणजेच त्या राज्यातील रहिवासी. हा निर्णय लागू झाल्यानंतर त्याच राज्यातील लोकांना या भरतीमध्ये अर्ज करता येतो. त्या राज्यातील रहिवाशांनाच नोकरी देताना प्राधान्य दिले जाणार आहे. नितीशकुमार यांनी गेल्या निवडणुकीवेळी बाहेरचा चालणार नाही, बिहारीला नोकरी देणार असे आश्वासन दिले होते. ते सत्तेत आल्यावर पाळलेही होते. परंतू, नंतर सत्तांतर करताना त्यांना या गोष्टीचा विसर पडला होता. आता निवडणुकीच्या तोंडावर प्रशांत किशोर आणि राजदने हा मुद्दा उचलला आणि पुन्हा नितीशकुमार यांना हे धोरण राबविण्याची आयतीच संधी मिळाली.

# सीआयएसएफमध्ये ७० हजार पदांची भरती

## गृह मंत्रालयाचा मोठा निर्णय

**नवी दिल्ली, दि. ५ वृत्तसंस्था**

देशाच्या आर्थिक विकासाला पाठबळ देण्यासाठी केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाला अधिक बळकट करण्याच्या दिशेने केंद्रीय गृह मंत्रालयाने एक मोठा आणि महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या अंतर्गत, सीआयएसएफची संख्या २.२ लाखांपर्यंत वाढवली असून २०२९ पर्यंत ७०,००० कर्मचाऱ्यांची भरती होणार आहे. या नव्या योजनेनुसार पुढील पाच वर्षांसाठी सीआयएसएफमध्ये दरवर्षी १४,००० जवान भरती केले जातील. २०२९ पर्यंत एकूण ७०,००० जवानांची भरती पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. या निर्णयामुळे केवळ दलाची ताकदच वाढणार नाही, तर तरुणांसाठी रोजगाराच्या मोठ्या संधीही निर्माण होणार आहेत. भारतातील वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थेच्या पार्श्वभूमीवर, हवाई वाहतूक, बंदर, औष्णिक ऊर्जा प्रकल्प, अणुऊर्जा प्रकल्प, जलविद्युत प्रकल्प, जम्मू-काश्मीरमधील कारागृह यांसारख्या क्षेत्रांमध्ये सीआयएसएफचे मजबूत आणि कार्यक्षम पथक तैनात करणे गरजेचे बनले आहे. त्याचबरोबर छत्तीसगडसारख्या राज्यांमध्ये नक्षलवाद कमी झाल्याने, नवीन औद्योगिक केंद्रांच्या उभारणीची शक्यता आहे. या युनिट्सना व्यापक आणि प्रभावी सुरक्षा देण्यासाठी सीआयएसएफची मजबूत उपस्थिती आवश्यक असेल, असेही मंत्रालयाने म्हटले आहे.

महासागर NASHIK
Printed by S R PUBLICATION, Published by Shrikrishna Tansukhdas Chandak on behalf of Shrikrishna Tansukhdas Chandak, printed at GODOWN NO. 8, 9, 10, Mohan Arjun Compound, Near Ghartan Pada, Vaishali Nagar, Last Bus Stop, Dahisar (East), Mumbai Suburban, Maharashtra - 400068 and published at Plot No. 5, Anandi Bungalow, Kotwal Park, Tilakwadi, Dhamankar Corner, Nashik, Maharashtra - 422002.
Editor: Shrikrishna Tansukhdas Chandak. Resident Editor- Jayant Mahajan. PRGI Registration No.MHMAR/25/A0219

महासागर नाशिक
मुद्रक एस. आर. पब्लिकेशन, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, यांच्या वतीने श्रीकृष्ण तनसुखदास चांडक द्वारे प्रकाशित. मुद्रण स्थळ – गोडाऊन क्र. ८, ९, १०, मोहन अर्जुन कंपाउंड, घर्तन पाडा जवळ, वैशाली नगर, शेवटचा बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई उपनगर, महाराष्ट्र – ४०००६८. प्रकाशन स्थळ – प्लॉट क्र. ५, आनंदी बंगलो, कोतवाल पार्क, टिळकवाडी, धमणकर कॉर्नर, नाशिक, महाराष्ट्र – ४२२००२. संपादक: श्रीकृष्ण तनसुखदास चांडक. निवासी संपादक – जयंत महाजन. PRGI नोंदणी क्रमांक: MHMAR/25/A0219